
एप्रिल २०२६/पाने ६०/किंमत रु. १०

लोकराज्य



समता वर्ष : सन्मान सर्वांचा, विकास राज्याचा

महाराष्ट्र शासन

CMF Chief Minister Fellowship Maharashtra

मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम, २०२६

'चला विकसित महाराष्ट्रासाठी एकत्र काम करूया'



आजच अर्ज करा !

युवकांसाठी दुर्मिळ व अद्वितीय संधी

- महाराष्ट्र शासनासोबत काम
- राज्याच्या विकासात योगदान
- आयआयटी बॉम्बे, मुंबई यांचे प्रमाणपत्र
- विपुल ज्ञान आणि अनुभव



अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख - २७ मे २०२६

उद्याचा सक्षम, समृद्ध आणि विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी आजच पुढाकार घ्या!

एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री

सुनेत्रा अजित पवार
उपमुख्यमंत्री

अधिक माहितीसाठी संकेतस्थळाला भेट द्या.

https://mahades.maharashtra.gov.in/FELLOWSHIP/

Email: cmfellowship-mah@gov.in

अंतरंग

६ **दोन बाबा, अनोखा मर्मबंध**

गाडगेबाबा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाते पारंपरिक गुरू-शिष्य नात्यापेक्षा वेगळे, अद्वैत आणि आत्मीयतेने भरलेले होते. कीर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करताना गाडगेबाबा आणि बाबासाहेब यांच्यात विचारांची देवाणघेवाण होत असे. दोघांनीही समाजातील अंधश्रद्धा, रूढी आणि अन्यायाविरुद्ध लढा देत शिक्षण, समता आणि मानवतेचा संदेश दिला. परस्परांबद्दल अपार आदर, प्रेम आणि जिव्हाळा असलेले हे नाते समाजपरिवर्तनासाठी प्रेरणादायी ठरले.

३६ **राज्याचे कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२६ : सामाजिक प्रगती आणि सांस्कृतिक संवर्धनाचे नवे क्षितिज**

'एआय म्हणजे केवळ यंत्रांची बुद्धिमत्ता नाही, तर मानवी प्रगतीला पूरक ठरणारे एक प्रभावी साधन आहे, हे महाराष्ट्राने आपल्या नवीन एआय धोरणातून सिद्ध केले आहे. मराठीच्या सर्व बोलीभाषांचे संवर्धन, ऐतिहासिक वास्तूंचे जतन आणि महिला स्टार्टअप्सना विशेष बळ देणारे हे धोरण 'माणूस' केंद्रस्थानी ठेवून आखण्यात आले आहे. तंत्रज्ञान आणि संस्कृतीचा हा अपूर्व संगम महाराष्ट्राला एका प्रगल्भ आणि प्रगत क्षितिजावर घेऊन जाणारा ठरेल.'

कार्यकर्त्यांच्या निवासगृहाला महामानवाचा पदस्पर्श ९
मिलिंद मानकर

सुरक्षेचा प्रहरी १२
डॉ. विजय खरे

माणुसकीचा नवा दृष्टिकोन देणारे महामानव १५
डॉ. सुरेंद्र राजाराम शिंदे

मानवी हक्कांचे प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर १८
डॉ. प्रदीप आगलावे

आधुनिक भारताचे शिल्पकार २१
प्रा.डॉ. सरोज डांगे– श्यामकुवर

जोतिराव फुले यांचा स्त्री स्वातंत्र्याचा जाहीरनामा! २४
डॉ. सरोज आगलावे

सामाजिक क्रांतीचे दीपस्तंभ : महात्मा जोतिराव फुले २६
प्रवीण टाके

परिवर्तनाचा नवा दीप: 'ज्योती सावित्री' शाळा २९
युवराज पाटील

बाबासाहेबांचे संविधान म्हणजे... एकसंध भारताची पोलादी चौकट ३१
प्रवीण टाके

अनिश्चिततेकडून स्थैर्याकडे: वंचितांच्या स्वप्नांना कायदेशीर ओळख ३४
चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री, महसूल

भावना आणि संवेदनांचा सुवर्णसंगम: 'गोदा ते नर्मदा' पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलयात्रा ३८
डॉ. किरण मोघे

श्रद्धेचा महाकुंभ अन् विकासाचा 'रामकाल' ४०
विलास बोडके

पर्यावरण संवर्धनाला हरित उपक्रमांतून नवी चालना ४२
नंदकुमार वाघमारे

सुयोग्य दृष्टीकोन... तंत्रज्ञानाचा अंगीकार महिला सक्षमीकरणाचा जागर ! ४५
अर्चना देशमुख

दिव्यांगांच्या कल्याणाला सक्षमीकरणाची जोड ४७
शैलजा पाटील

'ज्ञानभारतम्': भारताच्या प्राचीन ज्ञानपरंपरेचे डिजिटल पुनरुज्जीवन ४९
संजय डी.ओरके

'मासूम' मनाला 'मानस' आधार: भविष्य घडविणारी नवी पाऊलवाट ५२
श्रद्धा मेश्राम

मुख्यमंत्री साहाय्यता निधीची नवी ऑनलाईन प्रणाली: उपचारासाठी आर्थिक मदतीला वेग ५४
रामेशर नाईक

राष्ट्रीय जनसंपर्क परिषद – संवाद, संवेदना आणि स्थित्यंतराचा संगम! ५६
महाराष्ट्र परिचय केंद्र

वर्ष ७७ वे | अंक १ | एप्रिल २०२६

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- व्यवस्थापकीय संपादक — किशोर गांगुर्डे
- संपादक — गोविंद अहंकारी
- सहसंपादक — अर्चना देशमुख, अश्विनी पुजारी
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — सारीका जाधव
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर
- मुद्रण — मे. प्रिंटरेड इश्युज (इंडिया) प्रा.लि., १७, प्रगती इंडस्ट्रियल इस्टेट, एन.एम.जोशी मार्ग, मुंबई – ४०००११.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालयासमोर,
मुंबई–४०० ०३२.
E-mail : lokrajyapublication@gmail.com

ई – लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

महागुंतवणूक : राज्यात १८ प्रकल्पांतून २.५६ लाख कोटींची गुंतवणूक

राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करून रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी तब्बल २,५६,१३७.०१ कोटींच्या १८ विशाल व अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्यास मान्यता देण्यात आली आहे. यामुळे सुमारे १ लाखांहून अधिक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या १४व्या बैठकीत सांगितले.

या बैठकीमध्ये थ्रस्ट सेक्टर तसेच उच्च तंत्रज्ञानावर आधारित सोलर सेल, मॉड्युल, इन्गॉट, वेफर्स, ग्रीन स्टील, हरित अमोनिया, इलेक्ट्रॉनिक्स उत्पादने, अवकाश व संरक्षण साहित्य, लिथियम-आयर्न बॅटरी, इलेक्ट्रिक वाहन निर्मिती/साहित्य, स्टील व गॅस-टू-केमिकल निर्मितीचे विशाल व अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहने मंजूर करण्याच्या १८ प्रस्तावांना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी मान्यता दिली.

यामध्ये नाशिकमधील व्हर्च्युओसो कॉम्प्रेसर्स प्रा. लि. ८०० कोटींची गुंतवणूक करून ५०० जणांना रोजगार देणार असून अमरावती येथे टेंबो डिफेन्स प्रोडक्ट प्रा. लि. १,००० कोटींची गुंतवणूक करत आहे. तसेच छत्रपती संभाजीनगरमधील नायडेक ग्लोबल अप्लायन्सेस इंडिया प्रा. लि. १,००० कोटींची गुंतवणूक करून १,००० नवीन रोजगार निर्माण करेल. तर पुण्याच्या शिरूर भागात जबिल सर्किट इंडिया प्रा. लि. १,५०० कोटींच्या गुंतवणुकीतून ३,००० लोकांना रोजगाराची संधी मिळणार आहे. गडचिरोलीसारख्या नक्षलग्रस्त भागात हरिओम पाईप इंडस्ट्रीज लि. ३,१३५ कोटींची गुंतवणूक करून ८,००० जणांना रोजगार देणार आहे. अहिल्यानगरमध्ये निबे स्पेस ४,००० कोटींच्या गुंतवणुकीसह १,००० रोजगार निर्माण करेल. पुण्याच्या तळेगाव भागात युरोबस इंडिया प्रा. लि. ४,२०० कोटींची गुंतवणूक करून १२,००० रोजगार निर्माण करेल. चंद्रपूरमध्ये मिलीयन स्टील प्रा. लि. २५६.०१ कोटींच्या गुंतवणुकीतून ३६० रोजगार निर्माण होणार आहेत.

भंडारा जिल्ह्यात अशोक ले-लँड लि. १०,००० कोटींची मोठी गुंतवणूक करून १,००० रोजगार उपलब्ध करून देईल. नागपूरच्या बुटीबोरी येथे ॲकमे क्लीनटेक सोल्युशन प्रा. लि. ११,४०० कोटींची गुंतवणूक करून ७,००० रोजगार निर्माण करेल. तसेच याच कंपनीचा रायगड/पालघरमधील ग्रीन स्टील प्रकल्प ११,००० कोटींची गुंतवणूक करून २,५०० रोजगार निर्माण करेल. नागपूरमधील सोलार डिफेन्स अँड एरोस्पेस लि. १२,७८० कोटींच्या गुंतवणुकीतून ६,८२५ जणांना रोजगार, ग्लोब फोर्ज लिमिटेड, अहिल्यानगर व धाराशिव येथे १५,४३० कोटींची गुंतवणूक करून ३,६०० रोजगार, रायगड येथे बालासोर अलॉयज १७,४७९ कोटींची गुंतवणूक करून ३,२०० रोजगार, छत्रपती संभाजीनगरमध्ये गोदावरी न्यू एनर्जी प्रा. लि. २७,५१५ कोटींची गुंतवणूक करून ४,००० रोजगार निर्मिती होणार आहे.

तसेच रायगड/पालघरमध्ये ॲकमे क्लीनटेक प्रा. लि.चा ग्रीन अमोनिया प्रकल्प ३७,८०० कोटींची गुंतवणूक करून ४,५०० रोजगार, गडचिरोलीत रश्मी मेटलर्जिकल इंडस्ट्री प्रा. लि. ४०,००० कोटींची भव्य गुंतवणूक करून २०,००० रोजगार निर्माण होणार आहे. सर्वात मोठी गुंतवणूक एस्सार एक्सप्लोरेशन अँड प्रोडक्शन लि.कडून रायगडमध्ये ५६,८५२ कोटींच्या रूपात होणार असून, त्यातून २५,००० जणांना रोजगार मिळणार आहेत.

या प्रकल्पांमुळे कोकण, विदर्भ, मराठवाडा आणि राज्यातील इतर भागांत औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार असून स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल. तसेच तांत्रिक नवकल्पना, संशोधन-विकास आणि मजबूत पुरवठा साखळी निर्माण होण्यास मदत होईल. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांनाही याचा लाभ होणार आहे. याशिवाय, स्थानिक कामगारांसाठी प्रशिक्षण व कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध होऊन त्यांच्या रोजगार क्षमतेत वाढ होईल.

संपादकीय

समता, तंत्रज्ञान आणि शाश्वत विकासाचा त्रिवेणी संगम

महाराष्ट्र ही संतांची, समाजसुधारकांची आणि क्रांतिकारकांची भूमी आहे. या थोर व्यक्तींच्या विचारांच्या अंमलबजावणीतून समाजपरिवर्तनाचे वस्तुपाठ घालून दिले आहेत. 'लोकराज्य' मासिकाचा एप्रिल २०२६ चा हा अंक महाराष्ट्राच्या याच गौरवशाली इतिहासाचे स्मरण करत असतानाच, भविष्यातील प्रगत आणि डिजिटल महाराष्ट्राची पायाभरणी करणाऱ्या विविध उपक्रमांचा वेध घेणारा आहे.

या अंकात प्रामुख्याने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा जोतिराव फुले यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. एका बाजूला विद्वत्तेचे महामेरू असलेले बाबासाहेब आणि दुसऱ्या बाजूला कीर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करणारे कर्मयोगी गाडगेबाबा, यांच्यातील नाते हे पारंपरिक गुरु-शिष्य नात्यापलीकडले होते. गाडगेबाबांच्या कीर्तनात बाबासाहेब चक्क जमिनीवर सर्वसामान्यांसारखे बसून कीर्तन ऐकत असत. गाडगेबाबांनी बाबासाहेबांना 'बोलविते धनी' म्हणून संबोधले होते, जे त्यांच्या परस्पर आदराचे द्योतक आहे.

त्याचप्रमाणे महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचा प्रारंभ हा महाराष्ट्रासाठी एक ऐतिहासिक टप्पा आहे. 'विद्येविना मती गेली' हा मूलमंत्र देणाऱ्या जोतिरावांनी स्त्री-शिक्षण, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि मानवी हक्क यांसाठी दिलेले योगदान आजही आधुनिक भारताचा पाया मानले जाते. महाराष्ट्र शासनाने त्यांच्या द्विशताब्दी निमित्त विशेष समिती स्थापन करून त्यांचे विचार जनमानसापर्यंत पोहोचवण्याचा संकल्प केला आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेले संविधान ही एकसंध भारताची 'पोलादी चौकट' आहे. समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांवर आधारित हे संविधान आजही भारताच्या अखंडतेची शाश्वती देते. संविधानातील मूलभूत अधिकारांमुळेच शोषित आणि वंचित घटकांना विकासाची समान संधी मिळाली आहे.

महाराष्ट्र हे तंत्रज्ञानाच्या बाबतीत नेहमीच आघाडीवर राहिले आहे. राज्याचे नवे 'कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२६' हे याचेच उत्तम उदाहरण आहे. असे धोरण लागू करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले असून, याद्वारे मराठी भाषेचे संवर्धन, महिला स्टार्टअप्सना बळ आणि ऐतिहासिक वास्तूंचे जतन करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. 'एआय' केवळ यंत्रांची बुद्धिमत्ता नसून ती मानवी प्रगतीला पूरक ठरणारी शक्ती आहे, हा महाराष्ट्राचा दृष्टिकोन दिशादर्शक आहे. यासोबतच जागतिक वसुंधरा दिनानिमित्त राज्याने 'वसुंधरा रक्षक अभियान २०२६' आणि 'महा आरपेट' सारखे उपक्रम सुरू केले आहेत. प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन आणि औद्योगिक उत्सर्जन कमी करण्यासाठी 'इमिशन ट्रेडिंग स्कीम' (ETS) राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य बनले आहे. पुढच्या पिढीला स्वच्छ हवा आणि पाणी देणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे, हे भान या उपक्रमांतून जागृत होते.

दिव्यांगांच्या कल्याणापासून ते बालकांच्या मानसिक आरोग्यापर्यंत शासनाने व्यापक पावले उचलली आहेत. 'दिव्यांग कल्याण विभाग' आता 'दिव्यांग सक्षमीकरण विभाग' म्हणून ओळखला जाणार असून, डिजिटल तंत्रज्ञानामुळे सेवा थेट लाभार्थ्यांच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचणार आहेत. त्याचप्रमाणे संकटग्रस्त बालकांसाठी 'मासूम' आणि शालेय विद्यार्थ्यांसाठी 'मानस' हे प्रकल्प भविष्यातील सुदृढ समाज घडवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरतील. त्याचप्रमाणे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जलयात्रा 'गोदा ते नर्मदा' हा केवळ सांस्कृतिक सोहळा नसून, जलसंवर्धनाच्या दूरदृष्टीचा सन्मान आहे. अहिल्यादेवींच्या कार्याचे स्मरण करत ऐतिहासिक बारवांचे पुनरुज्जीवन आणि नदीजोड प्रकल्पांच्या माध्यमातून महाराष्ट्र दुष्काळमुक्तीच्या दिशेने वाटचाल करत आहे.

'लोकराज्य'चा हा अंक महामानवांच्या विचारांचा सन्मान आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रगत होणाऱ्या महाराष्ट्राच्या वाटचालीचा एक जिवंत दस्तऐवज आहे. हे विचार आणि विकासकामांचे हे पाऊल आपल्याला एका सक्षम आणि समृद्ध महाराष्ट्राकडे घेऊन जाईल, यात शंका नाही.

– ब्रिजेश सिंह
(मुख्य संपादक)

दोन बाबा, अनोखा मर्मबंध




■ डॉ. सतीश पावडे

गाडगेबाबा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाते पारंपरिक गुरू-शिष्य नात्यापेक्षा वेगळे, अद्वैत आणि आत्मीयतेने भरलेले होते. कीर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करताना गाडगेबाबा आणि बाबासाहेब यांच्यात विचारांची देवाणघेवाण होत असे. दोघांनीही समाजातील अंधश्रद्धा, रूढी आणि अन्यायाविरुद्ध लढा देत शिक्षण, समता आणि मानवतेचा संदेश दिला. परस्परांबद्दल अपार आदर, प्रेम आणि जिव्हाळा असलेले हे नाते समाजपरिवर्तनासाठी प्रेरणादायी ठरले.

गाडगेबाबा आणि बाबासाहेब यांच्यात गुरुशिष्याचे नाते असले तरी ते अगदी पारंपरिक अर्थान कधीच या दोघांनीही स्वीकारले नाही. दोघांनीही त्या परंपरेचा उदो उदो केला नाही. एक वेगळाच अद्वैती बाणा, हे त्यांच्या संबंधाचे वैशिष्ट्य होते. जिव्हाळा, आपुलकी, काळजी, प्रेम, आदर, कळवळा, सार्थ अभिमान, सामंजस्य, समन्वय, समाजाप्रतिचा आत्मभाव आणि परस्परातील आत्मीयता असे हे अद्वैत होते. गाडगेबाबांची कीर्तने हा त्यांच्यातला संवाद होता. त्यांची वाचा होती, विचाराची देवाणघेवाण होती. म्हणूनच बाबासाहेब सातत्याने गाडगेबाबांच्या कीर्तनांना हजेरी लावत.

भारताच्या संत परंपरेत लोकसंत गाडगेबाबा हे सर्वार्थाने आगळेवेगळे संत आहेत. कीर्तन हे त्यांचे लोकप्रबोधनाचे माध्यम; पण त्याचे रूप-स्वरूपही या कर्मयोग्याचेच दर्शन घडवणारे होते. त्याच्या शैलीत, आकृतिबंधात, रूपबंधात आमूलाग्र बदल त्यांनी केला. परंपरेपेक्षा एक नवी कीर्तनशैली त्यांनी जन्मास घातली. या कीर्तनाच्या



माध्यमातूनच गाडगेबाबा आणि डॉ. बाबासाहेब एकत्र आले. मुंबईत जेव्हा जेव्हा गाडगेबाबांचे कीर्तन असेल तेव्हा तेव्हा बाबासाहेब त्यांचे कीर्तन ऐकायला जात. खाली जमिनीवरच बसून ते सर्वसामान्यांसारखे कीर्तन ऐकत. हळूहळू गाडगेबाबांनाही ते कळले. एकदा मुंबईच्या भायखळा मार्केटमध्ये गाडगेबाबांचे कीर्तन होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या सहकाऱ्यांसोबत कीर्तनाला गेले. कीर्तन सुरू होताच श्रोत्यांपैकी एकाने त्यांना विचारले, 'महाराज एक इचारू का?' त्यावर गाडगेबाबा म्हणाले, 'इचारा मायबाप. पण मले महाराज मनू नका. मी आपले लेकरू हाय. बोलविते धनीच बसलेत तुमच्या पलीकडे. तेच हाये खरे महाराज. गरीब लोकायसाठी, आपल्या समाजासाठी लढणारे महाराज, तुमच्यासाठी आथीस जमिनीवर बसून माह्य कीर्तन आईकून राह्यले', असे म्हणून त्यांनी बाबासाहेबांकडे बोट दाखवले डॉ. आंबेडकर चक्क जमिनीवर बसून कीर्तन ऐकत होते.





अतूट नाते

डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संत गाडगेबाबा यांचे अतूट नाते होते. परंपरा, अंधकार नष्ट करण्यासाठी या दोन्ही महापुरुषांनी घरादारावर, संसारावर, सुख-दु:खावर तुळशीपत्र ठेवून पददलितांच्या उद्धाराची, विकासाची, आधुनिक विचारांची स्वप्ने पाहिली. डॉ. बाबासाहेबांच्या विद्वत्तापूर्ण व्यक्तिमत्त्वाने संत गाडगेबाबांचे मन भारावून जाई. त्यांच्या कर्तृत्वाने गाडगेबाबा अतिशय प्रभावित झाले होते.

म्हणूनच बाबा आपल्या कीर्तनातून डॉ. बाबासाहेबांच्या नावाचा जयजयकार करण्यास लोकांना सांगत. त्यांच्याविषयी कुठे अनादर दिसला तर ते अस्वस्थ होत. लोकांना त्यांची कामगिरी समजावून सांगत. लोकांना शिक्षणाचे महत्त्व सांगताना बाबा कीर्तनात नेहमी डॉ. आंबेडकरांचा दाखला देत. बाबासाहेबांनीही गाडगेबाबांना आपले गुरू मानले. गाडगेबाबांनीही बाबासाहेबांची गुरू परंपरा समृद्ध केली. गाडगेबाबा नेहमीच आपल्या कीर्तनात बाबासाहेबांच्या कामाचा आवर्जून उल्लेख करीत. त्यांचे काम, विचार, संघर्ष लोकांपर्यंत पोचवत. एवढेच नव्हे तर लोकांना बाबासाहेबांच्या नावाच्या घोषणा द्यायला लावत. गाडगेबाबा यांनी बाबासाहेब यांच्यावर कविताही रचली होती. अनेक कीर्तनात ते आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तालासुरात गाऊन दाखवत. आपल्या अखेरच्या कीर्तनात गाडगेबाबा म्हणतात, ''विद्या केवढी मोठी गोष्ट आहे. डॉक्टर आंबेडकर साहेब यांच्या पिढ्यान् पिढीनं झाडू मारायचं काम केलं. यांच्या वडिलाले सुबुद्धी सुचली आणि आंबेडकर साहेबाले शाळेत घातलं. आंबेडकर साहेबांनी काही लहानसान कमाई नाही केली. हिंदुस्थानची घटना केली. घटना. अन्‌ब तेच शाळेत जाते ना, अन् शिकते ना, तर झाडू मारनंच त्यांच्या कर्मात होतं. विद्या मोठं धन आहे. जेवनाचं ताट मोडा. बायकोला लुगड कमी भावाचं

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संत गाडगेबाबा यांचे नाते अत्यंत जिव्हाळ्याचे, निरपेक्ष आणि मानवतेच्या कल्याणासाठी समर्पित होते. या दोन महान व्यक्तींमध्ये औपचारिकतेपेक्षा परस्पर आदर, सल्लामसलत आणि समाजहिताची भावना अधिक महत्त्वाची होती. त्यांच्या सहकार्यामुळे शिक्षण, समता आणि समाजजागृतीच्या कार्याला नवी दिशा मिळाली.

घ्या. मोडक्या घरात रहा. पन मुलाले शिक्षन दिल्याविने सोडू - नोका!''

ऐतिहासिक भूमिका

डॉ. आंबेडकर व गाडगेबाबांच्या या सल्ला घेण्याच्या आणि देण्याच्या प्रक्रियेत कुठलीच औपचारिकता नव्हती की कुठला पूर्वग्रह. दोन महान कर्मयोग्यांनी माणुसकीच्या हितासाठी बजावलेल्या ऐतिहासिक भूमिका होत्या. बाबासाहेबांचे प्रचंड अभ्यास, चिंतनमनन करून पाठिंबा देणे, स्वतःला बुद्धाचा वारकरी म्हणून जोडणे, हा त्यांच्या नात्यातल्या अद्वैताचा उत्कृष्ट नमुना आहे. बाबासाहेब सरकारात मंत्री असतानासुद्धा बाबांची माहिती घेत. आजारी असताना गाडगेबाबांच्या भेटीस जात. एकदा मुंबईत दादरच्या डॉ. महाजनींच्या दवाखान्यात गाडगेबाबा उपचार घेत असल्याचे डॉ. बाबासाहेबांना कळले. डॉ. आंबेडकर तेव्हा स्वतंत्र भारताच्या मंत्रिमंडळात कायदा मंत्री होते. सायंकाळी त्यांना तातडीने दिल्लीला पोहोचायचे होते. म्हणून बॉम्बे सेंट्रल रेल्वे स्थानकावर पोहोचले होते. मात्र हा निरोप ऐकताच त्यांनी त्या दिवसाचे कार्यक्रम रद्द करुन गाडगेबाबांना भेटण्यासाठी दोन घोंगड्या खरेदी केल्या आणि बाबांच्या भेटीसाठी ते दवाखान्यात गेले. ते गाडगेबाबांना म्हणाले ''आपण कोणाकडूनही काहीच स्वीकारत नाही. तरी मी या दोन घोंगड्या आपल्यासाठी आणल्या आहेत. एक अंथरण्यासाठी, एक पांघरण्यासाठी. याचा स्वीकार करावा. याच भेटीच्या वेळी रयत शिक्षण संस्थेचे जनक



कर्मवीर भाऊराव पाटीलसुद्धा उपस्थित होते. या भेटीत संत गाडगेबाबांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना, पंढरपूरची चोखामेळा धर्मशाळा पीपल्स एज्युकेशन संस्थेसाठी ताब्यात घ्या, असा प्रेमळ आग्रह धरला होता. आजारी असूनही बाबांनी त्यावेळी मोठ्या उत्साहाने पंढरपूर धर्मशाळेचे दानपत्र आणि धर्मशाळेच्या खात्यात जमा असलेली १५,०००/- रुपयांची रक्कम डॉ. बाबासाहेबांच्या स्वाधीन केली. ते बाबासाहेबांना म्हणाले, ''डाक्टर



साहेब आपली लय आधीच भेट झाली असती तर म्या धर्मशाळा काढ्याच्या ऐवजी शिक्षण शाळाच काढल्या असत्या. पर आता हे काम तुम्हीच करा, सामाजाले अशा लय स्कूलची, कालीजांची गरज हाये.'' बाबासाहेबांनी हे काम पुढे मोठ्या ताकदीने पुढे नेले. गाडगेबाबांचे स्वप्नही त्यांनी अशा प्रकारे पूर्ण केले. आयुष्यात गाडगेबाबा कधीच रडले नाहीत. स्वतःचा मुलगा गोविंदा गेला, जन्मदात्री, आई... गेली तेव्हाही. पण ६ डिसेंबर १९५६ रोजी जेव्हा त्यांना बाबासाहेबांच्या निर्वाणाची माहिती मिळाली तेव्हा गाडगेबाबा धाय मोकलून रडू लागले. तिथल्या लोकांना समजेना बाबा असे का रडताहेत. तेव्हा बाबा आपल्या त्या सहकाऱ्यांना म्हणतात, ''अरे तुमचा आमचा बाप आज ह्या जगात नाही राहिला. अरे तुम्ही आम्ही पोरके झालो रे''. बाबा पहिल्यांदा इतके दुःखी झाले होते. या दुःखात समाजाची हानी झाल्याचे दुःख होते. हे दुःख मानवीय होते, 'असे गेले कोट्यानु कोटी काय र एकल्या साठी', असे म्हणणारे गाडगेबाबा का रडले असावेत, यातच त्यांच्यातल्या नात्याचे मर्म दडले आहे.

(लोकराज्य एप्रिल २०१६ मधून पुनर्मुद्रित)

कार्यकर्त्यांच्या निवासगृहाला

महामानवाचा पदस्पर्श



■ मिलिंद मानकर

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पावन चरणाने अनेक निष्ठावान कार्यकर्त्यांची निवासस्थाने धन्य झाली. महाडचे महापुरुष सुरबानाना टिपणीस यांचे 'गोविंद निवास', बळवंतराव वराळे यांचे 'इंदुमती क्लिनिक', सोलापूरचे 'गंगा निवास', दादासाहेब गायकवाड यांचे आंबा जानोरी येथील निवास आणि पांचगणी साताराचे 'सुमन कुंज' या निवासस्थानांना बाबासाहेबांनी अनेकदा भेटी दिल्या. काही हौशी कार्यकर्त्यांनी बाबासाहेब ज्या खुर्चीवर बसले होते ती खुर्ची, पलंग, सोफा सेट, त्यांनी वापरलेली भांडी आयुष्यभर मौल्यवान अलंकाराप्रमाणे जतन केली.

बाबासाहेबांच्या जीवनात महाड शहराला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली २० मार्च १९२७ रोजी झालेला महाड चवदार तळे सत्याग्रह जगाच्या इतिहासात प्रसिद्ध आहे. याच महाड शहरातील सुरबानाना टिपणीस यांनी बाबासाहेबांना खंबीरपणे मोलाची साथ दिली होती. बाबासाहेब जेव्हा जेव्हा महाडला जायचे, त्यावेळी ते सुरबांच्या '**गोविंद निवासा**'त मुक्काम करायचे. या पवित्र वास्तूत बाबासाहेबांनी तब्बल दहा वर्षे वास्तव्य केले. सुरबानाना यांच्या धर्मपरायण, शिस्तप्रिय पत्नी लक्ष्मीबाई आणि बहीण इंदिराबाई मोठ्या आपुलकीने बाबासाहेबांच्या राहण्याची व जेवणाची सोय करायच्या.

सुरबानानांचे चिरंजीव सतीशचंद्र टिपणीस म्हणतात, बाबासाहेबांचे महाडास आगमन झाले की मुक्काम आमच्या घरी असायचा. बाबासाहेब नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात थंडीच्या दिवसात येत. पाऊस नुकताच सरलेला असे. पावसाळ्यात खराब झालेले घराच्या मागील दाराचे अंगण चोपून सारवून सारखे केले जाई. हिरव्यागार शेणाने सारवल्यामुळे अंगणाला सौंदर्य प्राप्त होई. महाडच्या गांधी टॉकीजचे मालक देवचंदभाई गांधी यांच्याकडून वाघाच्या चित्रांचे गालीचे आणले जात. या साहित्यातून बाबासाहेबांसाठी बैठक तयार होई. जुन्या घराला माडी (दुसरा मजला) आणि पोटमाळा होता. माडीवर घराच्या दर्शनी भागात २२ फूट लांब व १५ फूट रुंद मापाची एक मोठी प्रशस्त खोली होती. त्या खोलीला 'हॉल' असे भारदस्त इंग्रजी नाव होते. त्याकाळी 'गोविंद निवास' आंबेडकरी चळवळीचे प्रमुख केंद्र बनले होते.

सौजन्य – सतीशचंद्र टिपणीस
सुरबानानांचे चिरंजीव महाड

इंदुमती क्लिनिक, निपाणी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पाहण्याचा योग माझे वडील बळवंतराव वराळे यांच्यामुळे आला. त्यांनी आमच्या घरी भेट देऊन काही वेळ वास्तव्यही केले होते. त्यांच्या आठवणी आजही आमच्यासह निपाणीकरांच्या स्मरणात आहेत. डॉ. आंबेडकरांची ही भेट म्हणजे आयुष्यभराची शिदोरी ठरली आहे, अशी आठवणी डॉ. श्रीकांत वराळे यांनी सांगितली. सीमाभागात आणि पूर्वीच्या मुंबई प्रांतात असलेल्या बेळगाव जिल्ह्यावर डॉ. बाबासाहेबांचे प्रेम होते. मित्रांच्या भेटीच्या निमित्ताने त्यांनी निपाणी चिक्कोडी भागात



चार-पाच वेळा भेट दिली होती. सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात प्रगती व्हावी या महान उद्देशाने त्यांनी निपाणीला म्युनिसिपल हायस्कूलच्या पटांगणावर २५ डिसेंबर १९५२ रोजी सभा घेतली होती. सभेनंतर डॉ. बाबासाहेबांनी नगरपालिकेच्या मागील बाजूस असलेल्या बळवंतराव वराळे यांच्या घरी दोन तास वास्तव्य केले होते. ती खोली आणि तो पलंग अजूनही बळवंतराव यांचा मुलगा डॉ. श्रीकांत वराळे यांच्या घरी आहे. तसेच बाबासाहेबांच्या पत्नी रमाबाई यांची प्रकृती अस्वस्थ असल्याने सन १९३१ मध्ये हवापालट करण्यासाठी वराळे यांच्या घरी वास्तव्यास आल्या होत्या, ही बाबही विशेषच आहे.

सौजन्य – मालती वराळे, औरंगाबाद

गंगा निवास, सोलापूर

गंगा निवास ही इमारत हणमंतु सावण्णा पसलेल्लू (गार्ड) यांनी बांधली. १४ जानेवारी १९४६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोलापुरात आले होते. त्यावेळी त्यांचे वास्तव्य सोलापूर शहरातील फॉरेस्ट येथील 'गंगा निवासा'त होते. गंगा निवासात वर जाण्यासाठी अत्यंत जुन्या पण अतिशय भक्कम लाकडी पायऱ्या आहेत. हॉलमधील टाइल्स इमारतीचे सौंदर्य द्विगुणीत करतात. आतील सर्व फर्निचर कर्नाटकी कलाकुसर पद्धतीचे असून ते सागवानी आहे. हॉलमध्ये बाबासाहेबांचे अत्यंत दुर्मीळ छायाचित्र, वर्तमानपत्रातील बाबासाहेब व सोलापूर यांचे नाते सांगणारी अनेक कात्रणे भिंतीवर फ्रेम करून लावण्यात आलेली आहेत.

डॉ. बाबासाहेब या ठिकाणी वास्तव्यास असताना त्यांनी वापरलेल्या सर्व वस्तू या ठिकाणी आहे तशा जतन करून ठेवण्यात आल्या आहेत. त्यामध्ये सागवानी लाकडाची आराम खुर्ची, अत्यंत दुर्मीळ कलाकुसर पद्धतीचे सागवानी टेबल, पितळेचे ताट वाटी, ग्लास, तांब्या व चहाची किटली यांचा समावेश आहे. ही ऐतिहासिक वास्तू आणि या सर्व वस्तूंचे जतन हणमंतू गार्ड यांचे नातू प्रशांत व प्रकाश यांनी केले आहे.

सौजन्य – प्रसिद्ध नाट्यकलावंत आणि अभिनेत्री सुशीला वनसाळे, सोलापूर

आंबा जानोरी, नाशिक



बाबासाहेब जेव्हा जेव्हा नाशिकला येत तेव्हा ते दादासाहेबांच्या घरीच उतरत. बाबासाहेबांना मासे आवडायचे. बाबासाहेब नाशिकला येणार त्यावेळी दादासाहेब त्यांना मासे खाऊ घालायचे. स्वयंपाकघरापर्यंत बाबासाहेबांचे संबंध होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गोलमेज परिषदेला गेले असताना दादासाहेबांनी मुखेडचा सत्याग्रह केला. बाबासाहेब दादासाहेबांना गमतीने म्हणायचे, 'आपल्या दोघांच्या गावाच्या नावात 'आंबा' हा शब्द कॉमन आहे. मी 'आंबेवडे'चा आणि तू जानोरी 'आंब्या चा!' यावर दादासाहेब म्हणायचे, 'आंबे' कॉमन असले तरी त्याची जात वेगळी आहे. तुमचा आंबा 'हापूस' आहे आणि माझा आंबा 'गावठी' आहे. सोबतच शांताबाई दाणी यांच्या घरी आणि झुंजार रिपब्लिकन नेते अमृतराव रणखांबे यांच्या 'संता निवास' मध्ये बाबासाहेबांनी अनेकदा मुक्काम केला.

सौजन्य कॅ. कुणाल गायकवाड, दादासाहेबांचे नातू नाशिक

सुमन कुंज, पाचगणी, जि. सातारा

साताराचे दलित समाजातील पहिले डॉ. सदाशिवराव बंदीसोडे आणि सुमनबाई बंदीसोडे यांचे 'सुमन कुंज' बाबासाहेबांचे अतिशय प्रिय घर होते. या घरात त्यांनी अनेकदा मुक्काम केला. सदाशिवरावांच्या पत्नी सुमनबाई बाबासाहेबांना आवडीचे पदार्थ करून वाढायच्या. एकदा बाबासाहेबांचे बंदीसोडे यांच्या घरी आगमन झाले. त्यावेळी सुमनबाईने बाबासाहेबांच्या पायाचे दर्शन घेतले. 'जयदेवा' म्हणून बाबांनी तिच्या नमस्काराचा स्वीकार करून विचारले, 'बंदीसोडेबाई, आज जेवणाचा काय बेत ठेवला आहे?' सगळा हॉल हास्याने फुलला. सुमनबाई म्हणाल्या, 'बाबा, आमच्या डॉक्टरसाहेबांचे एक युरोपियन मित्र आहेत. त्यांच्या बंगल्यावर युरोपियन पद्धतीचाच बेत ठेवला आहे.' एवढा व्याप करण्यापेक्षा आपल्या घरीच चटणी भाकरी केली असती तर चालले नसते कां? आताच सबंध कोकण भाग फिरून चटणी भाकरी वरच भागवलेत नाही? तेव्हा म्हटले थोडासा रुचीपालट हवा. तसं नाही म्हटले तरी मी तुमच्या आवडीची बाजरीची भाकर व बोंबलाची चटणी आणि सोड्याचे कालवण तयार ठेवलेच आहे. त्यावेळी हॉलमध्ये हंशाच हंशा पिकला. बाबासाहेबांच्या काळात 'सुमन कुंज' चळवळीचे प्रमुख केंद्र बनले होते.

सौजन्य विद्या बंदीसोडे, सुमनबाई बंदीसोडे यांची सर्वात लहान मुलगी



कोल्हापूर जिल्ह्यातील औरवाड येथील गौसदादे पटेल यांच्यात व एका मंदिर व्यवस्थापन कमिटीत जमिनीचा वाद होता. हा खटला चालविण्यासाठी मुंबई हायकोर्टाचे सुप्रसिद्ध वकील डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९२७ साली औरवाडला आले होते. बाबासाहेबांच्या राहण्याची व्यवस्था पटेल यांनी घरीच वाड्यात केली होती. त्यावेळी पटेल यांची मुलगी जिगनबी पटेल स्वतः बाबासाहेबांचे जेवणाचे ताट, पाणी देण्यासह सर्व सोय करीत असे. त्यांनी या महापुरुषाला जवळून पाहिले. जिगनबी पटेल म्हणतात, 'डॉ. आंबेडकर यांचे राहणीमान अत्यंत साधे व सरळ होते. डॉ. आंबेडकर आपल्याला मुन्नी नावाने आदराने हाक मारायचे. आपण त्यांना जेवणाचे ताट, पाणी देत होते. आपण सर्व हिंदू-मुस्लीम गुण्यागोविंदाने राहावे, असे ते नेहमी सांगत होते.'

संदर्भ: दैनिक पुढारी बेळगाव, १४ एप्रिल २०१८

याशिवाय बाबासाहेबांनी मुरुडचे प्राचार्य मनोहर भि. चिटणीस यांच्या घरी जेवण केले होते. त्यांचे वडील सबनीस आळीमध्ये राहत असत. मोठ्या आदराने त्यांनी बाबासाहेबांना भोजनाचे निमंत्रण दिले. कर्मकांड न पाळणाऱ्या त्यांच्या वडिलांनी परवानगी दिली. चिटणीस कुटुंबीयांसमवेत बाबासाहेबांनी भोजनाचा आस्वाद घेतला. बाबासाहेब १९३२ साली नागपूरला आले असता त्यांनी एन.टी. मेश्राम यांच्या घरी भेट दिली होती.

बाबासाहेब २६ डिसेंबर १९३९ रोजी कर्नाटक राज्यातील बेळगावला आले होते आणि येथील कंग्राळ गल्लीत त्यांनी एक दिवस वास्तव्याही केले होते. सत्यशोधक चळवळीतील शामराव देसाई, मामासाहेब लाड, भुजंगराव दळवी निपाणीचे रावण मास्तर, बळवंतराव वराळे, एक्सवा येथील तुकाराम माळगी यांच्याशी बाबासाहेबांचे घनिष्ट संबंध होते. त्यांच्या आग्रहावरूनच त्यांनी बेळगावला भेट दिली होती. बेळगावचे तत्कालीन नगराध्यक्ष भीमराव पोतदार यांच्या हस्ते बाबासाहेबांचा सत्कार झाला होता. त्यावेळी बाबासाहेबांचे वस्तवाडकर नामक कुटुंबीयांच्या घरी वास्तव्य होते. प्रत्यक्षदर्शी पिराजी अम्मीनभावी म्हणतात,

'बाबासाहेबांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत भारदस्त होते. बाबासाहेबांनी केलेल्या भाषणाचे स्मरण आपल्याला नाही; पण त्यांचे व्यक्तिमत्त्व आजही आठवते. त्यांनी कंग्राळ गल्लीत वास्तव्य केल्याचेही स्मरण आपल्याला आहे, असे पिराजी यांनी सांगितले. देशभक्त रावसाहेब पटवर्धन यांच्या भिस्तबाग परिसरातील निसर्गरम्य वातावरणात असलेल्या बंगल्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सुमारे २१ दिवस (६ ते २७ ऑक्टोबर १९४०) वास्तव्य होते.

काही हौशी कार्यकर्त्यांनी बाबासाहेब ज्या खुर्चीवर बसले होते ती खुर्ची, पलंग, त्यांनी वापरलेली भांडी जतन केली. बाबासाहेबांनी २० मे १९३९ रोजी हरेगाव श्रीरामपूर जि. नगर या ठिकाणी फकिरराव केरुजी गायकवाड यांच्या घरी भेट दिली होती. भेटीप्रसंगी बाबासाहेब ज्या खाटेवर बसले होते ती खाट फकिररावांनी बहुमोल अलंकाराप्रमाणे आपल्या घरी आयुष्यभर जतन केली. 'बाबासाहेबांचे ते स्मृतीचिन्ह आहे. प्रेरणास्थान आहे. महामानवाच्या पदस्पर्शाने माझी झोपडी पावन झाली. त्यातच मी स्वतःला धन्य मानतो', असे फकिरराव नेहमी म्हणायचे.

सौजन्य चित्रकार प्रकाश कदम,
पानोडी. जि. नगर

शहापूर वाशिंद येथील नाना मलबारी यांच्या घरी डॉ. आंबेडकर आले असताना ते ज्या लाकडी खुर्चीवर बसले होते ती खुर्ची त्यांनी आजपर्यंत जपून ठेवली. आता ती खुर्ची कासने येथील विहारात मलबारी यांनी दान केली आहे. तसेच भालचंद्र वराळे 'मी पाहिलेले बाबासाहेब' या लेखात म्हणतात, '१९४५ साली पुण्यात माझे वडील सिव्हिलियन लेबर ऑफिसर होते. आम्ही पुण्यात बाबाजान चौक कँटोन्मेन्टमधील एका बंगल्यात राहत असू. बाबासाहेबांच्या भेटीत एकदा आमच्याकडे भोजनाचा योग आला. ज्या खुर्चीवर बसून बाबासाहेबांनी भोजनाचा आस्वाद घेतला ती खुर्ची आमच्यासाठी बहुमोल ठेवा ठरली.

लेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या
दुर्मीळ साहित्याचे संग्राहक आहेत

सुरक्षेचा प्रहरी




■ डॉ. विजय खरे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या सुरक्षेचा विचार केवळ बाह्य धोक्यांपुरता मर्यादित न ठेवता अंतर्गत एकात्मता, सामाजिक न्याय आणि मजबूत राज्यव्यवस्थेशी जोडला. त्यांनी राष्ट्रीय सुरक्षा ही समता, शिक्षण, एक नागरिकत्व, सक्षम केंद्र आणि प्रभावी राज्यघटना यांवर आधारित असल्याचे मांडले. त्यांच्या दूरदृष्टीतून भारताच्या एकता, अखंडता आणि स्थैर्यासाठी मूलभूत तत्त्वांची पायाभरणी झाली, जी आजही देशाच्या सुरक्षेसाठी मार्गदर्शक ठरते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीयांच्या सर्वांगीण विकासाला चालना दिली. हा देश गेल्या सहा दशकांपासून अधिक काळ एकसंध राहण्यासाठी त्यांनी भारतीय राज्यघटनेत ज्या महत्त्वाच्या तरतुदी केलेल्या आहेत, त्या पाहणे गरजेचे आहे. आज जगाच्या पाठीवर भारत एकमेव असा देश आहे की, त्याच्या सभोवताली दोन अण्वस्त्रधारी राष्ट्रे आहेत, ती म्हणजे चीन व पाकिस्तान. या दोन्ही देशांपासून भारताच्या सुरक्षेला व एकतेला कसा धोका निर्माण होऊ शकतो, याबाबत बाबासाहेबांनी अतिशय महत्त्वाचे विचार मांडले आहेत. शिवाय अंतर्गत सुरक्षेच्या बाबतीत आज देशात नक्षलवाद, दहशतवाद, प्रांतीय व भाषेचे प्रश्न, जातीय व्यवस्थेवर असलेली विषमता, काश्मीर व उत्तर-पूर्व राज्यातील प्रश्न, उत्तर-पूर्व भारतातील मणीपूर, मिझोराम-नागालँड, महाराष्ट्र - कर्नाटक सीमाप्रश्न, कर्नाटक तामिळनाडू पाणी प्रश्न, विदर्भ, तेलंगणा व इतर ठिकाणी छोट्या राज्यांची मागणी असे विविध अंतर्गत प्रश्न आहेत. त्यामुळे भारताच्या सुरक्षेला बाहेरून नाहीतर अंतर्गत मोठी आव्हाने आहेत व या आव्हानांना तोंड देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे विचार मांडले आहेत, ते सध्याचे संघर्ष व त्याचे निवारण व व्यवस्थापनासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत. सुरक्षाविषयक मूलभूत संकल्पना आजच्या बदलत्या भूराजकीय व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे आंतरराष्ट्रीय घडामोडीत सुरक्षाविषयक धोरणाबाबत ज्या काही मूलभूत संकल्पना मांडल्या होत्या, त्या संकल्पना आजही कशा महत्त्वाच्या आहेत हे बघणे गरजेचे आहे. मुळातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आईवडिलांकडील बहुतेक नातेवाईकांना सैनिकी नोकरीची पार्श्वभूमी असल्याकारणाने बाबासाहेबांना भारताचे संरक्षण आणि सुरक्षिततेबाबत अतिशय प्रेम होते. जुलै १९४१ मध्ये ब्रिटिश सरकारने कार्यकारी मंडळाची पुनर्रचना व सदस्यांची वाढ करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कार्यकारी मंडळात संरक्षण सल्लागार समितीत निवड केली. त्यामुळे बाबासाहेबांनी दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी या समितीची जबाबदारी स्वीकारून, त्यांनी भारताच्या संरक्षण सिद्धतेबाबत व लष्करी शिक्षणासोबतच इतर महत्त्वाच्या बाबतींमध्ये आपले विचार राष्ट्रीय सुरक्षेच्या मंडळात मांडले. दुसऱ्या महायुद्धाला ३ सप्टेंबर १९३९ रोजी नाझी जर्मनीने पोलंडवर कब्जा केल्यानंतर सुरुवात झाली. त्याच वेळेस डॉ. बाबासाहेबांनी भारताने आपल्या सुरक्षिततेसाठी व जागतिक सुरक्षेतेबाबत नाझी जर्मनीचा विरोध करावा व त्यासाठी भारत सरकारने प्रयत्न करावेत अशी भूमिका घेतली. त्याचबरोबर ब्रिटिश सरकारने गोलमेज परिषदामध्ये जी आश्वासने दिली होती, त्या आश्वासनांची पूर्तता करावी. त्यात प्रामुख्याने भारताच्या सुरक्षिततेची हमी होती. शिवाय गोलमेज परिषदांमध्ये बाबासाहेबांनी भारतीय युवकांना ठरावीक वयानंतर लष्करी शिक्षण सक्तीचे करावे व जेणेकरून त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होईल. शिवाय चांगले सुदृढ प्रशासकीय अधिकारी निर्माण व्हावे त्यासाठी लष्करी शिक्षण हे सक्तीचे करावे ही मागणी केली. लष्करात भरती करताना सर्वांना ती खुली करण्यात यावी सर्व

जातिधर्माच्या लोकांना लष्करात सामावून घ्यावे अशी बाजू बाबासाहेबांनी राष्ट्रीय सुरक्षा मंडळाचे सदस्य असताना घेतली. त्याच बरोबर दुसऱ्या महायुद्धाचे वर्णन करताना युद्ध हे केवळ कोणत्या प्रदेशाचेच विभाजन करत नाही तर मानवामानवांत एक मूलभूत बदल घडवून आणते. त्यात राष्ट्राराष्ट्रांत बदल होतो. त्यामुळे आपली संस्कृती आणि मूल्ये यात बदल होतो. म्हणून युद्ध थांबवणे व नाझी वादावर विजय मिळवणे हे सर्वांच्या हिताचे आहे, असे त्यांचे म्हणणे होते. नाझीवादाद्वारे झालेल्या युद्धामुळे स्वातंत्र्या बंधुता, समानता निर्माण होणार नाही. त्यामुळे अशा सर्व प्रवृत्तीवर विजय मिळणे गरजेचे आहे. म्हणून त्यांनी नाझीवादाच्या विरोधात भूमिका घेऊन युद्धाचे समर्थन करून नवीन समता, बंधुता, स्वातंत्र्य, न्याय, प्रस्थापित व्हावा, नाझीवादामुळे निर्माण झालेले वांशिक प्रश्न, शांतता निर्माण करणे गरजेचे आहे व शांतता टिकविण्यासाठी सर्वांची गरज आहे, असे दोन भिन्न संस्कृतीचे प्रश्न हे केवळ युद्ध केल्यावर संपणार नाहीत, असे प्रतिपादन केले.

महत्त्वाची कलमे



बाबासाहेब आंबेडकरांनी देशाची एकता आणि अखंडता टिकवण्यासाठी भारतीय राज्यघटनेत ३५२, ३५६, ३६० अशी तीन कलमे समाविष्ट केली आहेत. वरील तीनही कलमे आणीबाणीविषयक असून ३५२ कलम म्हणजे परकीय राष्ट्रांपासून जेव्हा भारताच्या सार्वभौमत्वाला धोका निर्माण होतो, तेव्हा राष्ट्रपतींनी त्याचा वापर करून राष्ट्रीय आणीबाणी जाहीर करायचा अधिकार दिलेला आहे. ३५६ म्हणजे एखादा समूह किंवा एखाद्या राज्यात राजकीय अस्थिरता निर्माण झाली किंवा कोणतेही राज्य फुटीरतावादी भूमिका घेत असेल त्या वेळेस केंद्र सरकारने ३५६ कलमाचा वापर करून त्या ठिकाणी त्या राज्यात आणीबाणी जाहीर करून तो प्रांत भारतापासून वेगळा होऊ नये किंवा राजकीय अस्थिरता निर्माण होऊ नये यासाठी या कलमाचा वापर केला जातो. जेव्हा राष्ट्रीय आर्थिक संकट निर्माण होते तेव्हा ते संकट दूर करण्यासाठी राष्ट्रपती ३६० कलमाचा वापर करतात. वरील तीनही कलमांपैकी ३५६ कलम हे राष्ट्रीय एकता आणि अखंडतेसाठी अतिशय महत्त्वाचे आहे. गेल्या सहा दशकांपासून भारत आपल्यास एकसंध दिसतो तो केवळ ३५६ कलमामुळे. जम्मू-काश्मीर, पंजाब, उत्तर-पूर्व राज्ये आज भारतात आहेत, त्याचे महत्त्वाचे कारण ३५६ कलम हे होय. या कलमांबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेत अतिशय महत्त्वाची भूमिका मांडली आहे. त्याचबरोबर या कलमांबाबत धोकाही त्यांनी सांगितला आहे. भारतासारख्या बहुजातीय, बहुधर्मीय लोकसंख्या असलेल्या देशाची जर एकता आणि अखंडता टिकवायची असेल तर केंद्र सरकार हे प्रबळ असले पाहिजे. वेगवेगळ्या वादांमुळे अंतर्गत सुरक्षा व्यवस्थापन करणे कठीण होत आहे व दहशतवाद, नक्षलवाद हे प्रश्न अधिक कठीण होत आहेत. त्यामुळे पुन्हा आपल्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांकडे जाणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते एक भाषा अनेक राज्ये निर्माण झाली पाहिजेत व राज्यांची लोकसंख्या ही दोन कोटी एवढी असावी अशी भूमिका त्यांनी भाषावार प्रांतरचनेबाबत मांडली. ती भूमिका मांडताना त्यांनी सांगितले की, फजल अली आयोगाने दक्षिणेकडील राज्ये छोटी केली तर उत्तरेकडील राज्ये मोठी केली. त्यामुळे खऱ्या अर्थाने लोकशाहीचे विकेंद्रीकरण होणार नाही, कारण दक्षिण विरुद्ध उत्तर हा वांशिक प्रश्न आहे. शिवाय यामुळे प्रत्येक राज्यात मोठ्या जातीचे लोक हे त्या-त्या राज्यात अल्पसंख्याक व दलित समूहाला सत्तेमध्ये सामावून घेतील की नाही, याबाबत त्यांच्या मनात सांशकता होती. म्हणून त्यांनी लहान राज्याच्या निर्मितीसाठी पाठिंबा दिला.

राष्ट्रीय एकात्मता

डॉ. बाबासाहेबांच्या मतानुसार जोपर्यंत भारतात जातीय व्यवस्थेमुळे असलेली सामाजिक व आर्थिक विषमता दूर होत नाही, तोपर्यंत खऱ्या अर्थान भारताची एकता, एकात्मता व अखंडता अबाधित राहणार नाही. बाबासाहेबांचे राष्ट्रीय एकात्मतेविषयी सर्व विचार आपल्याला भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये



पाहावयास मिळतात. या सरनाम्यामध्ये भारत हे धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र असेल, (धर्मनिरपेक्ष शब्दाचा वापर नंतर करण्यात आलेला आहे) तसेच सामाजिक समता, सामाजिक न्याय, बंधुता या उद्दिष्टांसाठी त्यांचा कारभार चालेल. सामाजिक न्याय हे मूल्य कामगार, शेतकरी, दलित, स्त्रिया यांच्या विकासाबरोबरच त्यांना राष्ट्राच्या विकासात केंद्र स्थानावर आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. आज भारत महासत्ता होण्याची जी स्वप्ने पाहत आहे, त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे गेल्या काही दशकांत भारतीय राज्यघटनेमुळेच येथील दलित बहुजन समाज हा राष्ट्रीय विकासाच्या केंद्रस्थानी आल्यामुळेच भारताचा काही प्रमाणात विकास व आर्थिक सुबत्ता आलेली आहे हे सत्य नाकारता येत नाही.

एक नागरिकत्व

बाबासाहेबांच्या मते - एक नागरिकत्व व एक न्यायप्रक्रियेमुळे राष्ट्राची सुरक्षा ही चांगल्या प्रकार टिकवता येते. एक नागरिकत्वामुळे व एक न्यायालयीन



व्यवस्थेमुळे लोकांमध्ये एकात्मतेची भावना निर्माण होते, काश्मीर ते अंदमान निकोबारपर्यंत एक नागरिकत्व व एक न्यायव्यवस्थेमुळे राज्यघटनेतच राष्ट्रीय एकात्मता आणि सुरक्षेची संकल्पना मांडली आहे. आज जरी भारत जाती, धर्माच्या नावावर विखुरलेला असला तरी भारतीय राज्यघटनेच्या तरतुदींशी भारतीय लोक काही प्रमाणात प्रामाणिक आहेत. एक नागरिकत्व व एक न्यायव्यवस्थेमुळे भारताच्या इतिहासात प्रथमच भारतीय लोक एकत्र आलेले आहेत. त्याचबरोबर एक नागरिकत्वामुळे सर्व जनतेला समान कायदे लागू होतात व राज्यकारभार चांगल्या पद्धतीने चालवता येतो. म्हणून एक नागरिकत्व व एक न्यायव्यवस्थेमुळे भारताची राष्ट्रीय सुरक्षा, भारताची एकात्मता आणि अखंडता भक्कम होण्यास मदत होत आहे.

विभागीय एकात्मता

भारताच्या सुरक्षा आणि एकात्मतेसाठी दक्षिण आणि उत्तरेत झालेल्या विभागणीला डॉ. बाबासाहेबांचा विरोध होता. त्यांच्या मतानुसार भारताची एकता आणि अखंडता अधिक प्रभावी करण्यासाठी प्रत्येक भारतीयाने प्रांतीय व विभागीय ज्या भावनात्मक गोष्टी आहेत त्या दूर करून भारताच्या सर्वांगीण विकासासाठी राज्यांची पुनर्रचना करणे गरजेचे आहे. एकच भाषा जास्त बोलणाऱ्या लोकसंख्येसाठी एका स्वतंत्र राज्याची संकल्पना बाबासाहेबांना मान्य नव्हती. एकभाषीय लोकसंख्येमुळे वांशिक, भाषिक असे स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करतील. त्यामुळे विभागीय असमतोल व भाषीय, प्रांतीयवाद निर्माण होईल. शिवाय भारताच्या अंतर्गत सुरक्षेच्या बाबतीतही विविध प्रश्न निर्माण होतील. बाबासाहेबांच्या मते एकच भाषा बोलणारे जर विविध प्रांतात विभागले गेले तर त्यांच्यात प्रांतीय व भाषीय अशी भावना निर्माण होणार नाही. लहान राज्यांमुळे राष्ट्राचा विकास चांगला होऊ शकतो. शिवाय जी मोठी राज्ये पुनर्रचना आयोगाद्वारे निर्माण केली आहेत, त्या मोठ्या राज्यांचीही लहान राज्यात निर्मिती करावी, म्हणजे प्रशासकीय कामे व राष्ट्राच्या एकात्मतेची भावना अधिक बळावते. शिवाय लहान राज्ये ही केंद्र सरकारला आव्हान देऊ शकत नाही. म्हणून बाबासाहेबांनी लहान राज्ये व्हावीत, अशी सूचना राज्य पुनर्रचना आयोगास केली.

दुसऱ्या राजधानीची मागणी

बाबासाहेबांनी भारताच्या सुरक्षिततेचा विचार मांडताना, भारताचा सर्वांगीण विकास व सर्वसमावेशक ध्येयधोरणांद्वारे प्रत्येक बाबतीत विश्लेषण केले आहे. संरक्षण आणि परराष्ट्र धोरणास पूरक असणाऱ्या महत्त्वाच्या मुद्यावर आपले विवेचन केले आहे. त्यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे लष्करीदृष्ट्या व सामरिकदृष्ट्या भारताच्या भौगोलिक बाबतीचा विचार करून त्यांनी दुसऱ्या राजधानीची मागणी केली आहे. त्याची प्रामुख्याने दोन कारणे ते देतात. एक तर उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांच्यातील जो क्षेत्रीय व वांशिक वाद आहे तो कमी होईल. शिवाय दिल्ली हे चीन आणि पाकिस्तानच्या लष्करी सामर्थ्यासमोरचे सर्वात जवळचे शहर आहे. म्हणून दक्षिणेकडील हैदराबाद व सिकंदराबाद व शेजारील प्रांताचे एकत्रीकरण करून, त्याचे प्रमुख प्रशासकीय विभाग निर्माण करून; त्या ठिकाणी दुसऱ्या राजधानीची स्थापना करावी जेणेकरून, भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून व प्रशासकीय कामे लवकर होण्यासाठी व उत्तर व दक्षिण भारतातील दरी कमी होऊन देशात राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण होईल.

डॉ. बाबासाहेबांच्या संपूर्ण चळवळीत व लिखाणात एकच ध्यास होता, तो म्हणजे भारतात जातीविरहित व वर्णविरहित समाज निर्माण करण्याचा व त्यासाठी त्यांनी संपूर्ण आयुष्य वेचले. त्यांच्या सामरिक विचारांची मुळे भारतीय राज्यघटनेत परिवर्तित होतात. त्यामुळे भारताची राज्यघटना जगात सर्वात श्रेष्ठ राज्यघटना आहे.

(लोकराज्य एप्रिल २०१६ मधून पुनर्मुद्रित)

माणुसकीचा नवा दृष्टिकोन देणारे महामानव



■ डॉ. सुरेंद्र राजाराम शिंदे, ठाणे

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन म्हणजे सामाजिक न्याय आणि मानवी हक्कांच्या अंमलबजावणीचा जिवंत दस्तऐवज आहे. 'अत्त दीप भव' या बुद्ध वचनाप्रमाणे स्वतः प्रकाशमान होऊन करोडो आयुष्यात परिवर्तनाचा उजेड पाडणाऱ्या या महामानवाचे विचार आजही तितकेच प्रासंगिक आहेत. शिक्षणातून परिवर्तन, मतदानातून सत्ता आणि धम्मातून सदाचार अशी त्रिसूत्री मांडणाऱ्या बाबासाहेबांच्या क्रांतिकारी वाटचालीवर आणि त्यांच्या सामाजिक कर्तव्याच्या संकल्पनेवर प्रकाश टाकणारा हा लेख.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या देशातील आधुनिक काळातील एक महान तत्त्ववेत्ते विचारवंत, राष्ट्रनिर्माते, महान समाजसुधारक, ज्ञानाचे प्रतिक आणि शोषित, पीडीत व वंचित समाजाच्या मानवी हक्कांकरिता लढणारे क्रांतिवीर होते. त्यांनी देशाच्या प्रगतीसाठी अनेक महत्त्वाचे विचार मांडलेत. ज्यांचा प्रभाव आजही भारतीय समाजात स्पष्टपणे दिसून येतो.

आजही समाजात सामाजिक विषम ता जातीवाद, लिंगभेद, आणि आर्थिक विषमता आढळून येते. मागासवर्गीय, आदिवासी, महिला आणि अन्य वंचित वर्गांत हक्क, सन्मान आणि समान संधींचा अभाव आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार, आणि सामाजिक न्यायाच्या बाबतीत प्रचंड प्रमाणात विषमता आढळून येते. अशा प्रकारच्या असलेल्या या विषमतायुक्त समाजात असंतोष आणि संघर्षही वाढले आहेत. त्यामुळे आजही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची आवश्यकता आहे.

डॉ. आंबेडकर यांना जागृत समाज अपेक्षित होता. जागृत समाज हा असा समाज आहे, ज्यात प्रत्येक सदस्याला त्याच्या मूलभूत अधिकारांची जाणीव असते आणि सामाजिक असमानता, जातिवाद, भेदभाव या समस्यांविरुद्ध उभे राहणे अपेक्षित असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, जागृत समाज हा एक असा समाज आहे जो समानता, सामाजिक न्याय, आणि आध्यात्मिक उन्नतीच्या मार्गावर चालणारा असावा. त्याचा उद्देश समाजातील सर्व घटकांना समान हक्क देणे, जातिवाद, भेदभाव, आणि शोषणाचा निषेध करणे, आणि शिक्षण आणि जागरूकतेच्या माध्यमातून सामाजिक सुधारणा घडवून आणणे हा होता.

देशातील ८५ टक्के बहुजन समाजाच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य ऐतिहासिक आणि महत्वपूर्ण ठरले. त्यांचा संघर्ष देशातील सर्व मागासवर्गीय, आदिवासी, श्रमिक वर्ग, आणि आर्थिक दृष्ट्या वंचित समाज या सर्व समूहांसाठी होता. त्यांनी भारतीय समाजात असलेला जातिवाद, अस्पृश्यता, आणि सामाजिक विषमतेच्या विरोधात मोठा लढा दिला. त्यांचे कार्य सामाजिक न्याय, समान हक्क, आणि सामाजिक उन्नती कशी साधता येईल, यावर केंद्रित होते. त्यांनी आपल्या जीवनात ८५ टक्के बहुजन समाजासाठी संविधानाच्या माध्यमातून असंख्य सामाजिक, शैक्षणिक, आणि राजकीय सुधारणा केल्यात. यांच्या कार्यामुळे भारतातील बहुजन समाजाला समान हक्क, शिक्षणाची संधी, आणि राजकीय प्रतिनिधित्व मिळाले, जे समाज आणि देशाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार होते. भारतीय संविधान तयार करण्याच्या प्रक्रियेत त्यांचे अतिशय मौलिक योगदान राहिले. भारतीय संविधानात त्यांनी सर्व नागरिकांसाठी समान हक्क आणि संधी सुनिश्चित केली.

सर्व जाती-धर्माच्या लोकांना समान हक्क मिळावेत यासाठी घटनात्मक तरतुदी केल्यात. त्यांनी समाजातील प्रत्येक वर्गाच्या कल्याणासाठी एकतेचा मार्ग दाखवला आणि आपले जीवन समतेच्या, न्यायाच्या आणि सामाजिक परिवर्तनाच्या ध्येयासाठी समर्पित केले. त्यांच्या संघर्षामुळे मागासवर्गीयांना, आदिवासी, आणि अन्य वंचित वर्गाच्या लोकांना समान हक्क मिळून त्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.


भारतीय संविधान हे भारतीय लोकशाहीचे आणि सामाजिक लोकशाही सुनिश्चित करणारा एक अत्यंत महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे. हे संविधान देशाच्या विविध क्षेत्रांमध्ये समानता, न्याय, आणि अधिकारांचे संरक्षण करण्याचा मार्गदर्शक ठरले. आरक्षण हे एक सामाजिक न्याय प्राप्त करण्याचे एक साधन आहे, ज्याचा उद्देश वंचित आणि अस्पृश्य समाजाला समान संधी देणे हा आहे. आरक्षणामुळे प्रत्येक व्यक्तीला समान संधी मिळून त्यांना आर्थिक, शैक्षणिक, आणि सामाजिक प्रगती करण्याचा मार्ग मिळतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात 'एक व्यक्ती, एक मूल्य, एक मत' ही संकल्पना मांडली. त्यांनी मतदानाचा उपयोग नागरिकांच्या अधिकारांचा, समाजाच्या प्रगतीचा आणि राजकीय बदलाचा एक प्रभावी साधन म्हणून केला. डॉ. आंबेडकर यांचा विश्वास होता की, मतदान हे एक महत्त्वाचे हत्यार आहे, जे लोकशाही प्रक्रियेत समानता, सामाजिक न्याय आणि स्वातंत्र्य यांचा वास्तविक प्रभाव निर्माण करू शकते. त्यांनी मतदानास लोकशाहीतील शक्तीचे प्रतीक मानले.


डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, लोकशाही ही एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि प्रभावी अशी राजकीय प्रणाली आहे. त्यामुळे सर्व नागरिकांना समान हक्क, स्वातंत्र्य आणि न्याय मिळू शकतो. त्यांचा विश्वास होता की, लोकशाही ही केवळ एक राजकीय प्रणाली नाही, तर ती समाजातील प्रत्येक घटकाला सशक्त बनवणारी एक तत्त्वज्ञान आहे, जी सामाजिक न्याय, समानता, आणि भेदभावमुक्त समाज स्थापनेसाठी महत्त्वपूर्ण आहे.

स्त्रियांविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका व त्यासंदर्भात त्यांनी केलेले कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. डॉ. आंबेडकर हे सामाजिक न्याय, समानता, आणि स्त्री-पुरुष समानतेसाठी कार्यरत असलेले एक महत्त्वाचे महापुरुष होते. त्यांचे विचार आणि कार्य आजही समाजातील स्त्रियांच्या हक्कांसाठी लढा देणाऱ्या व समाजातील समानतेची गुढी उभारणाऱ्या व्यक्तींसाठी प्रेरणादायक आहेत. त्यांनी स्त्रियांविषयी केलेले कार्य आणि दृष्टिकोन आजही समाजातील महिलांसाठी प्रेरणादायक आहे. त्यांचे समानता, शिक्षण, स्वातंत्र्य आणि स्त्री पुरुष समानतेसाठी दिलेले योगदान अत्यंत मौल्यवान आहे. त्यांनी स्त्रियांना सामाजिक, धार्मिक आणि राजकीय हक्कांमध्ये समानता मिळवून देण्यासाठी प्रचंड कार्य केले. .

डॉ. आंबेडकर यांचा बुद्ध धम्म स्वीकारण्याचा निर्णय अत्यंत ऐतिहासिक आणि संघर्षात्मक होता. ते एक द्रष्टे नेते होते. बुद्धाच्या स्वातंत्र्य, बंधुता, समता, करुणा या विचारांमुळे ते बुद्ध धम्माकडे आकृष्ट झालेत. त्यांच्यासाठी बुद्धाचे जीवन आणि त्याची तत्त्वे एक मार्गदर्शक



डॉ. आंबेडकर हे सामाजिक न्याय, समानता, आणि स्त्री-पुरुष समानतेसाठी कार्यरत असलेले एक महत्त्वाचे महापुरुष होते. त्यांचे विचार आणि कार्य आजही समाजातील स्त्रियांच्या हक्कांसाठी लढा देणाऱ्या व समाजातील समानतेची गुढी उभारणाऱ्या व्यक्तींसाठी प्रेरणादायक आहेत.



ठरलीत. त्यांनी बुद्ध धम्माचा माणुसकीचा नवा दृष्टिकोन समाजाला दिला. त्यांनी सर्व शोषित, पीडित आणि उपेक्षित समाजाच्या लोकांना एका नव्या आशेचा प्रकाशकिरण दाखवला. त्यांचा बुद्ध धम्म स्वीकारण्याचा निर्णय भारतीय समाजातील असमानता, अन्याय, आणि भेदभावाच्या विरोधातील एक महत्त्वपूर्ण पाऊल होते. ज्यामुळे पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य समाजात एक नवीन क्रांती घडवून आली.

डॉ. आंबेडकर यांनी भारतातील शोषित, वंचित, दीनदुबळे आणि पीडित वर्गासाठी एक नवा मार्ग दाखवला, जो सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि राजकीय दृष्टीने सशक्त होण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला. त्यांचा विश्वास होता की, समाजाच्या सर्व स्तरांमध्ये समानता, बंधुत्व आणि न्याय यांची स्थापना केली पाहिजे. त्यांनी भारतीय समाजाला जातिवाद, असमानता आणि शोषणापासून मुक्त होण्यासाठी एक दृष्टी दिली. सामाजिक समानता, शिक्षण, राजकीय सशक्तीकरण, आणि बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रसार या सर्वांनी समाजाला एक नवा मार्ग दाखवला, जो सामाजिक परिवर्तनासाठी महत्त्वपूर्ण ठरला.

त्यांचा जीवनसंघर्ष समाजातील प्रत्येक व्यक्तीला स्वाभिमान, समानता आणि न्याय मिळवण्यासाठी प्रेरित करणारा होता आणि तो आजही प्रासंगिक आहे. सामाजिक आणि आर्थिक न्याय आणि सर्वधर्मसमभावाचा आदर यामुळे एक चांगला आणि सशक्त समाज निर्माण होईल. सामाजिक न्याय, शिक्षण, स्वाभिमान, आणि एकात्मता यांचा विचार करून समाजाच्या उद्धारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या मार्गदर्शनाच्या पद्धतीने आम्ही अधिक प्रगती करू शकतो.


शिक्षण व परिवर्तन यांचा संबंध अत्यंत महत्त्वपूर्ण आहे, कारण शिक्षणच समाजातील बदल आणि सुधारणा घडवण्याचे सर्वात प्रभावी आणि पायाभूत साधन आहे. शिक्षण म्हणजे केवळ ज्ञान मिळवणे नाही, तर ते समाजातील प्रत्येक व्यक्तीला विचारशक्ती, स्वाभिमान आणि अधिकारांची जाणीव देते, विचारधारेमध्ये परिवर्तन आणते आणि सामाजिक समानता आणि न्याय प्राप्त करण्यासाठी मार्गदर्शन करते. परिवर्तन हे शिक्षणाच्या माध्यमातून साधता येते, कारण शिक्षणानेच व्यक्ती आणि समाजाची मानसिकता बदलू शकते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टिकोनातून शिक्षणाचे महत्त्व आणि त्याचा परिवर्तनाशी असलेला संबंध विषद करावयाचा झाल्यास शिक्षण हे केवळ ज्ञान देण्याचे साधन नाही, तर ते एक परिवर्तनकारी शक्ती आहे. शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्ती आणि समाजाचे मानसिक, सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक परिवर्तन होऊ शकते.

समाजाचे एकत्रीकरण हे समाजातील विविधतेचा आदर, सामाजिक समानता, शिक्षण, धार्मिक सहिष्णुता, सामाजिक न्याय आणि सामूहिक सहभाग या तत्त्वांवर आधारित असायला हवे. या सर्व बाबींचा समावेश करून, समाजातील प्रत्येक घटक एकत्र येऊन समाजाच्या प्रगतीसाठी, एकतेसाठी आणि न्यायासाठी काम करू शकतात. सामाजिक एकतेचे उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला त्याच्या कर्तव्यातून योगदान द्यायला हवे. त्याच बरोबर समाजाचे सामाजिक कर्तव्ये हे समानता, न्याय, समता, आणि सहकार्यावर आधारित आहेत. समाजाच्या प्रत्येक घटकाने आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीने समाजाच्या प्रगतीत योगदान देणे, दीन-दुबळ्यांना मदत करणे, आणि सामाजिक न्याय सुनिश्चित करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. सामाजिक कर्तव्ये पार पाडल्यामुळे समाजाला समग्र विकास, एकता, आणि सामाजिक न्याय साधता येईल.

समाजातील सर्व वंचित, शोषित, आणि मागासवर्गीय लोकांना समतेच्या आधारावर आर्थिक, सामाजिक, आणि सांस्कृतिक उन्नती मिळवून देणे. शिक्षण, संविधान, राजकीय हक्क, धर्मनिरपेक्षता, आणि सामाजिक न्याय यावर आधारित एक सशक्त राष्ट्र उभे करणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. त्यांच्या विचारांच्या आधारे एक न्याय्य आणि समानतावादी समाजाची स्थापना होईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत भगवान बुद्ध यांचे विचार आजही सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात अतिशय महत्त्वपूर्ण आहेत. त्यांचे विचार समानता, बंधुत्व, आणि न्याय या तत्त्वांवर आधारित होते आणि आजही ते समाजात प्रचलित असलेल्या भेदभाव आणि विषमतांच्या विरोधात लढण्याची प्रेरणा देतात. समाज सुधारणा, शिक्षण, अध्यात्मिक विकास साधून 'अत्त दीप भव!' प्रमाणे स्वतः प्रकाशून इतरांनाही प्रकाशमय करण्याची त्यांची शिकवण आजही प्रेरणादायी असा स्फूर्तीचा अखंड झराच आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन अतिशय संघर्षमय होते. त्यांचे जीवन समतेच्या, न्यायाच्या, आणि सामाजिक परिवर्तनाच्या संघर्षाचे प्रतीक बनले आहे. त्यांनी समाजातील वंचित, शोषित आणि महिलांच्या उन्नतीसाठी त्यांचे समर्पण आणि संघर्ष आपल्या देशाच्या इतिहासात महत्त्वपूर्ण ठरला आहे. त्यांचे देशातील सामाजिक व्यवस्थेत मूलगामी परिवर्तन घडवून आणण्यासाठी त्यांचा प्रचंड संघर्ष करावा लागला. त्यांचा हाच संघर्ष आधुनिक भारत घडविण्याच्या संदर्भात सर्वांना मार्गदर्शक ठरणार आहे.



मानवी हक्कांचे प्रणेते
डॉ. बाबासाहेब आंबेडकर

■ डॉ. प्रदीप आगलावे

शेकडो वर्षांची सामाजिक विषमता मोडीत काढून 'माणूस' म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून देणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संघर्ष अद्वितीय आहे. पाण्यासाठी केलेला सत्याग्रह असो किंवा धर्मांतराचा ऐतिहासिक निर्णय, यामागे केवळ आणि केवळ मानवी हक्कांची जपणूक हाच मुख्य उद्देश होता. भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून त्यांनी केवळ हक्कच दिले नाहीत, तर समतेवर आधारित आधुनिक भारताची पायाभरणी केली. त्यांच्या याच प्रेरणादायी जीवनकार्यावर टाकलेला एक दृष्टिक्षेप

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन हे समस्त शोषित, पीडित समाजाकरिता आदर्श, मार्गदर्शक आणि प्रेरणादायी आहे. ते आयुष्यभर वंचित लोकांच्या हक्कांकरिता लढले. भारतातील दलित, पीडित, वंचित आणि शोषित लोकांना त्यांचे मानवी हक्क मिळवून देण्याकरिता महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर प्रचंड संघर्ष केला. म्हणून त्यांचे जीवन म्हणजे मानवी हक्कांकरिता केलेल्या संघर्षांचा जिवंत इतिहास होय.

महान पुरुषांचे जीवनचरित्र हे लोकांच्या जीवनास प्रभावित करीत असते. भीमराव आंबेडकर हे दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर कृष्णराव अर्जुन केळुस्कर गुरुजी यांनी स्वतः लिहिलेले 'बुद्ध चरित्र' त्यांना भेट दिले होते. 'The Buddha And His Dhamma' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नमूद केले की, दादासाहेब केळूसकरांनी दिलेल्या पुस्तकाच्या मदतीने मी बुद्धाकडे वळलो. मी लहान वयात बुद्धाकडे गेलो खरा, पण कोऱ्या मनाने नव्हे.' (I turned to Buddha with the help of the book given to me by Dada Keluskar. It was not with an empty mind that I went to the Buddha at an early age.) यावरून हे स्पष्ट होते की, महान पुरुषांच्या जीवनचरित्राचा लोकांच्या जीवनावर विशेष प्रभाव पडतो.

डॉ. आंबेडकरांचे जीवन : मानवी हक्कांच्या संघर्षाचा इतिहास

अस्पृश्यांना माणूस म्हणून कोणत्याही प्रकारचे अधिकार नव्हते. अशा शेकडो वर्षांपासून धर्माच्या नावावर वंचित असलेल्या लोकांना जागृत करून, त्यांच्यामध्ये स्वाभिमान निर्माण करणे आणि त्यांना अधिकार मिळवून देण्याकरिता संघर्ष करणे, हे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आयुष्यभर केले. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन म्हणजे मानवी हक्कांच्या संघर्षाचा इतिहास होय.

त्यांचा संघर्ष हा मानवी अधिकारांसाठी होता. देशातील प्रस्थापित धर्माच्या आधारावर निर्माण केलेली जातिव्यवस्था नष्ट झाली पाहिजे, असे डॉ. आंबेडकरांचे स्पष्ट मत होते. जातिव्यवस्था ही विषमताधिष्ठित आहे. व्यक्तीपेक्षा जात महत्त्वाची मानली जाते. म्हणून व्यक्तीची ओळख हीच मुळात व्यक्तीच्या जातीवरून व्हायची. अशा या जातिव्यवस्थेच्या विरोधात आणि अस्पृश्यांना मानवी हक्क मिळवून देण्यासाठी बाबासाहेबांना फार मोठा संघर्ष करावा लागला.

अस्पृश्य लोकांविषयी कुणाला सहानुभूती नव्हती. त्यांना त्यांचे प्रश्न मांडता येत नव्हते. म्हणून डॉ. आंबेडकरांनी शाहू छत्रपती महाराज यांनी दिलेल्या आर्थिक सहकार्यातून ३१ जानेवारी १९२० रोजी 'मूकनायक' हे पाक्षिक सुरू केले. शेकडो वर्षांपासून 'मूक'असलेल्या अस्पृश्य लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी, त्यांचे नेतृत्व करण्यासाठी त्यांनी आपल्या पाक्षिकास 'मूकनायक' हे नाव दिले होते.

अमेरिका आणि इंग्लंड येथील विद्यापीठातून 'पीएच. डी.', 'डीएस. सी.' आणि 'बॅरिस्टर' या पदव्या मिळवून ते भारतात परत आले. मुंबईच्या उच्च न्यायालयात त्यांनी वकिली सुरू केली. २० जुलै १९२४ रोजी त्यांनी 'बहिष्कृत

हितकारणी सभे'ची औपचारिकरीत्या स्थापना केली. या सभेचे बोधवाक्य 'शिका, चळवळ करा, संघटित व्हा!' असे होते.

महाडचा सत्याग्रह : मानवी हक्कांची अंमलबजावणी

अस्पृश्यांच्या नागरी हक्कांची अंमलबजावणी करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी १९ आणि २० मार्च १९२० ला महाड येथे सत्याग्रह आयोजित केला. भारताच्या इतिहासामधील मानवी हक्कासाठी करण्यात आलेला हा पहिला सत्याग्रह ठरला.

भारतात मानवी हक्कांची अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात २० मार्च १९२७ हा दिवस क्रांतिकारी ठरला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाड तलावाच्या काठावर उभे होते. त्यांच्या सोबत शेकडो वर्षांपासून वंचित, शोषित आणि असाहाय्य परिस्थितीत असलेले दुबळे अस्पृश्य बांधव होते. बाबासाहेबांच्या विचारांमुळे या दुबळ्या लोकांच्या मनात प्रचंड बळ आले होते. बाबासाहेबांच्या भाषणामुळे 'आम्हीही माणसं आहोत! आम्हाला देखील तळ्याचे पाणी पिण्याचा हक्क आहे.' याची अस्पृश्यांना जाणीव झाली होती.

बाबासाहेब तळ्याचे पाणी आपल्या ओंजळीत घेऊन प्यायले. त्यांच्या सोबत आलेल्या सर्व सत्याग्रह्यांनीदेखील तलावाच्या पाण्याला स्पर्श केला. त्यांनीसुद्धा तळ्याचे पाणी प्राशन केले, त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यांवर वेगळेच तेज झळकत होते. कारण त्यांनी आपला मानवी हक्क प्राप्त केला होता. म्हणून २० मार्च १९२७ हा दिवस मानवी हक्कांच्या अंमलबजावणीचा दिवस होता. बाबासाहेबांच्या सत्याग्रहामुळे महाडच्या चवदार तळ्याचे पाणी पेटले होते.

महाड येथे पुन्हा २५ ते २७ डिसेंबर १९२७ रोजी 'महाड सत्याग्रह परिषद' भरविण्यात आली होती. या परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या भाषणात स्पष्टपणे म्हणतात की, ''सत्याग्रह कमिटीने आपणास महाडला बोलाविले आहे, ते महाडच्या चवदार तळ्याचे पाणी पिण्यासाठी बोलाविले आहे, असा आपला समज होऊ देऊ नका. चवदार तळ्याचे पाणी प्यायल्याने



तुम्ही आम्ही अमर होऊ अशातला काही भाग नाही. चवदार तळ्यावर जायचे ते पाणी पिण्याकरिता जावयाचे नाही. इतरांप्रमाणेच आम्हीही माणसं आहोत हे सिद्ध करण्याकरिताच त्या तळ्यावर आपणास जावयाचे आहे. म्हणजे, ही सभा समतेची मुहूर्तमेढ रोविण्यासाठीच बोलाविण्यात आली आहे. या दृष्टीने या सभेचा विचार केला असता ती अपूर्व आहे.'' आपल्या सभेत व फ्रांसमधील व्हर्साय मुक्कामी ५ मे १७८९ रोजी भरलेल्या फ्रेंच लोकांच्या क्रांतिकारक राष्ट्रीय सभेत अत्यंत मोठे साम्य असल्याचे डॉ. आंबेडकरांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले. फ्रान्सच्या क्रांतिकारक राष्ट्रीय सभेत ठरलेल्या धोरणानुसार तीन महत्त्वाचे जाहीरनामे काढण्यात आले होते. या तीन जाहीरनाम्यांपैकी तिसरा जाहीरनामा विशेष महत्त्वाचा होता. याच जाहीरनाम्यास 'जन्मसिद्ध मानवी हक्कांचा जाहीरनामा' असे संबोधले जाते. हा मानवी हक्कांचा जाहीरनामा पुढे युरोपातील प्रत्येक राष्ट्राने स्वीकारला. आज तर संपूर्ण जगाने हा मानवी हक्कांचा जाहीरनामा मान्य केला आहे.

मूलभूत मानवी हक्क नाकारणारे धर्मग्रंथच अमान्य !

महाड सत्याग्रह परिषदेचे आणखी एक क्रांतिकारक पाऊल म्हणजे 'मनुस्मृती दहन' होय. 'मनुस्मृती' हा हिंदूंचा धर्मग्रंथ. या ग्रंथात कोणत्या वर्ण / जातीने कसे वागावे याचे नियम किंवा कायदे आहेत. मनुस्मृतीने शूद्र आणि स्त्रियांचे मूलभूत मानवी हक्क नाकारले होते. म्हणून जे धर्मग्रंथ शूद्र आणि अतिशूद्रांचे मूलभूत अधिकार नाकारतात; तेच धर्मग्रंथ आम्हाला मान्य नाही. अशी अत्यंत क्रांतिकारी भूमिका बाबासाहेबांनी घेतली होती. या परिषदेत मनुस्मृतीचे दहन करण्यात आले होते. यावरून हे स्पष्ट होते की, बाबासाहेबांचा संघर्ष हा मूलभूत मानवी हक्कांसाठी होता.

लंडन येथे आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या गोलमेज परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ब्रिटिश सरकारवर टीका केली. गोलमेज परिषदेत २० नोव्हेंबर १९३० रोजी त्यांनी केलेल्या भाषणात ते म्हणतात की, 'ब्रिटिशांनी आमच्याविषयी सहानुभूती दाखविली नाही किंवा ते आमच्या

स्थितीसंबंधी उदासीन राहिले म्हणून आम्ही त्यांना दोष देत आहोत, असे मात्र नव्हे. तर आम्हास असे आढळून आले की, आमचे प्रश्न हाताळण्यास ते पूर्णत: अकार्यक्षम आहेत.'

नाशिकचा मंदिर सत्याग्रह

नाशिक येथील काळाराम मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून डॉ. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली २ मार्च १९३० रोजी एक अधिवेशन नाशिक येथे आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनात त्यांच्या विचारप्रवर्तक भाषणात ते म्हणाले की, 'आज आम्ही मंदिरात प्रवेश करणार आहोत. परंतु मंदिर प्रवेशामुळे आपल्या सर्व समस्या सुटणार नाही. आमच्या समस्या व्यापक आहेत. त्याचे स्वरूप राजकीय, धार्मिक, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक आहे, परंतु आज आमचा मंदिर सत्याग्रह हा समाजास आव्हान देणारा आहे. शेकडो वर्षांपासून आम्हास मानवीय अधिकारांपासून वंचित ठेवले होते. या सत्याग्रहामुळे हे सिद्ध होणार आहे की, ते लोक आम्हाला मानवी अधिकार प्रदान करण्यास सहमत आहे की नाही. याचा निवाडा आता होणार आहे.' हा सत्याग्रह हिंदूंच्या मनास परिवर्तन करण्याचा एक प्रयत्न मात्र आहे. अशी विशुद्ध सात्त्विक भूमिका घेऊनच आम्ही सत्याग्रह करणार आहोत.'

यावरून हे स्पष्ट होते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संघर्ष हा केवळ पाण्यासाठी किंवा मंदिरप्रवेशांच्या संदर्भात नव्हता. तर त्यांचा संघर्ष हा मूलभूत हक्कांकरिता होता. महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह किंवा नाशिकचा सत्याग्रह हे प्रतिकात्मक संघर्ष होते. त्यांच्या या सत्याग्रहांना मूलभूत मानवी हक्कांची पार्श्वभूमी होती.

बाबासाहेब आंबेडकर यांनी मंदिर प्रवेश सत्याग्रह सुरू करताना २ मार्च १९३० रोजी आपल्या भाषणात सांगितले होते की, 'माणसाने माणसांशी माणसांसारखा व्यवहार करणे, माणसाला मानवतेचे अधिकार देणे, ही नवयुगाची उच्च प्रेरणा हिंदू मन मानण्यास तयार आहे की नाही या गोष्टीची परीक्षा होणार आहे.' नाशिकचा सत्याग्रह १९३४



पर्यंत म्हणजे पाच वर्ष सुरू होता. परंतु उच्च जातींच्या लोकांच्या मनात कोणतेच परिवर्तन झाले नाही. म्हणून बाबासाहेबांनी नाशिकचा सत्याग्रह बंद करण्याचा निर्णय घेतला. नाशिक जिल्ह्यातील येवले येथे १३ ऑक्टोबर १९३५ रोजी भरलेल्या अधिवेशनात मानवी हक्क नाकारणाऱ्या हिंदू धर्माचा त्याग करण्याचा ऐतिहासिक निर्णय त्यांनी घेतला.

पुढे बाबासाहेब म्हणतात की, ''आमच्या साऱ्या मानहानीचे, सवर्ण हिंदूंच्या आमच्या बाबतीत तुच्छतापर वर्तनाचे तेच एक कारण आहे. असे जर आहे, तर त्या धर्माच्या नावाचा केवळ शिक्का घेऊन बसण्यात काय अर्थ आहे? ज्याप्रमाणे आम्हाला मनुष्याच्या मोलाने राहता येण्यात सुद्धा मज्जाव केला जात आहे, त्या हिंदू धर्माच्या कलशाचा एक भाग होऊन आम्ही का म्हणून आयुष्य घालवावे? अशा स्थितीत राहण्यापेक्षा या धर्मातून बाहेर पडून दुसऱ्या एखाद्या धर्माचा ज्यामध्ये आपल्याला आज ही मानखंडना सहन करण्याचा प्रसंग येणार नाही, हलक्या नीच दर्जाने वावरण्याची सवय होणार नाही, त्या धर्माचा अंगीकार करणे उचितच नाही का?''

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना स्वतंत्र भारताची राज्यघटना लिहिण्याची संधी मिळताच त्यांनी धर्म, जात, संप्रदाय, लिंग आदी गोष्टींचा विचार न करता या देशातील सर्व भारतीय लोकांना सर्व मूलभूत अधिकार प्रदान केलेत. त्यामुळे शेकडो वर्षांपासून शोषित आणि वंचित असलेल्या



सर्व लोकांना आणि महिलांनादेखील मूलभूत अधिकार मिळालेत. माणसांमध्ये कोणतीही भेद न पाळणारे, माणुसकीचा आणि समतेचा विचार मांडणाऱ्या तथागत बुद्धाचा धम्म त्यांनी स्वीकारला आणि लाखो लोकांना 'बुध्द धम्मा' ची दीक्षा दिली.

अशा प्रकारचा डॉ. आंबेडकरांचा मानवी हक्कांकरिता असलेला हा संघर्ष या देशातील करोडो लोकांसाठी प्रेरणायी ठरला आहे. इतकेच नव्हे तर त्यांचा जीवन संघर्ष हंगेरी, आफ्रिका इत्यादी देशातील लोकांना देखील प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरला आहे.

ज्येष्ठ साहित्यिक आणि विचारवंत

आधुनिक भारताचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर

■ प्रा.डॉ. सरोज डांगे- श्यामकुवर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका विशिष्ट समाजाचे नेते नसून ते आधुनिक भारताचे खऱ्या अर्थाने निर्माते आणि थोर राष्ट्रप्रेमी होते. त्यांनी केवळ सामाजिक समतेचाच विचार केला नाही, तर देशाच्या आर्थिक स्थैर्यासाठी रिझर्व बँक आणि वित्त आयोगासारख्या स्वायत्त संस्थांची पायाभरणी केली. शेतीचे आधुनिकीकरण, जल व विद्युत धोरण, विम्याचे राष्ट्रीयीकरण आणि महिलांना कायदेशीर अधिकार देणारे हिंदू कोड बिल यांतून त्यांनी देशाच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा मांडला. भारतीय संविधानाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकता, अखंडता आणि मानवी प्रतिष्ठा जपण्याचे महान कार्य त्यांनी केले असून, त्यांचे विचार आजही भारताच्या प्रगतीसाठी दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरतात.

देशप्रेम म्हणजे काय तर आपल्या मातृभूमीबद्दल वाटणारा निस्सीम आदर, अभिमान, निष्ठा, प्रेम, आणि समर्पण भावना होय. राष्ट्रप्रेम हे फक्त सीमेवर लढण्यापुरते मर्यादित नसून देशाच्या विकासात योगदान देणे, देशाच्या प्रगतीसाठी आणि सुरक्षेसाठी वैयक्तिक त्याग करण्याची मानसिकता म्हणजे देशभक्ती. या अर्थाने डॉ. आंबेडकर हे भारतातील एक उच्चकोटीतील देशप्रेमी ठरतात.

बाबासाहेबांनी विद्यार्थीदशेपासून जे साहित्य निर्माण केले, त्यांस सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि आर्थिक अधिष्ठान आहे. त्यांचे अर्थशास्त्रीय लेखन प्रामुख्याने चलनविषयक प्रश्न आणि भारतीय रुपयाच्या स्थिरतेवर आहे. त्यांनी ब्रिटिश भारतातील केंद्रीय आणि प्रांतिक आर्थिक संबंधाचे विश्लेषण केले. त्यांनी इस्ट इंडिया कंपनीच्या आर्थिक धोरणाचे टीकात्मक विश्लेषण केले. प्रांतिक वित्ताचे विकेंद्रीकरण या विषयावर त्यांनी अभ्यासपूर्ण मांडणी केली. या प्रबंधाच्या माध्यमातून त्यांनी सरकारचे प्रशासन आणि वित्तीय व्यवहार कसे तत्कालीन भारतास घातक आणि विकासास मारक याचे विश्लेषण केले.

प्रांतिक वित्त व्यवस्थेच्या प्रशासकीय आणि वित्तीय अधिकार यांच्यातील मर्यादा त्यांनी दाखवून दिल्या. भारतीय शेतीतील समस्या, लहान जमीनजुमले, 'स्टेट अँड मायनॉरिटीज' या पुस्तकात स्वातंत्रोत्तर भारताची आर्थिक रचना, राज्याची भूमिका, आणि मूलभूत हक्कांचे आर्थिक पैलू मांडलेत.

रिझर्व बँकेची स्थापना:

डॉ. आंबेडकरांनी भारताच्या चलन आणि वित्त व्यवस्थेचा सूक्ष्म अभ्यास करून देशातील वित्तव्यवस्थेत स्थिरता आणि आर्थिक प्रगतीत सुधारणा करण्यासाठी स्वायत्त यंत्रणा किंवा केंद्रीय संस्था प्रस्थापित करण्याचे मत त्यांनी व्यक्त केले. बाबासाहेबांच्या सूचनेमुळे आणि त्या विषयातील त्यांच्या संशोधनामुळेच भारतात रिझर्व बँकेची स्थापन झाली.



वित्त आयोगाची स्थापना :

ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्तव्यवस्थेची उत्क्रांती या प्रबंधाच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांनी केंद्रीय सरकार आणि घटक राज्ये यांच्यामधील वित्तीय संबंधांवर प्रकाश टाकला. प्रांतीय वित्त व्यवस्थेचा उत्क्रांती केवळ वित्तीय समायोजन नव्हती, तर प्रांतीय सरकारांना त्यांच्या गरजेनुसार आर्थिक निर्णय घेण्याचे अधिकार मिळवून देणारी एक विकासात्मक प्रक्रिया होती. हा प्रबंध प्रादेशिक समतोल आणि वित्तीय विकेंद्रीकरणासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

याच प्रबंधाच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांनी सुचविलेल्या उपाययोजनांना सुनियोजित पद्धतीने अंमलात आणण्यासाठी



त्यांनी महसुलाच्या वितरणावर निर्णय देण्यासाठी व संसाधनच्या वाटपासाठी निव्वळ राजकीय किंवा कार्यकारी व्यवस्थेपेक्षा एक वैधानिक, नियतकालिक स्वतंत्र संस्थेच्या गरजेवर भर दिला. देशाच्या बदलत्या आर्थिक वास्तवाशी जुळवून घेण्याची क्षमता असलेले वित्त आयोग जन्मास आले.

डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्यानंतर निर्माण झालेल्या आर्थिक संकटाचा सामना करण्यासाठी आणि राज्यामधील विकास कामामधील असमतोल दूर करण्यासाठी १९५१ मध्ये वित्त आयोगाची स्थापना झाली. त्यांनी संभाव्य वित्तीय संघर्षाच्या मुद्दयावर तोडगा काढण्यासाठी एक अनोखी यंत्रणा वित्त आयोगाच्या स्वरूपात स्थापन केली. वित्त आयोग केवळ एक सल्लागार संस्था नाही. तो भारताचा वित्तीय संघराज्यवादाचा संस्थात्मक आधारस्तंभ आहे. संविधानाच्या अनुच्छेद २८० मध्ये नमूद केलेली ती एक अर्थन्यायिक संस्था आहे.

शेतीविषयक विचार :

बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू माणूस असल्याने त्यांनी माणसाला प्रभावित करणाऱ्या सर्व बाबींचा सूक्ष्मपणे विचार केला. डॉ. आंबेडकरांचे शेतीविषयक विचार हे मूलगामी ठरणारे आहेत. त्यांचे विचार हे आधुनिक, वैज्ञानिक आणि लोककल्याणकारी आहेत. जमिनीचे लहान तुकडे टाळण्यासाठी त्यांनी सामुदायिक शेतीचा पुरस्कार केला. शेतीच्या राष्ट्रीयीकरणाचा विचार मांडला. शेती फायद्यात आणण्यासाठी त्यांनी आधुनिक यंत्रे, रासायनिक खते, जल सिंचन सुविधा असे प्रतिपादन केले. शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करण्यासाठी त्यांनी वेगाने औद्योगीकरणाची शिफारस केली. शेती आधारित उद्योग आणि रोजगाराच्या संधी वाढविणारे उपाय सुचविले.

जल आणि विद्युत धोरण :

डॉ. आंबेडकरांचे जल आणि विद्युत धोरण हे आधुनिक भारताच्या जडणघडणीतील महत्त्वाचे धोरण आहे. त्यातून भारताच्या पायाभूत विकासाचा, औद्योगिक प्रगतीचा आणि शेतीच्या समृद्धीचा कणा मानला जातो. त्यांनी दामोदर व्हॅली, हिराकुंड, सोन नदी, भाक्रा नांगल या सारख्या बहुउद्देशीय नदी प्रकल्पाची पायाभरणी केली. त्यात फक्त सिंचनाचाच विचार केला नाही तर पूर नियंत्रण, वीज निर्मिती, जल वाहतूक आणि औद्योगिक विकास अशा विविध उद्दिष्टांसाठी नदी प्रकल्पाची संकल्पना मांडली. त्यांनी जलसंपत्तीच्या नियोजनासाठी सेंट्रल वॉटरवेज इरिगेशन, नेव्हीगेशन कमिशनची स्थापना केली. त्यांनी स्वस्त आणि शाश्वत ऊर्जेसाठी जलविद्युत निर्मितीवर भर दिला. संपूर्ण देशात विजेचे जाळे निर्माण करण्यासाठी सेंट्रल टेक्निकल पॉवर बोर्ड स्थापन केले.पाणी आणि जलस्रोत केंद्र सरकारच्या अखत्यारीत करण्याचा प्रयत्न केला.

विम्याचे राष्ट्रीयीकरण :

डॉ. आंबेडकरांनी १९५२ च्या निवडणुकीच्या जाहीरनाम्यात विम्याच्या राष्ट्रीयीकरणाचा मुद्दा मांडला. कारण भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्त्वपूर्ण उद्योग हे खासगी न राहता राज्य सरकारच्या ताब्यात असावेत, असे त्यांचे मत होते. त्यांचे हे मत राज्य समाजवादाचा पुरस्कार करणारे होते. राज्य समाजवादाची संकल्पना ही मूलभूत उद्योगावर राज्याचे नियंत्रण आणून कामगारांच्या हिताचे रक्षण करणारी संकल्पना होय. प्रत्येक नागरिकांसाठी आणि विशेष करून कामगार आणि शेतकरी वर्गासाठी सक्तीची विमा योजना ही त्यांचे आर्थिक रक्षण करणारी होती.

विम्याच्या राष्ट्रीयीकरणातून त्यांना आर्थिक लोकशाहीची अपेक्षा होती. हा निधी राष्ट्रीय विकासासाठी वापरला जावा तो केवळ खासगी कंपन्यांच्या फायद्यासाठी वापरला जाऊ नये, असे त्यांचे मत होते. विम्याचे राष्ट्रीयीकरण हे त्यांच्यासाठी सामाजिक न्यायाचा महत्त्वाचा मुद्दा होता. विम्याचे राष्ट्रीयीकरण हे आर्थिक समता आणि कामगार कल्याण साधण्याचे एक महत्त्वाचे साधन म्हणून होते. डॉ आंबेडकरांनी सामाजिक विमा आणि सुरक्षा ही राज्याची नैतिक जबाबदारी मानली.

घटनात्मक तरतुदी :

देशाचा राष्ट्रीय पातळीवरील सुरक्षितता, ऐक्य, एकात्मता आणि अखंडतेचा विचार

करून भारतात सामाजिक आणि राजकीय परिवर्तन करण्यासाठी शांततापूर्ण लोकशाही प्रक्रिया, चर्चा आणि सर्वानुमते राजकारणासाठी बाबासाहेब संसदीय लोकशाहीचा पुरस्कार करतात. भारताच्या सुरक्षेला आणि अखंडतेला कोणताही धोका निर्माण होऊ नये म्हणून एक नागरिकत्व, एक न्यायव्यवस्था, एक प्रशासकीय सेवा व प्रबळ केंद्र सरकारचा पुरस्कार करतात. एक नागरिकत्व आणि एक न्यायप्रक्रियेमुळे लोकांमध्ये एकात्मतेची भावना निर्माण होते. जातीय आणि सांस्कृतिक भेदनितीने तंग झालेले वातावरण कमी व्हावे म्हणून बाबासाहेबांना भाषावार प्रांतरचना हवी होती. एक राज्य एक भाषा या तत्वानुसार प्रांतरचना झाली तरच जातीय आणि सांस्कृतिक संघर्ष यासारखे राष्ट्रीय ऐक्याला बाधक असलेले प्रश्न सोडविता येतील, असे त्यांचे ठाम मत होते. भाषा ही संस्कृतीचे रक्षण करते. अखिल भारतीय पातळीवर जर ऐक्याची भावना निर्माण करून एक संस्कृती पुढे चालवायची असेल तर कर्तव्यबुद्धीने सर्व प्रांतांची दफ्तरी भाषा एकच आणि ती म्हणजे हिंदी असावी अशी आग्रही भूमिका बाबासाहेब मांडतात.

राष्ट्रीय ऐक्य आणि एकात्मता टिकविण्यासाठी आणीबाणीविषयक कलमे महत्त्वाची भूमिका बजावितात. राज्य घटनेत भारताच्या एकता आणि सुरक्षेसाठी तीन महत्त्वाची कलमे आहेत. त्यात ३५२,३५६, आणि ३६० यांचा समावेश आहे. एखाद्या राज्यात राजकीय स्थैर्य किंवा एखादे राज्य राज्यघटने विरोधी कार्य करीत असेल किंवा आपल्या हातात राजकीय सत्तेचा किंवा सशस्त्र बळाचा वापर करून बंडखोरी करीत असेल तर किंवा दुसऱ्या राज्याच्या मदतीने भारतातून बंडखोरी करून स्वतंत्र राष्ट्राची मागणी करणार असेल तेव्हा राज्यपाल घटनात्मक अधिकारांचा वापर करून राष्ट्रपतीकडे अहवाल पाठवून केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने राष्ट्रपती त्या राज्यात सहा महिन्यांसाठी राज्यात आणीबाणी जाहीर करू शकतात.

एखादे राष्ट्र समर्थ बनणे म्हणजे त्या राष्ट्रातील काही व्यक्ती, एखाद्या वर्ग किंवा एखादी जात समर्थ बनणे नव्हे, तर राष्ट्रातील प्रत्येक नागरिक समर्थ बनणे असते. राज्य संस्थेने कोणत्याही खासगी व्यक्तीला इतरांवर राज्य करण्याचा अधिकार देता कामा नये तसेच केवळ भौतिक गरजा भागविण्यासाठी व्यक्तीला तिच्या मूलभूत अधिकारांची तिलांजली देणे भाग पडू नये याची दक्षता त्यांनी घेतली व त्याची उपाययोजना म्हणून मूलभूत हक्क व राज्याची नीती निर्देशक आणि राज्य घटनेतील सरनाम्यात तरतूद केली आहे. समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाची तरतूद, दर्जाची



व संधीची समानता, कायद्यासमोर सर्व समान सर्वांसाठी समान कायदे अर्थात सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक घटकांचा समावेश राष्ट्रीय सुरक्षेचे अंग बनले आहेत. सुरक्षेची व्याप्ती ही लष्करापर्यंत मर्यादित राहिलेले नाही.

समाजाला अध:पतनाकडे नेते ही डॉ. आंबेडकरांची भूमिका आजही तितकीच मार्गदर्शक आहे. १० नोव्हेंबर १९३२ रोजी डॉ. आंबेडकरांच्या वतीने मा. पी. जे. रोहम यांनी मुंबई प्रांताच्या विधिमंडळापुढे संततिनियमनाच्या उपाय योजनांबद्दल एक बिनसरकारी ठराव मांडला.

या ठरावात कुटुंब मर्यादित करण्याच्या निकडीची गरज का लक्षात घेता प्रत्यक्षात जन्मनियंत्रण करणाऱ्या दृष्टीने पुरेशा प्रमाणात सोयी पुरवाव्यात अशी शिफारस शासनाला केली. दरिद्री माणसे आणि स्त्रिया यांच्या दृष्टिकोनातून डॉ. आंबेडकरांनी संततिनियमनाची आवश्यकता प्रतिपादिली होती. जास्त मुले जन्माला घालाव्या लागणाऱ्या स्त्रियांना संकटातून मुक्त करण्यासाठी संततीनियमानाची आवश्यक प्रतिपादिली. पाठोपाठ जन्म द्याव्या लागणाऱ्या स्त्रियांच्या दुःखाकडे त्यांनी लक्ष वेधलं. अनेक स्त्रिया गर्भपात करण्याचा अघोरी प्रयत्न करतात. गरोदरपणाचा, बाळंतपणाचा आणि मुलांच्या संगोपनाचा भार स्त्रीलाच वहावा लागतो. त्याचा परिणाम तिच्या आरोग्यावर, व्यक्तिमत्व विकासावर होतो. तेव्हा मुले किती आणि केव्हा होऊ द्यायचे हा तिचा निर्णय असला पाहिजे. असा विचार ते मांडतात. तसेच लोकसंख्येचा भर फक्त अन्नधान्य पुरवठ्यावर ताण पडतो असे नाही तर शिक्षण आणि इतर सुविधांवर पडतो. संततिनियमनाची योजना बेकारीला आवर घालता येईल. कुटुंबाला बऱ्यापैकी पोषणव्यवस्था उपलब्ध करून देणे शक्य होईल. हा विचार डॉ.आंबेडकर करतात.


हिंदु कोड बिल डॉ. आंबेडकरांनी तयार केलेले महिलांना मालमत्ता, घटस्फोट आणि वारसाहक्कमध्ये समान अधिकार देणारे क्रांतिकारक विधेयक होते. २४ फेब्रुवारी १९४९ रोजी संसदेत मांडलेल्या या विधेयकाचा उद्देश हिंदू समाजातील जाचक रूढी नष्ट करून स्त्री पुरुष समानता प्रस्थापित करणे हा होता.

अशा प्रकारे बाबासाहेब आंबेडकरांनी देशाच्या विकासासाठी, सुरक्षेसाठी आणि देशातील प्रत्येक घटकांसाठी सुखी आणि समाधानी जीवनाची वाट मोकळी करून दिली. मग बाबासाहेब आंबेडकरांना फक्त दलितांचे कैवारी म्हणणे कितपत योग्य आहे. डॉ. आंबेडकर हे भारताचे शिल्पकार आहेत हेच सत्य आहे.

डॉ.आंबेडकर विचारधारा विभाग,
रा. तू. म. नागपूर विद्यापीठ

जोतिराव फुले यांचा स्त्री स्वातंत्र्याचा जाहीरनामा!

■ डॉ. सरोज आगलावे, नागपूर



पाश्चात्त्य देशात १९ व्या शतकात स्त्रीवाद अर्थात स्त्री स्वातंत्र्याची चळवळ बाल्यावस्थेत असताना भारतात स्त्री स्वातंत्र्याच्या चळवळीचे बीजारोपण जोतिराव फुले करीत होते. भारतात राजा मोहन रॉय यासारख्या थोर समाजसुधारकांनी सतिप्रथा आणि इतर अनिष्ट रूढी- परंपरांविरुद्ध आवाज उठविला होता. जोतिराव फुले यांनी स्त्री शिक्षण, केशवपन बंदी, बालविवाह विरोध इत्यादी प्रकारचे कार्य केले. त्याचबरोबर त्यांनी स्त्री स्वातंत्र्याचा विचार प्रभावीपणे मांडला.

फुले यांनी आपल्या एकूण आंदोलनात स्त्रियांच्या समानतेच्या लढ्याला शूद्र, अति शूद्रांच्या लढ्याच्या बरोबरीचे स्थान दिले होते. त्यांनी वैयक्तिकरीत्या केलेल्या प्रयत्नांमध्ये सुद्धा स्त्री स्वातंत्र्याच्या कार्याला अग्रक्रम होता. फुले यांनी ओळखले होते की, जोपर्यंत हिंदू धर्माचे स्त्री शूद्र आणि अतिशूद्र यांच्याविरोधी असलेले तत्त्वज्ञान नाकारले जात नाही, तोपर्यंत स्त्री, शूद्र आणि अतिशूद्र यांच्या स्वातंत्र्याचा विचार या देशात रुजू शकणार नाही. त्यांचे 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तक म्हणजेच स्त्री-पुरुष अर्थात मानवांच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा होय.

स्त्री-पुरुष समतेचा विचार

मानवी समाजाच्या विकासासाठी स्त्रियांना पूर्ण समता असणे आवश्यक आहे, असा विचार जॉन स्टुअर्ट मिल यांनी मांडला. स्त्री-पुरुष हे समान आहेत, त्यांच्यात कोणताच फरक नाही. या विचाराचा युरोपात सर्वत्र प्रचार आणि प्रसार करण्यात आला होता. याच विचारामुळे संपूर्ण पाश्चात्त्य देशांमध्ये स्त्री स्वातंत्र्याच्या चळवळीला गती मिळाली होती.

जोतिराव फुले यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकात स्पष्टपणे नमूद केले की, 'आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याने एकंदर सर्व प्राणीमात्रांस उत्पन्न केले. त्यापैकी स्त्री-पुरुष हे उभयता जन्मत:च स्वतंत्र व एकंदर सर्व अधिकारांचा उपभोग घेण्यात पात्र केले आहेत.' स्त्री- पुरुष यामध्ये कोणत्याही प्रकारचा भेद करणे चुकीचे आहे. कारण स्त्री-पुरुष हे समान आहेत. पुरुषांप्रमाणे स्त्रीला देखील निर्माणकर्त्याने उत्पन्न केले. त्यामुळे ही स्त्री कनिष्ठ आहे, असे मानणे योग्य नाही. स्त्री गुलाम होऊ शकत नाही; असा अतिशय मूलगामी विचार त्यांनी मांडला.

फुले यांचा स्त्री स्वातंत्र्याचा विचार हा दयेवर आधारित नाही. 'स्त्री- पुरुष समान आणि स्वतंत्र आहेत.' या मानवी स्वातंत्र्याच्या मूलभूत सिद्धांतावर त्यांचा स्त्री -स्वातंत्र्याचा विचार आधारित असल्याचे स्पष्ट होते. त्यांनी 'मानवी स्त्रीपुरुष' असा स्त्री-पुरुषांचा उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणे ते स्त्रीला 'माणूस', 'मानव' या शब्दांनी संबोधतात. 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकात 'एकंदर सर्व मानव स्त्री पुरुष' किंवा 'स्त्री अथवा पुरुष' अशा समान अर्थाने त्यांनी स्त्री-पुरुषांचा उल्लेख केला आहे. म्हणून सुप्रसिद्ध संशोधिका गेल ऑम व्हेट यांनी 'कल्चरल रिव्होल्ट इन कॉलनीअल सोसायटी' या आपल्या ग्रंथात नमूद केले की, 'फुले यांचा स्त्रियांबाबतचा दृष्टिकोन त्यांच्या भाषेतून व्यक्त झालेला आढळून येतो. त्यांनी सर्व एकंदर स्त्री-पुरुष असा उल्लेख केला असून ही केवळ मराठीतच नाही तर इंग्रजीच्या दृष्टीनेही एक नवीन प्रथा आहे.' गेल ऑमव्हेट सारख्या पाश्चात्त्य संशोधिकेने स्त्रीबाबत फुले यांनी समतादर्शक आणि सन्मानदर्शक जे शब्द वापरले, त्याची दखल घेतली आहे.

स्त्री -पुरुष समान आणि स्वतंत्र आहेत

असा केवळ विचार मांडूनच फुले थांबत नाही तर मानवाचा परिपूर्ण विकास होण्याकरिता ज्या गोष्टींची आवश्यकता असते; त्या सर्व गोष्टी स्त्रियांना मिळायला पाहिजेत, असे प्रतिपादन त्यांनी केले. पुरुषांप्रमाणेच स्त्रीलादेखील मानवी अधिकार आहेत. म्हणून कुणी कुणावर जबरदस्ती करू शकत नाही. त्याबाबत फुले यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, ''आपल्या सर्वांच्या निर्मिकाने एकंदर सर्व स्त्री-पुरुषास एकंदर सर्व मानवी अधिकारांचे मुख्य धनी केले आहेत. त्यातून एखादा मानव अथवा काही मानवांची टोळी एखाद्या व्यक्तीवर जबरदस्ती करू शकत नाही त्याप्रमाणे करणाऱ्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.''

''स्त्री-पुरुष सर्व मानवी अधिकारांचा उपभोग घेण्यास एकसारखे पात्र असतात. स्त्रियांस एक तऱ्हेचा नियम लागू करणे व लोभी आणि धाडसी पुरुषांस दुसरा नियम लागू करणे हा निव्वळ पक्षपात होय.'' असे फुले यांचे स्पष्ट मत होते. स्त्री पुरुष हे समान असून दोघांनाही समान मानवी अधिकार आहेत. अशावेळी पुरुष व स्त्री या दोघांकरिता वेगवेगळे नियम लागू करणे हे मानवी स्वातंत्र्याविरुद्ध आहे. स्त्रीचे मानवी अधिकार नाकारणाऱ्या धर्मग्रंथांना त्यांनी प्रखर विरोध केला होता. ते म्हणतात की, 'काही धाडसी पुरुषांनी आपल्या जातीच्या स्वार्थासाठी बनावट मतलबी धर्मपुस्तकात स्त्रियांविषयी असे आपमतलबी लेख करून ठेवले आहेत.' ज्या धर्मग्रंथांनी स्त्रीला शूद्र लेखून तिच्यावर अनेक अमानुष निर्बंध लादलेत, त्या सर्व ग्रंथाचा त्यांनी विरोध केला. हे सर्व ग्रंथ काही लोकांनी स्वार्थासाठी लिहिले. या सर्व धर्मग्रंथांनी स्त्रीचे मानवी हक्क नाकारले आहेत, असे त्यांनी वारंवार सांगितले.

स्त्री स्वातंत्र्याचा जाहीरनामा


स्त्री ही स्वतंत्र आहे तिला सर्व प्रकारचे मानवी अधिकार मिळाले पाहिजेत, म्हणून फुले त्यांनी स्त्री-पुरुषांच्या मानवी हक्कांचा 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकात प्रामुख्याने उल्लेख केला आहे. हे हक्क पुढीलप्रमाणे आहेत -

१) निर्माणकर्त्याने एकंदर सर्व प्राणीमात्रांस उत्पन्न केले. स्त्री-पुरुष हे उभयता जन्मत:च स्वतंत्र व एकंदर सर्व अधिकारांचा उपभोग घेण्यास पात्र आहेत.

२) सर्व स्त्री-पुरुष एकंदर सर्व मानवी अधिकारांचे धनी आहेत. एखादा मानव अथवा काही मानवांची टोळी एखाद्या व्यक्तीवर जबरदस्ती करू शकत नाही.

३) सर्व स्त्रियांस अथवा पुरुषांस एकंदर सर्व मानवी हक्कांविषयी आपले विचार आणि मते बोलून दाखविण्यास, लिहिण्यास आणि प्रसिद्ध करण्यास स्वातंत्र्य आहे.

४) सर्व मानव स्त्री-पुरुषास धर्म व राजकीय स्वतंत्रता दिली आहे.



५) दुसऱ्यांच्या धर्मासंबंधी मतांवरून किंवा राजकीय संबंधाच्या मतांवरून स्त्री पुरुषास कनिष्ठ मानून छळ करू नये.

६) सर्व मानव स्त्री पुरुषास धर्म, गावकी अथवा मुलकी संबंधी अधिकाराच्या जागा त्यांच्या योग्यतेनुरूप आणि सामर्थ्यानुरूप मिळाव्यात म्हणून निर्माणकर्त्याने त्यांस समर्थ केले आहे.

७) सर्व मानव स्त्री पुरुषास धर्म, गावकी व मुलकी या संबंधीची प्रत्येक मानवाची स्वतंत्रता, मालमत्ता, संरक्षण आणि त्यांचा जुलमापासून बचाव करण्याचा अधिकार आहे.

८) स्त्री-पुरुषांमध्ये कोणत्याही प्रकारची आवड निवड या आधारावर फरक न करता त्यांचे खाणे- पिणे आणि लेणे-नेसणे याविषयी कोणत्याही प्रकारचा विधिनिषेध नसावा.

अशाप्रकारे जोतिराव फुले यांनी स्त्री-पुरुषांच्या मानवी हक्कासंबंधीचे नियम सांगितले आहेत. हे नियम म्हणजेच स्त्री स्वातंत्र्याचा जाहीरनामा होय, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.


आजही स्त्री गुलाम आहे, याचे मुख्य कारण म्हणजे स्त्रियां अज्ञानी आहेत. त्यामुळे त्या आपल्या मानवी हक्कांविषयी जागृत झाल्या नाहीत, असे फुले यांचे स्पष्ट मत होते. म्हणून ते म्हणतात की, 'सर्व स्त्रियांना त्यांचे मानवी हक्क समजू देऊ नये, या इराद्याने लोभी पुरुषांनी त्यांस विद्या शिकविण्यास प्रतिबंध केला. त्यामुळे एकंदर सर्व स्त्रियांवर असे अनेक जुलमी प्रसंग येऊन गुदरले. लोभी, धाडसी व पुरुषांनी मोठी कावेबाजी करून कोणत्याही कामांमध्ये स्त्री जातीची संमती घेतल्याशिवाय एकंदर सर्व पुरुषांनी आपले घोडे पुढे दामटले.' त्यांनी स्त्रियांच्या गुलामगिरीचे खरे कारण ओळखले होते. ते कारण म्हणजे स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकारणे, हे होय. म्हणून त्यांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला होता.

फुले हे केवळ आपल्या देशातील स्त्रियांचा विचार करीत नाहीत, तर सर्व गाव, प्रांत, देश आणि खंडातील स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा विचार मांडतात. तसेच ते विश्वातील सर्व स्त्री-पुरुषांनी कोणताच भेद न करता एकजुटीने एकमेकांशी सत्य वर्तन करावे आणि आपले एक कुटुंब समजून राहावे, असा उपदेश करतात. 'स्त्री अथवा पुरुष जे सर्व गावच्या, प्रांताच्या, देशाच्या, खंडाच्या संबंधाने अथवा कोणत्याही धर्मातील मताच्या संबंधाने स्त्री आणि पुरुष या उभयंतांनी अथवा सर्व स्त्रियांनी अथवा सर्व पुरुषांनी एकमेकात एकमेकांशी कोणत्याही प्रकारची आवड निवड न करता यासर्व स्त्री-पुरुषांनी या भूगोलावर आपले एक कुटुंब समजून एकमताने, एकजुटीने, एकमेकांशी सत्य वर्तन करावे.'

अशाप्रकारे सर्व स्त्री पुरुषांनी वर्तन केले असते तर पोलीस, तुरुंग, न्यायाधीश या गोष्टींची जगात आवश्यकता राहिली नसती, सर्वत्र आनंदी आनंद राहिला असता, असे प्रतिपादन जोतिराव फुले करतात.

सामाजिक क्रांतीचे दीपस्तंभ : महात्मा जोतिराव फुले

प्रवीण टाके



"विद्येविना मती गेली" हा क्रांतीचा मूलमंत्र देणाऱ्या जोतिरावांनी केवळ शिक्षणाची दारे उघडली नाहीत, तर सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून एक नवी सामाजिक चेतना निर्माण केली. स्त्री-शिक्षण, शेतकऱ्यांचे प्रश्न, जातिभेद निर्मूलन आणि मानवाधिकार या क्षेत्रांत त्यांनी दिलेले योगदान आजही आधुनिक भारताचा पाया मानले जाते. महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली या द्विशताब्दी निमित्त विशेष समिती स्थापन केली असून, वर्षभर विविध उपक्रमांद्वारे त्यांचे विचार जनमानसापर्यंत पोहोचवण्याचा संकल्प केला आहे.

भारताच्या सामाजिक इतिहासात ११ एप्रिल हा दिवस केवळ एका महापुरुषाच्या जन्माचा दिवस नाही, तर समता, शिक्षण आणि मानवतेच्या नव्या युगाची सुरुवात करणारा दिवस आहे. महात्मा जोतिराव गोविंदराव फुले यांच्या जन्मामुळे भारतीय समाजव्यवस्थेला नवी दिशा मिळाली. १८२७ मध्ये जन्मलेल्या या युगपुरुषाच्या विचारांचा प्रकाश आजही समाजाच्या प्रत्येक स्तरावर जाणवतो. ११ एप्रिल पासून महात्मा जोतिबा फुले द्विशताब्दी जयंती वर्ष साजरे केले जाणार आहे. महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात द्विशताब्दी जयंती समिती स्थापन केली आहे. समाजातील समता, शिक्षण, स्त्री-सक्षमीकरणांचे विचार लोकांपर्यंत पोहोचविण्याचा राज्य सरकारने संकल्प केला आहे. त्यामुळे ११ एप्रिलचा दिवस भारताच्या सामाजिक समतेच्या तेजस्वी द्विशताब्दी पर्वाचा दिवस म्हणूनही देशात साजरा होत आहे. त्यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या कार्याचा पुनर्विचार करणे म्हणजे केवळ इतिहासाचे स्मरण नसून वर्तमानाला दिशा देण्याचे कार्य आहे.

मानवतेचा धर्म : समतेचा मूलाधार

महात्मा फुले यांच्या विचारविश्वाचा केंद्रबिंदू म्हणजे ''मानव हा सर्वात मोठा धर्म आहे'' ही भूमिका, त्यांनी धर्म, जात, पंथ यापलीकडे जाऊन माणुसकीचा विचार मांडला. त्यांच्या लेखनात आणि कृतीतून सतत दिसून येते की, समाजातील अन्याय आणि विषमता दूर केल्याशिवाय खरी प्रगती होऊ शकत नाही. त्यांनी मांडलेली समतेची संकल्पना ही केवळ तात्त्विक नव्हती, तर ती प्रत्यक्ष कृतीतून साकारलेली होती.

शिक्षणाची ज्योत : अज्ञानातून मुक्तीचा मार्ग

महात्मा फुले यांनी घेतलेला सर्वात क्रांतिकारी निर्णय म्हणजे शिक्षणाचा प्रसार. त्यांनी प्रथम स्वतःच्या पत्नीला सावित्रीबाई फुले यांना शिक्षित केले आणि त्यानंतर १८४८ मध्ये पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. सावित्रीबाईंनीही समाजाच्या विरोधाला न जुमानता स्वतःला



शिक्षणासाठी वाहून घेतले. शेण गोट्याचा मार सहन करत सावित्रीबाईंनी स्त्री शिक्षणाचा पाया रचला. जोतिबा आणि सावित्री या दाम्पत्याच्या त्या काळातील सामाजिक बंडामुळे शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली. त्या काळात स्त्रीशिक्षणाला तीव्र विरोध असतानाही त्यांनी मागे हटणे स्वीकारले नाही. शिक्षण हेच शोषणाविरुद्धचे सर्वात प्रभावी शस्त्र आहे, ही त्यांची धारणा होती. या कार्यातून त्यांनी समाजातील अज्ञानाची बेडी तोडण्याचा प्रयत्न केला.अविद्या हेच शोषणाचे मुख्य कारण आहे हे सांगताना त्यांनी समाजाला याबाबतचा कठोर संदेश दिला...

विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली
नितीविना गती गेली, गती विना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका
अविद्येने केले...

अन्यायाविरुद्ध बंड


त्या काळातील समाज रुढी-परंपरांच्या कठोर बंधनात अडकलेला होता. बालविवाह, सतिप्रथा, स्त्रीदास्य आणि अस्पृश्यता यांसारख्या प्रथांनी समाजाला जखडून ठेवले होते. महात्मा फुले यांनी या सर्व प्रथांविरुद्ध उघडपणे आवाज उठवला. त्यांनी विधवांसाठी आश्रयस्थळे उभारली, विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले आणि स्त्रियांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देण्यासाठी संघर्ष केला. त्यांच्या कृतीतून समाजातील महिलांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा मिळाली.

सत्यशोधकांचा मार्ग : समतेची संघटित चळवळ

महात्मा जोतिबा फुले यांनी १८७३ मध्ये स्थापन केलेला सत्यशोधक समाज हा भारतीय सामाजिक इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी जातिभेद, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांविरुद्ध संघटित लढा उभारला. सत्यशोधक समाजाने समाजाला विचार करण्याची नवी दिशा दिली. ज्यामध्ये सत्य, समता आणि बंधुता यांना केंद्रस्थानी ठेवले आहे. सत्यशोधक समाजाच्या मार्फत त्यांनी एक समांतर विज्ञानवादी भूमिका समाजापुढे मांडली.

शेतकऱ्यांचा आवाज : अन्यायाविरुद्धचा प्रहार

महात्मा फुले यांनी केवळ सामाजिकच नव्हे, तर आर्थिक विषमतेवरही भाष्य केले. त्यांच्या 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथात त्यांनी शेतकऱ्यांच्या दुःखाचे अत्यंत वास्तव चित्रण केले आहे. महसूल व्यवस्थेतील अन्याय, सावकारशाहीचे शोषण आणि प्रशासनातील दुर्लक्ष यावर त्यांनी कठोर टीका केली. शेतकरी हा समाजाचा कणा असूनही त्याचे जीवन दारिद्र्यात का अडकले आहे, हा प्रश्न त्यांनी समाजासमोर उभा केला.



विचारांची शस्त्रे : लेखनातून घडवलेले परिवर्तन

महात्मा फुले हे केवळ कृतिशील समाजसुधारक नव्हते, तर प्रभावी लेखकही होते. 'गुलामगिरी' या ग्रंथातून त्यांनी जातिव्यवस्थेवर प्रखर प्रहार केला, तर 'सार्वजनिक सत्यधर्म' मधून मानवतावादी धर्माची संकल्पना मांडली. त्यांच्या लेखनातून समाजाच्या डोळ्यांत अंजन घालण्याचे कार्य झाले. यातून त्यांच्या विचारांची व्यापकता स्पष्ट होते. याशिवाय त्यांनी गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड, ब्राह्मणांचे कसब, तृतीय रत्न, सार्वजनिक सत्य धर्म, छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील पोवाडा लिहून शिवरायांच्या कार्यकर्तृत्वाची ओळख करून दिली. रायगडावरील छत्रपती शिवरायांच्या समाधीची स्वच्छता केली. शिवाजी महाराजांच्या स्मृती पुनरुज्जीवनाच्या प्रारंभीच्या प्रयत्नांपैकी एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व त्यांना मानले जाते.

सार्वजनिक जीवनातील योगदान

महात्मा फुले यांनी सार्वजनिक जीवनातही सक्रिय सहभाग घेतला. पुणे महानगरपालिकेच्या कार्यातून त्यांनी नागरी प्रश्नांवर काम केले. पाणीपुरवठा, स्वच्छता आणि नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे त्यांनी लक्ष दिले. त्यांनी ब्रिटिश प्रशासनाशी





संवाद साधून सामाजिक प्रश्न मांडले आणि वंचित घटकांसाठी न्यायाची मागणी केली. शासन कोणतेही असो, ते न्याय्य आणि लोकहितकारी असले पाहिजे, ही त्यांची भूमिका होती. हंटर शिक्षण आयोगाकडे त्यांनी निवेदन सादर केले. सार्वत्रिक शिक्षणाचा पुरस्कार केला.

सामाजिक सुधारणा स्वीकार

इंग्रजांच्या काही सामाजिक सुधारणा स्वीकारताना त्यांनी इंग्रजांच्या अन्यायकारक नीतीवर सडकून टीका केली. एवढेच काय इंग्रजांना समजेल अशा भाषेत त्यांनी त्याची उत्तरे दिली. कोणताही पहिला प्रयोग स्वतःच्या घरी, स्वतःच्या कुटुंबावर करून 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पावले', असा आदर्श त्यांनी समाजामध्ये निर्माण केला आहे. स्वतःच्या पत्नीला शिकवले. स्वतःची विहीर मागासवर्गीयांसाठी खुली केली. त्यांनी एका ब्राह्मण विधवेच्या मुलाला दत्तक घेऊन समाजापुढे आदर्श निर्माण केला. त्या मुलाचे आंतरजातीय लग्न लावून देण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला. महात्मा जोतिबा फुले यांनी घेतलेले निर्णय अशा प्रकारे कायम प्रेरणादायी आहेत. महात्मा ज्योतिबा फुले हे स्वतःच्या मुलाचा आंतरजातीय विवाह करणारे पहिले पालक ठरले आहेत. काळाची पावले ओळखून नवनव्या प्रयोगाद्वारे सामाजिक सुधारणा करण्यात भारतातल्या सर्व सामाजिक सुधारणा करणाऱ्या थोर पुरुषांमध्ये त्यामुळे महात्मा जोतिबा फुले वेगळे ठरले आहेत.

यशस्वी व्यावसायिक

सामाजिक कार्य, संघटना सुरू ठेवण्यासाठी आर्थिक स्त्रोत मजबूत असणे आवश्यक असते. त्यासाठी अंगी व्यावसायिक कसब बाळगणे खूप गरजेचे असते. संघटना, चळवळी, सुधारणांचा डोलारा चालविण्यासाठी पैशाची गरज असते. त्यासाठी आदर्श पद्धतीने व्यवसाय करून स्वयंपूर्ण होणे गरजेचे असल्याचे महात्मा ज्योतिबा फुले यांनी सोदाहरणासह मांडून ठेवले. त्यांनी कंत्राटदार म्हणून अतिशय उत्तमपणे काम केले. आजही त्यांच्या सहभागात तयार झालेल्या वास्तू प्रेरक आहेत. पूल, धरणे, कालवे या बांधकामात कंत्राटदार म्हणून त्यांनी काम केले.

आजच्या काळातील विचारांची प्रासंगिकता

महात्मा फुले यांच्या कार्याला दीडशे वर्षांहून अधिक काळ लोटला असला तरी त्यांच्या विचारांची प्रासंगिकता आजही तितकीच आहे. शिक्षणातील विषमता, सामाजिक भेदभाव आणि स्त्रीसमानतेचे प्रश्न अद्यापही पूर्णतः संपलेले नाहीत. त्यामुळे त्यांच्या विचारांचा प्रसार आणि आचरण करणे ही काळाची गरज आहे. त्यांच्या कार्याचा अभ्यास केल्यास समाजपरिवर्तनासाठी आवश्यक असलेली दृष्टी मिळते.

जोतिराव परिवर्तनाची अखंड प्रेरणा

महात्मा जोतिराव फुले हे एक व्यक्तिमत्त्व नसून एक चळवळ, एक विचारधारा आणि एक प्रेरणास्त्रोत आहेत. त्यांच्या कार्यातून राजर्षि छत्रपती शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रेरणा घेतली. त्यांच्या कार्यामुळेच महाराष्ट्राला फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र ही ओळख प्राप्त झाली आहे. त्यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त त्यांच्या विचारांचे स्मरण करणे म्हणजे केवळ आदर व्यक्त करणे नव्हे, तर त्या मूल्यांना आपल्या जीवनात रुजवण्याचा संकल्प करणे होय.

महाराष्ट्र शासनाने यासंदर्भात विशेष समिती स्थापन केली असून वर्षभर महात्मा जोतिराव फुले यांच्या जीवनकार्याला साजेशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यांच्या विचारांचा प्रसार करून सामाजिक समतेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचा हा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न ठरणार आहे.

उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर

परिवर्तनाचा नवा दीप: 'ज्योती सावित्री' शाळा

युवराज पाटील

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महात्मा जोतिबा फुले यांच्या १९९व्या जयंती दिनी पुरंदर तालुक्यातील त्यांच्या मूळगाव खानवडी येथे राज्यातील पहिल्या जिल्हा परिषद CBSE शाळेचे उद्घाटन झाले. या ऐतिहासिक उपक्रमातून ग्रामीण शिक्षणाला नवी दिशा देण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न सुरू झाला आहे. समता, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि आधुनिक सुविधा यांचा संगम या शाळेत पाहायला मिळतो. महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत हा प्रकल्प शिक्षणातून परिवर्तन घडवण्याचा प्रकाश ठरत आहे. त्यामुळे 'ज्योती सावित्री' शाळा ही ग्रामीण भागासाठी आशेचा नवा दीप बनली आहे... त्याविषयी घेतलेला हा आढावा...!!

पुरंदर तालुक्यातील खानवडी....इतिहास, परंपरा आणि सामाजिक जागृतीचा संगम असलेली ही भूमी. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाने पावन झालेली, छत्रपती संभाजी महाराज यांच्या जन्माने गौरवलेली भूमी आणि महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या क्रांतिकारी विचारांनी प्रेरित झालेली हीच खानवडी. आज आधुनिक शिक्षणाच्या नव्या पर्वाची साक्षीदार ठरत आहे. पुणे जिल्हा परिषदेकडून उभारण्यात आलेली 'ज्योती सावित्री जिल्हा परिषद शाळा' ही केवळ एक शाळा नसून ग्रामीण शिक्षणाच्या परिवर्तनाचा एक भक्कम आणि दूरदर्शी प्रयोग ठरत आहे.

ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि नव्या युगाची सुरुवात

महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त ११ एप्रिल रोजी या शाळेचे उद्घाटन देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. हा सोहळा केवळ उद्घाटनापुरता मर्यादित नव्हता, तर राज्यातील शिक्षण व्यवस्थेसाठी एक नवीन दिशादर्शक पद्धतीची सुरुवात होती. ग्रामीण भागात उच्च दर्जाचे शिक्षण देण्याच्या उद्देशाने उभारलेली ही शाळा राज्यातील आदर्श प्रकल्प म्हणून पुढे येत आहे.



समतेच्या विचारांची साकार प्रतिमा

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील विषमता दूर करण्याचा जो विचार मांडला, त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी या शाळेतून होत आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील विद्यार्थ्यांना मोफत आणि दर्जेदार शिक्षण देण्याचा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे. वार्षिक उत्पन्न मर्यादित असलेल्या कुटुंबांतील मुलांना येथे प्राधान्य दिले जाते, ज्यामुळे शिक्षण सर्वांसाठी समान संधी निर्माण करणारे माध्यम ठरत आहे.

शिक्षण रचना आणि प्रवेश प्रक्रिया

या शाळेत बालवाडीपासून बारावीपर्यंत शिक्षणाची व्यवस्था उभारण्यात येत आहे. २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून

बालवाडी ते दुसरीपर्यंतचे वर्ग सुरू झाले असून सध्या सुमारे २६० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्रत्येक इयत्तेत मर्यादित विद्यार्थी संख्या ठेवून गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर दिला जात आहे. सहावीपासून प्रवेश गुणवत्तेच्या आधारे दिला जाणार असून जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांची निवड परीक्षा पद्धतीने केली जाईल. एकूण सुमारे १,८४० विद्यार्थ्यांची क्षमता असलेली ही शाळा बालवाडी ते पाचवीपर्यंत दिवसभराची आणि सहावी ते बारावीपर्यंत निवासी स्वरूपाची असेल.

पायाभूत सुविधा आणि आधुनिकता

सुमारे १२ एकर परिसरात उभारलेल्या या शाळेत आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. प्रशस्त वर्गखोल्या, सुसज्ज प्रयोगशाळा आणि प्रशासकीय इमारत यांसह विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक सर्व सोयी येथे निर्माण करण्यात आल्या आहेत. पुढील टप्प्यात विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह आणि भोजन व्यवस्था उभारण्यात येत आहे. तसेच संगणकाधारित शिक्षण, कौशल्य विकासासाठी विशेष प्रयोगशाळा, वाचनालय आणि क्रीडा सुविधा यांचा समावेश करण्यात येणार आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांना शहरांप्रमाणेच शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याचा हा व्यापक प्रयत्न आहे.

सर्वांगीण विकासावर भर

या शाळेत केवळ शैक्षणिक प्रगतीवर नाही, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आला आहे. विज्ञान, गणित आणि तंत्रज्ञानासोबतच कौशल्याधारित शिक्षण, संगणक साक्षरता आणि विविध स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन दिले जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेत मोफत आहार, दूध आणि नियमित आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाहतूक, गणवेश आणि पुस्तकेही मोफत दिली जाणार आहेत.

प्रशासन आणि सहकार्याची नवी दिशा

या शाळेची मालकी पुणे जिल्हा परिषदेकडे असून तिचे संचालन एका स्वयंसेवी संस्थेमार्फत केले जाणार आहे. शासन आणि समाज यांच्या सहकार्याने उभारलेला हा प्रकल्प सामाजिक सहभागाचे उत्कृष्ट उदाहरण ठरतो. विविध निधी आणि देणग्यांच्या माध्यमातून हा उपक्रम चालवला जाणार असून दीर्घकालीन दृष्टिकोनातून त्याचे नियोजन करण्यात आले आहे.



उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, 'ज्योती सावित्री' शाळा ही केवळ एक संस्था नसून ग्रामीण परिवर्तनाचा केंद्रबिंदू आहे. येथे घडणारे विद्यार्थी उद्याचे सक्षम नागरिक बनतील. हा नमुना संपूर्ण महाराष्ट्रासाठी मार्गदर्शक ठरेल. शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील विषमता दूर करण्याचा हा प्रभावी मार्ग आहे. त्यांच्या या वक्तव्यातून या प्रकल्पाचे महत्त्व स्पष्ट होते.

अपेक्षित परिणाम आणि भविष्यदृष्टी

या शाळेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी अधिक प्रमाणात उपलब्ध होतील, शाळा सोडण्याचे प्रमाण कमी होईल आणि कौशल्याधारित शिक्षणामुळे रोजगाराच्या संधी वाढतील. खानवडी हे गाव 'शैक्षणिक आदर्श गाव' म्हणून विकसित होण्याची क्षमता या प्रकल्पामुळे निर्माण झाली आहे.

परिवर्तनाची दिशा

'ज्योती सावित्री' जिल्हा परिषद शाळा ही केवळ पायाभूत सुविधा उभारण्याचा प्रकल्प नाही, तर सामाजिक परिवर्तनाची एक प्रभावी चळवळ आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दूरदृष्टितून आणि पाठपुराव्यातून ही आगळीवेगळी शाळा सुरू झाली. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा परिषदेचे अध्यक्ष विरधवल जगदाळे, उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील आणि मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या देखरेखीखाली ही राज्याला पथदर्शक ठरणारी शाळा सुरू झाली आहे. इतिहासाच्या वारशाला आधुनिकतेची जोड देत उभारलेले हे स्वप्न प्रत्येक वंचित विद्यार्थ्याला नवी दिशा देणारे ठरत आहे. ज्ञान, समता आणि संधी यांचा संगम घडवणारी ही शाळा महाराष्ट्राच्या ग्रामीण शिक्षणाचा नवा अध्याय लिहिणार आहे.

जिल्हा माहिती अधिकारी, पुणे

बाबासाहेबांचे संविधान म्हणजे...
एकसंध भारताची पोलादी चौकट

■ प्रवीण टाके

भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील १४ एप्रिल हा दिवस प्रेरणादायी पर्व आहे. या दिवशी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती देशभर मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. महाराष्ट्र शासन तसेच देशातील विविध संस्थांकडून त्यांच्या कार्याचा गौरव करणारे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. 'विश्वरत्न', 'भारतरत्न', 'घटनाकार' आणि 'भारत भाग्यविधाता' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून विविधतेने नटलेल्या भारताला एकसंध राष्ट्र म्हणून बांधून ठेवण्याचे ऐतिहासिक कार्य केले. त्यामुळेच काश्मीरपासून कन्याकुमारी पर्यंतची जनता आजच्या दिवशी या महामानवापुढे नतमस्तक होते.



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेले संविधान व त्यावर आधारित लोकशाही जोपर्यंत भारतात आहे, एकसंध भारतासाठी कायद्याची पोलादी चौकट कायम आहे. त्यांना आदरांजली व्यक्त करताना संविधानाच्या स्वरूपात बाबासाहेबांनी दिलेल्या समानतेच्या, न्यायाच्या आणि बंधुतेच्या धाग्यात सर्व भारतीयांना गुंफण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे.

राष्ट्र प्रथम ही बाबासाहेबांची भूमिका स्पष्ट होती. संविधान सभेत बोलताना ते म्हणाले होते, "राष्ट्र प्रथम, समाज नंतर आणि व्यक्ती त्यानंतर." स्वतः आयुष्यभर सामाजिक अन्याय सहन करूनही त्यांनी कधीही कोणाबद्दल सुडाची भावना बाळगली नाही. उलट, त्यांनी अशी राज्यघटना निर्माण केली ज्यामध्ये प्रत्येक नागरिकाला समान न्याय मिळेल.

आचार्य प्र.के.अत्रे यांनी बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर लिहिलेल्या आपल्या आदरांजलीत आंबेडकरांना ''जुलमाविरुद्ध उगारलेली वज्राची मूठ'' असे संबोधले आहे. ही उपमा त्यांच्या संघर्षशील वृत्तीचे आणि अन्यायाविरुद्धच्या लढ्याचे अचूक चित्रण करते.

भारताच्या अखंडतेची शाश्वती

स्वातंत्र्यानंतर भारत एकसंध राहील का याबाबत अनेक पाश्चिमात्य नेत्यांना शंका होती. विविध धर्म, भाषा, जाती यामुळे भारताचे विभाजन होईल, असे भाकीत केले जात होते. विस्टन चर्चिल यांसारख्या नेत्यांनी भारताच्या एकात्मतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. जगातील अनेक नेत्यांनी हा खंडप्राय देश एकत्र राहणार नाही, असे भाकीत केले होते. पाकिस्तानच्या फाळणीनंतर पश्चिम आशिया खंडात धर्माच्या नावावर झालेली अमानुष मानवी कत्तल जगाच्या पुढे होती. भारतातील विविधता, विविध धर्मांचे लोक, धर्मावरून झालेली विभागणी हे मोठे उदाहरण पुढे होते. त्यामुळे भारताचे भविष्य अंधकारमय वाटणे तत्कालीन परिस्थितीला धरून होते. मात्र बाबासाहेबांनी अभ्यासाअंति यावर रामबाण उपाय शोधून काढला. तो म्हणजे संविधान, आपली राज्यघटना. संविधान सभेपुढील भाषणात ते म्हणाले होते, स्वातंत्र्य आणि समानता ही मूल्ये बंधूतेशिवाय टिकू शकत नाही. राजकीय लोकशाही यशस्वी तेव्हाच होईल जेव्हा सामाजिक लोकशाही अस्तित्वात असेल. त्यामुळे आजचा दिवस सामाजिक लोकशाही बळकट करण्याचा देखील आहे. भारतीय संविधान सामाजिक आर्थिक, राजकीय, समानता देण्याच्या दृष्टीने अतिशय श्रेष्ठ दर्जाचे दस्ताऐवज आहे.

संविधानातील कलम: एकात्मतेचा कणा

भाषा, प्रांत, जाती, अस्मिता यावरून देशात आजही अनेक आंदोलने सुरू असतात, विविध संघटना आणि राजकीय पक्ष आपापल्या भूमिका मांडत असतात. संविधानाचे वैशिष्ट्य म्हणजे संविधान भाषा, प्रांत, जाती, अस्मिता यांचे अस्तित्व मान्य करते. मात्र सोबतच राष्ट्रापुढे सर्व बाबी गौण ठरवते. विधिमंडळ, कार्यपालिका, न्यायपालिका, माध्यमे अशा सर्व स्तंभांना त्यांनी परस्पर पूरक उभे केले आहे. त्यामुळे भारतीय राज्यघटनेला पुढे ठेवूनच सर्व घटकांना आपली वाटचाल करावी लागते. "भारतीय संसद, न्यायपालिका आणि कार्यपालिका या एकमेकांवर नियंत्रण व संतुलन (checks and balances) ठेवतात. कार्यपालिका राज्यघटनेनुसार प्रशासन करते आणि या सर्वांवर माध्यमे व जनतेचे लक्ष राहते. जबाबदारीची, कार्यवाहनाची, जाणिवांची आणि दायित्वाची अशी मजबूत पोलादी साखळी घटनेच्या माध्यमातून निर्माण झाली आहे. त्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले आहेत, भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार. या मूलभूत अधिकारांनी स्पष्ट बजावले आहे की, 'हा देश हा अस्मितेवर नव्हे, भावनेवर नव्हे तर सर्वसंमतीवर चालेल.'

शोषित, वंचित, गरीब मागास सर्व घटकांना समतोल विकासाची संधी मिळणे व त्यांच्या न्याय्य हक्काचे रक्षण होणे किती आवश्यक आहे, हे बाबासाहेबांना माहिती होते. त्यामुळेच त्यांनी घटनेमध्ये मूलभूत अधिकार सुस्पष्टपणे अंतर्भूत केले. या अधिकारामुळे कायद्यापुढे सर्व समान आणि सर्वांना कायद्याचे संरक्षण मिळाले आहे.

समानतेचा अधिकार (कलम १४ ते १८)

बाबासाहेब आंबेडकरांनी मूलभूत अधिकारांच्या १४ ते १८ या कलमांमध्ये सर्व नागरिक कायद्यापुढे समान असतील, जात, धर्म, वंश, लिंग किंवा जन्मस्थानावरून भेदभावास मनाई, अस्पृश्यता अमान्य आणि नियुक्तीची समान संधी, तसेच देशाप्रतिची बांधिलकी या बाबी नमूद केल्या. एका सामान्य स्त्री-पुरुषाला देशाचा प्रधानमंत्री, राष्ट्रपती बनण्याचा अधिकार देतानाच भेदभावाला त्यांनी या समानतेच्या अधिकाराने कायदेशीर बंधन घातले आहे.

स्वातंत्र्याचा अधिकार (कलम १९ ते २२)

ज्यांना हजारो वर्ष शिक्षण, वाणी, अधिकार आणि सहभागांपासून जाती धर्माच्या आधारावर संधी नाकारली गेली. त्या सर्वांना स्वतंत्र भारतात अभिव्यक्ती



स्वातंत्र्य देण्याचे कार्य बाबासाहेबांमुळे झाले. राज्यघटनेतील कलम १९ प्रत्येक भारतीयाला भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार देते. भारताचा नागरिक कोणत्याही राज्यामध्ये मुक्त संचार करू शकतो. भारताच्या कोणत्याही भागात राहण्याचा व स्थायिक होण्याचा अधिकार त्याला मिळालेला आहे. जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्याचे संरक्षण, शिक्षणाचा हक्क, न्यायालयात दाद मागण्याचा हक्क, विनाकारण स्थानबद्ध न करण्याचा हक्क अशा अनेक मूलभूत हक्कांची तरतूद करण्यात आली आहे.

शोषणाविरुद्ध संरक्षण (कलम २३-२४)

हजारो वर्षाची वेठबिगारी, सालदारी, बिनपगारी शोषणाला बळी पडलेल्या शोषितांना थेट घटनेच्या माध्यमातूनच बाबासाहेबांनी न्याय दिला. भारतीय राज्यघटनेच्या कलम २३ आणि २४ मध्ये शोषणाविरुद्ध संरक्षण दिले आहे. या कायद्यामुळे स्वतंत्र भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळात माणसांना गुलाम ठेवणे, वेठबिगारी सारखे काम करून घेणे, बिनपगारी सालदारी करणे, सक्तीने सेवा करायला सांगणे, धर्म, वंश, जात यावरून काम करून घेणे, बळजबरीची मजुरी करून घेणे, १४ वर्षाखालील कोणत्याही बालकाकडून काम करून घेणे, अर्थात बालमजुरीवर बंदी घालण्यात आली. ही फार मोठी क्रांती होती आणि याचा कायदा बनल्यामुळे हजारो सालाच्या गुलामगिरीतून मागासवर्गीयांची, शोषितांची मुक्तता झाली.

धर्मस्वातंत्र्य (कलम २५ ते २८)

धार्मिक चालीरीती व रुढीपरंपरांच्या नावावर शतकानुशतके चाललेल्या शोषणाला घटना लागू झाल्यानंतर कायद्याच्या चौकटीने कायमचा पायबंद बसला. सोबतच सर्वांना आपापला धर्म पाळण्याची मुभा देण्यात आली. मात्र सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता आणि आरोग्याला घातक नसेल अशा वर्तनाची हमी कायद्याने घेतली. प्रत्येक धर्माला धार्मिक विधी, धार्मिक व्यवहाराची व्यवस्था, सांस्कृतिक शैक्षणिक हक्क प्रदान करण्यात आले. धार्मिक शिक्षण आणि उपासनेचे स्वातंत्र्य मिळाले. भारतातील विविध जाति धर्मांच्या लोकांना राज्यघटनेने हे स्वातंत्र्य सार्वजनिक सुव्यवस्थेच्या अधीन राहून पाळण्याचे अधिकार या कलमाने दिले. भारतीय समाजावर असणारा धर्माचा, धार्मिक चालीरीतींचा पगडा, याचा अभ्यास करून बाबासाहेबांनी मूलभूत हक्कांमध्ये हे स्वातंत्र्य बहाल केले आहे. यासोबतच त्यांनी कलम २९,३० अन्वये अल्पसंख्याकांना सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार आपली भाषा व संस्कृती जपण्याचा अधिकार

दिला आहे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारतातला कोणताही नागरिक त्याच्यावरील अन्यायासाठी कलम ३२ अन्वये हक्कांचे संरक्षण करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे.

सर्वांसाठी न्याय – व्यापक दृष्टी

बाबासाहेब स्वतः वंचित समाजातून आले होते, पण त्यांनी फक्त मागासवर्गीयांसाठी नव्हे तर सर्व समाजासाठी न्यायव्यवस्था उभी केली. अनुसूचित जाती-जमातींसाठी आरक्षण, समान संधी, सामाजिक न्यायासाठी कायदेशीर संरक्षण त्यांनी दिले. सोबतच कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही याची पूर्ण काळजी घेतली.

संविधान सभेला दिलेले तीन इशारे

संविधान सभेच्या निर्मितीत अनेक महान नेत्यांचा, मान्यवरांचा हातभार होता. मात्र तरीही बाबासाहेबांनाच घटनेचे शिल्पकार संबोधले जाते. कारण, त्यांनी घटनेच्या अंमलबजावणीची दिशा आणि सूत्रे स्पष्टपणे अधोरेखित केली. त्यांची संविधान सभेतील भाषणेही तेवढी बोलकी आहेत. भारतीय संविधान सामाजिक, आर्थिक, राजकीय, समानता देण्याच्या दृष्टीने अतिशय उत्तम अशी घटना आहे मात्र या घटनेचा वापर कोण करणार? कसा करणार? आणि किती प्रामाणिकपणे करणार? यावरच घटनेच्या अंमलबजावणीचे फलित अवलंबून असेल असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी घटना निर्माण करणाऱ्या संविधान सभेपुढे बोलताना तीन महत्त्वाचे इशारे दिले होते.

ते म्हणाले होते, देशातील सामाजिक असमानता दूर होणे आवश्यक आहे. आम्ही सर्वप्रथम भारतीय होणे आवश्यक आहे. त्यांनी परस्पर बंधुतेवर भर दिला. बंधुता म्हणजे राष्ट्रातील सर्व लोकांमध्ये बंधूभाव आणि एकतेची भावना निर्माण करणे होय.

त्यांनी दुसरा इशारा दिला होता आर्थिक विषमतेचा. देशातील सर्व नागरिकांचा समतोल आर्थिक विकास होणे आवश्यक आहे, कारण आर्थिक विषमता श्रीमंत-गरीब दरी वाढवते. ही दरी वाढली तर असंतोष वाढेल.

त्यांचा तिसरा इशारा होता, सांप्रदायिकता वाढायला नको. सांप्रदायिकता म्हणजे विशिष्ट धर्माला अधिक महत्त्व देणे. भारत हा विविध धर्मांचा देश आहे. कोणत्याही धर्माचा द्वेष वाढायला नको. धर्माधारित द्वेष राष्ट्राच्या एकात्मतेला तडा देईल. हे इशारे आजही तितकेच महत्त्वाचे आहेत.



घटना निर्मिती – राष्ट्रनिर्मितीचा पाया

भारतीय राज्यघटना ही केवळ कायद्यांचा संच नाही, तर त्यात राष्ट्रनिर्मितीचा स्वयंस्पष्ट आराखडा आहे. बाबासाहेबांनी घटनेच्या माध्यमातून संघराज्य व्यवस्था मजबूत केली. केंद्र आणि राज्य यांच्यात संतुलन ठेवले. न्यायव्यवस्थेला स्वातंत्र्य दिले. यामुळे भारत एक अखंड आणि सक्षम राष्ट्र बनला.

संविधान टिकले तर लोकशाही टिकेल

महामानवाला अभिवादन करताना प्रत्येक भारतीयाने ही शपथ घेणे गरजेचे आहे की, संविधान टिकले तर लोकशाही टिकेल. आणि राजकीय लोकशाही तेव्हाच टिकेल जेव्हा सामाजिक लोकशाही अस्तित्वात असेल. आपण संविधानाच्या अमृत महोत्सवी काळात आहोत.

या पार्श्वभूमीवर प्रत्येक भारतीयाने संविधान समजून घेणे आवश्यक आहे. संविधानाचे पालन करणे आवश्यक आहे. आपल्या अधिकारांसोबत भारताचा नागरिक म्हणून आपली कर्तव्येही ओळखणे आवश्यक आहे.

बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून एकसंध, न्याय्य आणि प्रगत भारत उभा केला. जगाला वाटत होते की, भारत टिकणार नाही, पण आज भारत जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे, जगातील महाशक्ती म्हणून उदयास येत आहे. हे त्यांच्या दूरदृष्टीचे फलित आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्यापुढे नतमस्तक होताना... चला भारतीय म्हणून आपण एकच संकल्प करू या...संविधानाचा सन्मान करू या, समानतेचे, बंधुत्वाचे मूल्य जपू या सर्वप्रथम एक भारतीय बनू या आणि एकसंध भारत अधिक मजबूत करू या... हीच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल.

उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर

अनिश्चिततेकडून स्थैर्याकडे: वंचितांच्या स्वप्नांना कायदेशीर ओळख

■ चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री, महसूल

'अस्थिर घरांना हक्काचा आधार मिळाला! अनेक दशकांपासून शासकीय जमिनीवर वस्ती करून राहणाऱ्या, पण मालकी हक्कापासून वंचित असलेल्या लाखो कुटुंबांच्या आयुष्यात नवा प्रकाश देणारा निर्णय महसूल विभागाने घेतला आहे. यामुळे सर्वसामान्यांना दिलासा मिळण्यासोबतच नियोजनबद्ध विकास आणि मानवी गरजा यांचा सुवर्णमध्य साधणारा हा निर्णय राज्याच्या सामाजिक-आर्थिक नकाशावर दूरगामी परिणाम करणारा ठरेल.'

राज्य शासनाने १ जानेवारी २०११ पूर्वी शासकीय जमिनीवर झालेले आणि सध्या अस्तित्वात असलेले निवासी अतिक्रमण अटी व शर्तींच्या अधीन राहून नियमित करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील गोरगरीब, वंचित आणि निवाऱ्याविना राहणाऱ्या लाखो कुटुंबांना दिलासा देणाऱ्या अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दूरगामी परिणाम करणाऱ्या या निर्णयामुळे अनेक वर्षे अनिश्चिततेत जगणाऱ्या नागरिकांना आता कायदेशीर हक्काची हमी मिळणार आहे. 'सर्वांसाठी घरे' या संकल्पनेला गती देत आणि 'विकसित महाराष्ट्र २०४७' या व्यापक ध्येयाच्या दिशेने हा निर्णय महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

हा निर्णय महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदींवर आधारित



असून, शासनाच्या अधिकारांचा वापर करून शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणांचे नियमितीकरण करण्यासाठी एक सुसंगत व एकत्रित धोरण निश्चित करण्यात आले आहे. यापूर्वी १९९५ पर्यंतच्या अतिक्रमणांबाबत धोरण अस्तित्वात होते. मात्र त्यानंतरच्या कालावधीत मोठ्या प्रमाणावर वाढलेल्या अतिक्रमणांसाठी स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आलेली नव्हती. ग्रामीण तसेच शहरी भागात लोकसंख्या वाढ, स्थलांतर आणि आर्थिक अडचणींमुळे मोठ्या प्रमाणावर नागरिकांनी शासकीय जमिनीवर निवासासाठी अतिक्रमण केले होते. या पार्श्वभूमीवर शासनाने हा निर्णय घेतला असून, मुंबई शहर आणि मुंबई उपनगर वगळता राज्यातील इतर सर्व जिल्ह्यांमध्ये महसूल विभागाच्या अखत्यारीतील शासकीय जमिनींवर १ जानेवारी २०११ पर्यंत झालेले आणि सध्या अस्तित्वात असलेले केवळ निवासी स्वरूपाचे अतिक्रमण नियमित करण्यात येणार आहे.

निर्णय घेताना केंद्र शासनाच्या 'सर्वांसाठी घरे' या धोरणाचा तसेच संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांमधील शाश्वत शहरे आणि समुदाय या उद्दिष्टाचा विचार करण्यात आला आहे. अतिक्रमण नियमित करण्यासाठी शासनाने काही स्पष्ट पात्रता निकष निश्चित केले आहेत. यानुसार सर्वप्रथम अतिक्रमण हे केवळ निवासी उद्देशासाठीच असणे आवश्यक आहे. व्यावसायिक वापरासाठी केलेले अतिक्रमण सामान्यतः नियमित केले जाणार नाही. तथापि, काही अपवादात्मक परिस्थितीत परिसरातील नागरिकांच्या दैनंदिन गरजांसाठी असलेली किराणा दुकाने, औषधांची दुकाने किंवा लहान सेवा केंद्रे जर त्या कुटुंबाच्या निवासस्थानाचाच भाग असतील, तर अशा प्रकरणांचा विचार केला जाऊ शकतो. याशिवाय, अतिक्रमण १ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यापूर्वी अस्तित्वात असल्याचे पुरावे सादर करणे आवश्यक आहे. यासाठी मतदार यादीतील नाव, वीज बिल, मालमत्ता कर पावती, ग्रामपंचायत नोंदी, झोपडपट्टी अधिसूचना किंवा उपग्रह छायाचित्रे यासारखे पुरावे ग्राह्य धरले जाणार आहेत. अर्जदाराने सध्या त्या ठिकाणी वास्तव्यास असल्याचा पुरावादेखील सादर करणे बंधनकारक आहे.

शासनाने जमीन वापराच्या नियोजनालाही महत्त्व दिले आहे. ज्या जमिनीवर प्रादेशिक योजना किंवा विकास योजनेनुसार निवासी वापरास परवानगी आहे, अशाच ठिकाणी अतिक्रमण नियमित केले जाईल. यामुळे अनियोजित वाढ रोखून नियोजनबद्ध विकासाला चालना मिळेल. गायरान आणि वन जमिनींबाबत विशेष खबरदारी घेण्यात आली असून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचा विचार करून अशा जमिनीवरील अतिक्रमणांचे नियमितीकरण टाळण्यात येणार आहे. त्या ठिकाणी राहणाऱ्या पात्र कुटुंबांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पर्यायी निवास उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येणार आहे.

या धोरणामध्ये आर्थिक बाबींचाही सुस्पष्ट विचार करण्यात आला आहे. अतिक्रमण नियमित करताना जास्तीत जास्त १५०० चौ. फूट क्षेत्र मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. त्यापैकी ५०० चौ. फूटपर्यंतचे क्षेत्र पूर्णतः विनामूल्य नियमित करण्यात येणार आहे. ५०० चौ. फूटपेक्षा जास्त आणि १५००

चौ. फूटपर्यंतच्या क्षेत्रासाठी बाजारमूल्याच्या १० टक्के इतकी रक्कम आकारण्यात येईल. जर निवासी जागेचा काही भाग व्यावसायिक वापरासाठी वापरला जात असेल, तर त्या भागासाठी बाजार मूल्याच्या २५ टक्के इतकी रक्कम आकारली जाईल. १५०० चौ. फूटपेक्षा जास्त क्षेत्र कोणत्याही परिस्थितीत नियमित केले जाणार नाही आणि अतिरिक्त अतिक्रमण काढून टाकले जाईल.

अतिक्रमण नियमित केल्यानंतर संबंधित लाभार्थ्यांना ती जमीन भोगवटादार वर्ग-२ या स्वरूपात दिली जाईल. या जमिनीचे हस्तांतरण, विक्री किंवा भाड्याने देणे पुढील पाच वर्षांपर्यंत प्रतिबंधित असेल. या अटीचा भंग केल्यास जमीन पुन्हा शासनजमा करण्यात येईल. तसेच जमिनीच्या नोंदीमध्ये 'नवीन शर्त' असा स्पष्ट उल्लेख करण्यात येणार आहे. पाच वर्षांनंतर संबंधित जमीन भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरित करण्याची संधी उपलब्ध असणार आहे.

अर्ज प्रक्रियेसाठी शासनाने स्पष्ट कालमर्यादा निश्चित केली असून, पात्र व्यक्तींना ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत अर्ज सादर करणे आवश्यक आहे. या कालावधीत अर्ज सादर केलेल्या व्यक्तींना त्यांचे अतिक्रमण नियमित होईपर्यंत संरक्षण दिले जाईल. मात्र, निर्धारित मुदतीत अर्ज न करणाऱ्या किंवा अपात्र ठरलेल्या व्यक्तींवर अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात येईल.


महानगरपालिका क्षेत्रात वॉर्ड अधिकाऱ्यांकडे, नगरपरिषद क्षेत्रात मुख्याधिकाऱ्यांकडे आणि ग्रामीण भागात ग्रामसेवक आणि तहसीलदार यांच्याकडे अर्ज सादर करावे लागतील. प्राप्त अर्जांची छाननी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून ते पुढील स्तरावर पाठविण्यात येतील. त्यानंतर जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी किंवा तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखालील समित्यांद्वारे अंतिम निर्णय घेतला जाईल. भूमी अभिलेख विभागामार्फत जागेची मोजणी विनामूल्य करण्यात येईल आणि स्थानिक स्तरावर हरकती मागवून पारदर्शक प्रक्रिया सुनिश्चित केली जाईल.

या संपूर्ण प्रक्रियेसाठी शासनाने विविध स्तरांवर समित्या स्थापन केल्या आहेत. महानगरपालिका आणि 'अ' वर्ग नगरपरिषद क्षेत्रासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती कार्यरत राहील, तर 'ब' आणि 'क' वर्ग नगरपरिषद क्षेत्रात उपविभागीय अधिकारी अध्यक्ष असतील. ग्रामीण भागात तहसीलदार यांच्या नेतृत्वाखाली समिती कार्यरत राहील. याशिवाय, धोरणाच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी जिल्हास्तरीय व विधानसभा क्षेत्रस्तरीय आढावा समित्याही गठीत करण्यात आल्या आहेत.

संवेदनशील क्षेत्रांमध्ये अतिक्रमण नियमित केले जाणार नाही. नदीपात्र, नाले, सार्वजनिक रस्ते, जंगल क्षेत्र, सीआरझेड क्षेत्र, तसेच शाळा, रुग्णालये, स्मशानभूमी आणि खेळाची मैदाने यांसाठी राखीव असलेल्या जमिनीवरील अतिक्रमणदेखील कोणत्याही परिस्थितीत नियमित केले जाणार नाही. अशा प्रकरणांमध्ये संबंधित अतिक्रमण काढून टाकले जाईल आणि पात्र कुटुंबांना पर्यायी निवासाची व्यवस्था करण्यात येईल. अपात्र ठरलेल्या अतिक्रमणधारकांवर कठोर कारवाईची तरतूदही करण्यात आली आहे. अशा व्यक्तींना ३० दिवसांच्या आत अतिक्रमण काढण्याची नोटीस दिली जाईल. तसेच आदेशाचे पालन न केल्यास सक्तीने अतिक्रमण हटविण्यात येईल आणि त्यासाठी झालेला खर्च संबंधित व्यक्तीकडून वसूल करण्यात येईल.

ज्या ठिकाणी अतिक्रमण नियमित करणे शक्य नाही, त्या ठिकाणी शासनाने पर्यायी उपाययोजनादेखील निश्चित केल्या आहेत. प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून घर उपलब्ध करून देणे, ग्रामीण भागात शासकीय जमिनीवर भूखंड देणे किंवा नागरी भागात नवीन वसाहती विकसित करणे असे पर्याय उपलब्ध करून दिले जातील. यामुळे कोणतेही कुटुंब निवाऱ्याविना राहणार नाही याची काळजी घेण्यात आली आहे.

या निर्णयाचा अत्यंत व्यापक सामाजिक आणि आर्थिक परिणाम होईल. अनेक वर्षे अनिश्चिततेत राहणाऱ्या कुटुंबांना या निर्णयामुळे स्थैर्य मिळेल. त्यांना मालकी हक्क प्राप्त होईल आणि त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल. अनधिकृत वसाहतींना कायदेशीर मान्यता मिळाल्यामुळे शहरी आणि ग्रामीण नियोजन अधिक सुसंगत होईल. तसेच, शासनाच्या महसूलात वाढ होण्यासही मदत होईल.



राज्य शासनाचा हा निर्णय म्हणजे केवळ अतिक्रमण नियमित करण्याचा कार्यक्रम नसून सामाजिक न्याय, सर्वसमावेशक विकास आणि मानवी गरजांची पूर्तता करण्याचा व्यापक प्रयत्न आहे. निर्णयाच्या योग्य अंमलबजावणी आणि पारदर्शक प्रक्रियेद्वारे 'सर्वांसाठी घरे' ही संकल्पना प्रत्यक्षात साकार होण्यास मोठी मदत होईल तसेच विकसित महाराष्ट्राच्या दिशेने राज्याचे आणखी एक पाऊल पुढे पडेल, हे निश्चित.

शब्दांकन : ब्रिजकिशोर झंवर,
विभागीय संपर्क अधिकारी

राज्याचे कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२६ : सामाजिक प्रगती आणि सांस्कृतिक संवर्धनाचे नवे क्षितिज

■ आशिष शेलार, मंत्री,
माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य

'एआय म्हणजे केवळ यंत्रांची बुद्धिमत्ता नाही, तर मानवी प्रगतीला पूरक ठरणारे एक प्रभावी साधन आहे, हे महाराष्ट्राने आपल्या नवीन एआय धोरणातून सिद्ध केले आहे. मराठीच्या सर्व बोलीभाषांचे संवर्धन, ऐतिहासिक वास्तूंचे जतन आणि महिला स्टार्टअप्सना विशेष बळ देणारे हे धोरण 'माणूस' केंद्रस्थानी ठेवून आखण्यात आले आहे. तंत्रज्ञान आणि संस्कृतीचा हा अपूर्व संगम महाराष्ट्राला एका प्रगल्भ आणि प्रगत क्षितिजावर घेऊन जाणारा ठरेल.'

आपण ज्या काळात जगत आहोत, ते केवळ संगणक, माहिती तंत्रज्ञान आदींचे नाही, तर त्याही पुढे जाऊन आपण कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) एका अशा युगात पोहोचलो आहोत जिथे तंत्रज्ञान मानवी जीवनशैलीत मूलभूत बदल घडवत आहे. आजची AI प्रणाली प्राथमिक वाटत असली, तरी ती अत्यंत वेगाने प्रगती करत आहे. जागतिक अर्थव्यवस्थेत एआय चे योगदान २०३० पर्यंत सुमारे १५.७ Trillion Dollars वर पोहोचण्याचा अंदाज आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता मनुष्याच्या नोकऱ्या खाणार असल्याची भीती व्यक्त केली जात असली तरी, हे तंत्रज्ञान अखेर मानवी बुद्धिमत्तेला पूरक ठरणारे आहे. एआयच्या



योग्य आणि कार्यक्षम उपयोगासाठी तज्ज्ञ कुशल मनुष्यबळ आवश्यक असणार आहे. म्हणूनच या क्षेत्रात योग्य, सक्षम, तज्ज्ञ मनुष्यबळ निर्माण करणे आणि तंत्रज्ञानाचा गैरवापर रोखण्यासाठी ('Ethical AI') एथिकल एआय नियमावली तयार करणे हे आपल्यासमोरचे मोठे आव्हान होते. याच पार्श्वभूमीवर, महाराष्ट्राने केवळ तांत्रिकच नव्हे, तर मानवीय आणि सामाजिक अंगाने जाणारे आपले पहिले एआय धोरण जाहीर केले आहे.

Digital युगातील महाराष्ट्राची नवी पहाट

आज संपूर्ण जग एका अशा वळणावर उभे आहे, जिथे 'Data' हे नवीन इंधन आणि 'बुद्धिमत्ता' हे प्रगतीचे नवे परिमाण बनले आहे. महाराष्ट्र हे देशाच्या अर्थव्यवस्थेचे शक्तिपीठ असून, राष्ट्रीय सकल उत्पादनात (GDP) राज्याचा वाटा १४ टक्के इतका मोठा आहे. या प्रगतीला अधिक आधुनिकतेची जोड देण्यासाठी आपण नवीन महाराष्ट्र एआय मिशन स्थापन केले आहे.

प्रमुख वैशिष्ट्ये

या धोरणाचे स्वरूप अत्यंत व्यापक असून त्याचे काही महत्त्वाचे पैलू खालीलप्रमाणे आहेत:

- प्रगत एआय कार्यासाठी राज्यात किमान दोन हजार GPU उपलब्ध करून दिले जातील, जेणेकरून आपल्या संशोधकांना जागतिक दर्जाची ताकद मिळेल.
- राज्यात सहा कृत्रिम बुद्धिमत्ता Centre of Excellence (CoE) आणि 12 AI Incubators स्थापन केले जातील.

महाराष्ट्र एआय मिशन : 'India AI Mission' च्या धर्तीवर राज्यात स्वतंत्र 'महाराष्ट्र एआय मिशन' स्थापन करण्यात आले आहे. ते यासर्व धोरणात्मक बाबींच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवेल.

महाराष्ट्राच्या AI धोरणाचे मुख्य स्तंभ

हे धोरण सात प्रमुख स्तंभांवर आधारलेले आहे, जे प्रगतीचा मार्ग सुलभ करतील:

१) **एआय पायाभूत सुविधा विकास:** राज्यव्यापी एआय सक्षमीकरणासाठी संगणकीय पायाभूत सुविधा, डेटा सेंटर्स, जागतिक डेटा क्षमता उभारणी, उत्तम वीज पुरवठ्यासह विकेंद्रित डेटा सेंटर्स.

२) **स्थानिक Datasets आणि Platforms:** नवोपक्रम आणि उत्कृष्ट कार्यक्षमतेसाठी भारतीय, स्थानिक माहिती आणि मराठी भाषिक Data संकलन.

३) **कुशल मनुष्यबळ विकास:** भविष्योन्मुख स्थानिक कौशल्य विकास

आणि प्रशिक्षण.

४) **स्टार्टअप फर्स्ट अवलंब:** सार्वजनिक क्षेत्रातील नवोपक्रमांसाठी स्टार्टअप्सना प्राधान्य आणि अर्थसाहाय्य.

५) **अनुप्रयुक्त एआय प्रवेगक (Applied AI Accelerator):** प्रायोगिक प्रकल्पांना मोठ्या स्तरावर नेण्यासाठी अंमलबजावणी.

६) **Centre of Excellence (CoE):** क्षेत्र-विशिष्ट संशोधनासाठी सहा AI Centre of Excellence ची स्थापना.

७) **नैतिक आणि जबाबदार एआय:** एआय च्या सुरक्षित वापरासाठी Compliance आराखडा.

शैक्षणिक आणि मानवीय पैलू

महिला सक्षमीकरण आणि कौशल्य विकासाला प्राधान्य देणाऱ्या या धोरणाचा गाभा केवळ तंत्रज्ञान नसून 'माणूस' आहे.

महिला सक्षमीकरण: Startup क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी, महिला नेतृत्वाखालील Startups ला १.२५ कोटी रुपयांपर्यंतचे विशेष अनुदान दिले जाईल. (इतर Startups साठी हे एक कोटी रुपये आहे).

कौशल्य विकास (MCAT): महाराष्ट्र प्रगत एआय प्रशिक्षण केंद्र (MCAT) स्थापन करून दोन लाख युवक आणि व्यावसायिकांना एआय, डेटा आणि क्लाउड तंत्रज्ञानात प्रशिक्षित केले जाईल. हे केंद्र उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्रातील भागीदारीतून कौशल्य वृद्धी करेल.

भाषिक आणि सांस्कृतिक अस्मितेचे संवर्धन: माहिती तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्य या विभागांच्या सहकार्यातून हे धोरण आपल्या स्थानिक भाषिक आणि सांस्कृतिक वारशाचे संरक्षण व संवर्धन करण्याकरताही उपयुक्त ठरणार आहे.

मराठी भाषेचे संवर्धन: एआय तंत्रज्ञानामध्ये मराठी भाषेचे प्राबल्य वाढवण्यासाठी मराठी भाषा-आधारित Datasets विकसित केले जातील. यामुळे Voice-Interface, Conversational AI आणि Digital सेवा आपल्या मराठी भाषेत, सर्व बोलीभाषांच्या अगदी आदिवासी बोलीभाषांच्या संदर्भांसह उपलब्ध होतील.

सांस्कृतिक वारसा: नगर विकास आणि संस्कृती संवर्धनासाठी स्वतंत्र Centre of Excellence (CoE) स्थापन करून ऐतिहासिक वारशाच्या संवर्धन आणि संशोधनासाठी एआयचा वापर वाढवला जाईल.

प्रशासकीय सुधारणा आणि सुशासन

प्रशासनात AI चा वापर केल्याने पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढून सुशासन निर्माण होईल.

प्रत्येक विभाग, एक एआय वापर: या धोरणाअंतर्गत राज्यातील प्रत्येक प्रशासकीय विभागात किमान एक उच्च-प्रभावी एआय उपयोगाचे उदाहरण (AI Use Case) अंमलात आणणे आणि राज्यस्तरावर ५० AI Use Cases विकसित करणे अनिवार्य आहे.

एजंटिक एआय (Agentic AI) : मानवी देखरेखीखाली (Human-in-the-loop) प्रशासकीय कार्यप्रवाह स्वयंचलित करण्यासाठी पथदर्शी प्रकल्प या धोरणाअंतर्गत राबवले जातील, ज्यामुळे नागरिक सेवा अधिक जलद, भ्रष्टाचार विरहित मिळतील.

- उद्योगांसाठी विशेष प्रोत्साहने नवीन एआय Units ना २०% पर्यंत भांडवली अनुदान.
- मुद्रांक शुल्कात (Stamp Duty) मध्ये १००% सूट आणि १० वर्षांसाठी वीज शुल्क सवलत.
- स्वदेशी संशोधनासाठी Patent अर्ज खर्च परतावा (देशांतर्गत आठ लाख व आंतरराष्ट्रीय दहा लाख रुपयांपर्यंत).

नैतिकता आणि सामाजिक उत्तरदायित्व

तंत्रज्ञानाचा वापर हा सुरक्षित आणि नैतिक असावा, यासाठी दरवर्षी प्रशासकीय विभागांचे एआय Readiness Audit केले जाईल. ग्रामीण आरोग्य सेवेसाठी ICT AI आणि शेतकऱ्यांसाठी महावेध हवामान केंद्रांच्या माध्यमातून तंत्रज्ञान थेट शेत आणि घरापर्यंत पोहोचवले जात आहे.

तंत्रज्ञानाची नवी ताकद

आजच्या जगात स्पर्धा ही केवळ उत्पादनाची नाही, तर ती कल्पकता, Data आणि विश्वासाची आहे. भारताला जागतिक Innovation चे केंद्र बनवण्याचे जे स्वप्न आपण पाहिले आहे, त्याला बळ देण्यासाठी हे धोरण आखलेले आहे. २०३०-३१ पर्यंत या क्षेत्रात दहा हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक आकर्षित करण्याचे आणि दीड लाख नवे थेट व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण करण्याचे आमचे ठाम ध्येय आहे.

जनतेसाठी एआय:

एआयचा उपयोग केवळ उद्योगांसाठी नाही, तर तो जनतेसाठीदेखील आहे. शेतीमध्ये अचूक हवामानाचा अंदाज, आरोग्य सेवेत सुधारणा, Telemedicine सारखी क्षेत्रे अधिक उपयुक्त व वेगवान करणे आणि प्रशासकीय कामात पारदर्शकता आणणे, हाच या धोरणाचा खरा आत्मा आहे.

औद्योगिक विकास, गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी राज्य सरकारने नुकतेच केंद्राच्या 'इंडिया ऍडमिशन' च्या धर्तीवर राज्याचे पहिले कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) धोरण २०२६ जाहीर केले आहे. असे धोरण लागू करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

महाराष्ट्र हे देशाचे 'Growth Engine' आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हे एआय धोरण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'Global Soft Power' आणि 'Creative Economy' या जागतिक दृष्टिकोनाशी सुसंगत असून राज्याला जागतिक नकाशावर एक 'Digital Superpower' म्हणून प्रस्थापित करेल. हे धोरण केवळ उद्योगांना बळ देणारे नसून, आपल्या संस्कृतीला, भाषेला आणि मानवी मूल्यांना आधुनिकतेची नवी झळाळी देणारे, नवे रोजगार निर्माण करणारे आणि मानवी जीवन अधिक सहज सोपे, समृद्ध आणि सुरक्षित करणारे ठरेल, असा मला विश्वास आहे.

शब्दांकन: संजय ओरके,
विभागीय संपर्क अधिकारी

भावना आणि संवेदनांचा सुवर्णसंगम:

‘गोदा ते नर्मदा’ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलयात्रा

■ डॉ. किरण मोघे

‘गोदा ते नर्मदा’ ही जलयात्रा म्हणजे केवळ दोन नद्यांना जोडणारा प्रवास नसून, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जलसंवर्धनाच्या दूरदृष्टीचा आणि सांस्कृतिक वारशाचा सन्मान करणारा एक भावनिक सोहळा आहे. त्र्यंबकेश्वरच्या गोदावरी उगमापासून ते माळव्याच्या नर्मदेच्या तीरापर्यंत निघालेला हा जागर महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील लोकसंस्कृतीच्या बंधांना अधिक घट्ट करणारा ठरला. अहिल्यादेवींच्या जन्मत्रिशताब्दी निमित्ताने आकारास आलेल्या या उपक्रमाने जलनियोजन, ऐतिहासिक बारवांचे पुनरुज्जीवन आणि नदीजोड प्रकल्पांच्या माध्यमातून दुष्काळमुक्तीचा नवा संकल्प जनमानसात रुजवला आहे. भक्ती आणि शक्तीचा हा आगळावेगळा संगम जलसंधारणाच्या चळवळीला ‘लोकचळवळ’ बनवण्यासाठी प्रेरणादायी ठरणार असून, भविष्यातील जलसंकटावर मात करण्याचा हा एक कृतज्ञतेचा मार्ग आहे.

‘गोदा ते नर्मदा’ जलयात्रा ही पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी भारतीय संस्कृती, अध्यात्म, जनकल्याण आणि जलसंधारणाच्या क्षेत्रात केलेल्या कार्याला अभिवादन आहे. अहिल्यादेवींचे माहेर महाराष्ट्रातील चौंडी हे गोदावरीच्या खोऱ्यातील तर सासर मध्यप्रदेशातील माळवा हे नर्मदेच्या खोऱ्यातील. गोदावरी आणि नर्मदा या भारतीय संस्कृतीतील अत्यंत पवित्र नद्या मानल्या जातात. या दोन नद्यांच्या खोऱ्यांना जलयात्रेच्या माध्यमातून जोडणे म्हणजे केवळ भौगोलिक अंतर कापणे नव्हे, तर दोन प्रदेशांतील संस्कृती आणि लोकभावनांना एकत्र गुंफण्याचा प्रयत्न होता. त्यासोबतच पर्यावरण बदलाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यादेवींचे जलसंवर्धनाचे कार्य घरोघरी पोहोचविण्याच्या दृष्टीनेदेखील ही जलयात्रा महत्त्वाची ठरली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत १५ ते ३० एप्रिल हा कालावधी जल व्यवस्थापन कृती पंधरवडा म्हणून साजरा करण्यात आला. या उपक्रमाचा एक भाग आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मत्रिशताब्दी वर्षाचे औचित्य साधून जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या संकल्पनेतून ‘गोदा ते नर्मदा’ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलयात्रा काढण्यात आली. गोदावरी नदीचे उगमस्थान असलेल्या त्र्यंबकेश्वर आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडीपासून मध्यप्रदेश येथील महेश्वरपर्यंत मार्गक्रमण करणाऱ्या या जलयात्रेचे उद्घाटन त्र्यंबकेश्वर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, तर चौंडी येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले.

त्र्यंबकेश्वर येथे कुशावर्तापासून पारंपरिक पद्धतीने काढण्यात आलेल्या जलदिंडीतून राज्याच्या संस्कृतीचे दर्शन घडले. ढोल, टाळ, मृदंगाच्या गजरात उद्घाटन स्थळी आलेल्या जलकलशाचे पूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. या सोहळ्याला अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, इंदूर संस्थानचे श्रीमंत युवराज महाराज यशवंतराव होळकर, अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठाचे अण्णासाहेब मोरे, नाशिकच्या



महापौर हिमगौरी आडके, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर उपस्थित होते.

उद्घाटन कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून राज्य दुष्काळमुक्त करण्याचा आणि गोदावरी नदी बारमाही प्रवाहित करण्याचा संकल्प बोलून दाखविला. अहिल्यादेवींचे विचार, वारसा आणि विकास हा त्रिसूत्री मंत्र घेऊन ही यात्रा सुरू झाल्याचे नमूद करताना अशा वारशांचे संवर्धन आणि विकासातील समन्वयावर त्यांनी भर दिला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जलसंवर्धनाचे कार्य जनतेत रूजविण्यासाठी यात्रेचे आयोजन केल्याचे मंत्री श्री. विखे पाटील यांनी सांगितले.

गोदावरी आणि नर्मदा नदीच्या निवडीचे वेगळे महत्त्व आहे. या दोन्ही नद्या आपल्या प्रवासात लाखो नागरिकांची तहान भागवतात, शेतीचे सिंचन करतात, मानवी जीवन फुलवितात. अशा दोन्ही नद्यांच्या नावाने असलेली ही जलयात्रा नागरिकांमध्ये जलसंवर्धना विषयी निश्चितच जनजागृती करण्यास मदत करणारी ठरणार आहे. ही जलयात्रा केवळ धार्मिक, सांस्कृतिक उपक्रम नाही, तर पर्यावरण संरक्षण आणि जलव्यवस्थापनाच्या संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण आणि प्रभावी उपाय ठरणार आहे.

जलसंपदा विभागातर्फे आयोजित जलयात्रेचे महत्त्व केवळ सांस्कृतिक अंगाने नसून त्यामागे कृतज्ञतेची आणि प्रबोधनाची प्रामाणिक भावनादेखील आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्घाटन कार्यक्रमात म्हटल्याप्रमाणे, अहिल्यादेवींनी जलनियोजनासाठी तयार केलेले बारव, घाट अजूनही मजबूत अवस्थेत असून त्यांची उपयुक्तता कायम आहे. शासनातर्फे त्यांचे संवर्धन करण्याची ग्वाहीदेखील मुख्यमंत्र्यांनी दिली. अहिल्यादेवींच्या या कार्याचे स्मरण जलयात्रेच्या निमित्ताने व्हावे म्हणून अहिल्यादेवींचे नाव या यात्रेला देऊन आणि चौंडी तसेच गोदावरीचे उगमस्थान असलेल्या त्र्यंबकेश्वरपासून यात्रेची सुरुवात करण्यामागे कृतज्ञतेची भावना आहे. तसेच पावसाच्या लहरीपणामुळे पर्जन्यमानात होणारे बदल लक्षात घेता जलसंवर्धनाचा संदेश देताना प्रबोधनाचा हेतूदेखील साध्य होत असल्याने यात्रा अधिक फलदायी ठरली आहे.





त्र्यंबकेश्वर आणि महेश्वर या दोन्ही स्थानांचे सांस्कृतिकदृष्ट्या खूप महत्त्व आहे. जलयात्रेच्या माध्यमातून ही दोन तीर्थस्थळे जोडताना यात्रेच्या माध्यमातून संस्कृतीच्या मजबूत धाग्याने प्रबोधनाचे तलम वस्त्र अलगदपणे विणले गेले आहे. दोन पवित्र नद्यांच्या जलाच्या संगमाद्वारे नदी प्रदूषण रोखणे, जलस्रोतांचे जतन करणे आणि अहिल्यादेवींनी बांधलेले ऐतिहासिक बारव आणि घाटांच्या पुनरुज्जीवनाबद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीनेदेखील ही यात्रा महत्त्वाची आहे. शिवाय आज जेव्हा जग जलसंकटाचा सामना करत आहे, तेव्हा 'गोदा ते नर्मदा' जलयात्रा आपल्याला अहिल्यादेवींच्या दूरदृष्टीची आठवण करून देते. महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातून ही यात्रा गेली असल्याने दोन्ही राज्यांमधील सांस्कृतिक बंधही अधिक दृढ होतील. जलसंवर्धनाबाबत जनजागृती, लोकसहभाग आणि शाश्वत पाणी व्यवस्थापन संकल्पनेच्या बळकटीकरणासाठी ही जलयात्रा उपयुक्त ठरणार आहे.

जलयात्रेअंतर्गत राज्यातील ३० नद्यांच्या खोऱ्यातील पाणी कलशांच्या माध्यमातून शिर्डी येथे आणण्यात येऊन या कलशांचे पूजन करण्यात आले. नाशिक, सिन्नर, संगमनेर, अहिल्यानगर, शिर्डी, कोपरगाव, वैजापूर, गंगापूर, छत्रपती संभाजीनगर, घृष्णेश्वर येथे मुक्काम करून चौथ्या दिवशी कन्नड, चाळीसगाव, धुळे मार्गे महेश्वर येथे जलयात्रेचा समारोप झाला. या जलयात्रेच्या माध्यमातून जलसंवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि पाणी व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्याचा संकल्प करण्यात आला. पाण्याचे संवर्धन आणि वसुंधरेचे रक्षण करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात आले.

सुमारे ८५० किलोमीटरचा प्रवास करून आलेली गोदा ते नर्मदा जलयात्रा बुधवारी दुपारी महेश्वर येथे पोहोचली, तेव्हा नागरिकांनी तिचे उत्साहात स्वागत केले. मिरवणुकीच्या मार्गावर सादर करण्यात आलेल्या वेगवेगळ्या लोककला, मर्दानी खेळांनी महेश्वरचे नागरिक मंत्रमुग्ध झाले. समारोप प्रसंगी मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांनी 'गोदा ते नर्मदा' यात्रेमुळे मध्यप्रदेश आणि महाराष्ट्राचे नाते अधिक दृढ झाले असल्याची भावना व्यक्त केली. महाराष्ट्रातील महापुरुषांनी देशाला नवी दिशा दिल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रातील चौदा कोटी जनतेने पर्यावरण आणि जलसंवर्धनासाठी काढलेली ही यात्रा असल्याचे महाराष्ट्राचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

'गोदा ते नर्मदा' ही जलयात्रा म्हणजे केवळ जलकलशांचा प्रवास नसून तो जाणिवेचा, कृतज्ञतेचा आणि विचारांचा प्रवाह आहे. हा प्रवाह आपल्याला जलसंवर्धनात आपापल्यापरीने योगदान देण्याच्या निश्चयाप्रत नेतो. गोदावरीची भक्ती आणि नर्मदेची शक्ती यांचा सुरेख संगम घडविणाऱ्या या यात्रेच्या माध्यमातून प्रेरणा घेत अहिल्यादेवींच्या कार्याचा वारसा पुढे चालवणे आणि जलसंधारणाची शपथ घेणे हेच त्यांना खरे अभिवादन ठरेल, हीच या यात्रेची फलश्रुतीदेखील असेल.

उपसंचालक (माहिती), नाशिक

श्रद्धेचा महाकुंभ अन् विकासाचा 'रामकाल'

■ विलास बोडके

नाशिक-त्र्यंबकेश्वरच्या पावन भूमीत २०२७ मध्ये भरणारा सिंहस्थ कुंभमेळा हा केवळ श्रद्धेचा उत्सव न राहता नाशिकच्या जागतिक 'ब्रँडिंग'ची एक सुवर्णपर्वणी ठरणार आहे. 'मंत्र आणि यंत्रा'चा वारसा जपणाऱ्या या भूमीचा चेहरामोहरा बदलण्यासाठी शासनाने २८ हजार कोटींहून अधिक खर्चाचा विकास आराखडा आखला असून, आधुनिक पायाभूत सुविधांमुळे नाशिक आता महानगरांच्या जागतिक नकाशावर झळकणार आहे. 'रामकाल पथ' आणि 'दर्शन पथ' यांसारख्या प्रकल्पांतून प्राचीन संस्कृतीचे पुनरुज्जीवन होत असतानाच, एआय (AI) सारख्या नवतंत्रज्ञानाची जोड या सोहळ्याला लाभणार आहे. आध्यात्मिक चैतन्य आणि औद्योगिक प्रगतीचा हा सुंदर समन्वय नाशिकच्या वैभवाला नवी उंची देणारा ठरेल. ही केवळ भाविकांची मांदियाळी नसेल, तर नाशिकच्या सर्वांगीण विकासाचे आणि अस्मितेचे जागतिक दर्शन घडविणारा एक भव्य सोहळा असेल.

सिंहस्थ कुंभमेळा श्रद्धेचा आणि अध्यात्माचा सोहळा आहे. कुंभमेळ्यासाठी केवळ देशातूनच नव्हे, तर जगभरातून भाविक श्रद्धेने नाशिक त्र्यंबकेश्वरमध्ये येतात. कुंभपर्वात गोदावरीतील पवित्र स्नानाला महत्त्व असतं. त्यासाठी येणाऱ्या भाविकांना आवश्यक सुविधा पुरविण्यासाठी शासनाने मोठ्या प्रमाणात विकास कामे हाती घेतली आहे. या विकासकामांच्या माध्यमातून नाशिकचे सांस्कृतिक आणि आधुनिक रूप जगभरात जाणार आहे. नाशिकची औद्योगिक आणि कृषी क्षेत्रातील क्षमता जगासमोर ठेवण्यासाठी आध्यात्मिक, धार्मिक, ऐतिहासिक पर्यटनाला चालना मिळणार असल्याने हा सोहळा जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा ठरणार आहे.

नाशिक त्र्यंबकेश्वर येथे दर १२ वर्षांनी सिंहस्थ कुंभमेळा भरतो. ऑगस्ट-सप्टेंबर २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळ्याचे अमृतस्नान होणार आहे. कुंभमेळ्याच्या प्रभावी नियोजनासाठी शासनाने यावेळी प्रयागराजच्या धर्तीवर नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाची स्थापना केली आहे. त्यामुळे विकासकामांना गती मिळाली असून केंद्र सरकार, राज्य शासन आणि प्राधिकरणाच्या माध्यमातून आतापर्यंत २८ हजार ७७ कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

प्राधिकरणाच्या माध्यमातून २२ हजार १८१ कोटी रुपयांचा विकास आराखडा शिखर समितीस सादर करण्यात आला होता. त्यास शिखर समितीने मान्यता प्रदान केली आहे. नाशिक परिसरात सर्वोत्तम पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे नाशिक शहर हे मुंबई, ठाणे, पुणे,



नागपूर या सारख्या मोठ्या शहरांच्या रांगेत जाऊन बसणार आहे. त्याचा लाभ प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष रोजगार निर्मितीत होणार असून कुंभमेळा रोजगार निर्मितीचीदेखील पर्वणी ठरणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कुंभमेळ्याची कामे वेळेत आणि दर्जेदार व्हावीत यासाठी स्वतः लक्ष घातले आहे. कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांना २०१५च्या यशस्वी आयोजनाचा अनुभव असल्याने त्याचा पुरेपूर वापर ते यावेळच्या नियोजनात करीत आहेत. त्यांच्या नेतृत्वात वृक्षारोपण अभियान, उन्नत नाशिक अभियान यासारखे उपक्रम सुरू करण्यात आले आहे. कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम हे पारदर्शकता आणि कामाच्या गुणवत्तेबाबत आग्रही आहेत. कुंभमेळा आयुक्त श्री. शेखर सिंह यांनी आतापासूनच नियोजनात नवतंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरावर भर दिला आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्यादृष्टीने नाशिकचे सांस्कृतिक महत्त्व जगभरात पोहोचविण्यासाठी विविध विकासकामे सुरू आहेत. गोदावरी नदीच्या काठावर 'रामकाल पथ' प्रकल्पाच्या माध्यमातून रामकुंड मार्ग, रामकाल पथवरील संपूर्ण संरचनांचे संवर्धन, दर्शनी भागांचा जीर्णोद्धार तसेच पर्यटकांसाठी पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. रामकुंड, सीता गुंफा, काळाराम मंदिर, राम लक्ष्मण गुंफा आणि इतर ऐतिहासिक मंदिर परिसराचे आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व प्रकल्पामुळे भाविकांपर्यंत पोहोचेल. देशभरातून गोदातटी श्रद्धेने येणाऱ्या भाविकांना आनंददायी अनुभव येथे घेता येईल. या प्रकल्पासाठी १०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. याच धर्तीवर त्र्यंबकेश्वर येथे दर्शन पथ साकारण्यात येणार असून त्यासाठी २७५ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

ओझर येथील नाशिक आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विस्तार, एकूण आठ स्थानकांवरील ८६ विकासकामे, नाशिक शहरातील द्वारका सर्कल येथे अंडरपास, घोटी-पेंगलवाडी रस्ता, जव्हार- मनोर-



छायाचित्र : मनोज अहिरे

पालघर आदी रस्त्यांचा विकास, नाशिक वर्तुळाकार मार्ग आदी कामे नाशिक-त्र्यंबकेश्वर आणि परिसराचा एकूणच चेहरामोहरा बदलणारी ठरतील. पवित्र स्नानासाठी येणाऱ्या भाविकांची एकाच ठिकाणी गर्दी होऊ नये यासाठी नाशिक, त्र्यंबकेश्वर येथे घाटांची कामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत.

गोदावरीचे पावित्र्य जपले जावे आणि ती बारमाही प्रवाहित राहावी यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. येत्या कुंभमेळ्यात गोदावरीच्या निर्मळ जलामुळे या पावनपर्वाचे महात्म्य आणखी वाढणार आहे. त्र्यंबकेश्वर येथील कुशावर्त कुंडात पाणी निर्मळ राहण्यासाठी यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्र्यंबकेश्वर नगरपालिका आणि नाशिक महानगरपालिकेच्या माध्यमातून रस्ते, पूल, विविध मलनिस्सारण प्रकल्प, जलशुद्धीकरण प्रकल्पांचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. ही सर्व कामे वेळेत होतील, असे नियोजन करण्यात आले आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्यानिमित्त मोठ्या प्रमाणात भाविक येण्याची शक्यता लक्षात घेता, सुरक्षा व्यवस्थेचेही नियोजन करण्यात येत असून त्यात एआयचा उपयोगही करण्यात येणार आहे. वाहनतळ, आरोग्य सुविधा, स्वच्छता, शेजारच्या जिल्ह्यातील धार्मिकस्थळांचे पर्यटन आदी सर्व बाबींवर सूक्ष्मपणे विचार करण्यात येऊन त्यासाठीचे नियोजनही सुरू करण्यात आले आहे. यंदाचा कुंभमेळा भव्यदिव्य आणि स्मरणीय व्हावा यासाठी शासन-प्रशासन संयुक्तपणे प्रयत्न करीत आहेत.

नाशिक ही यंत्र व मंत्र भूमी सोबतच हिरवा शालू नेसलेली कृषी भूमी आहे, इतिहासाच्या पाऊलखुणा अंगाखांद्यावर अभिमानाने मिरवणारी भूमी आहे. इथला ऐतिहासिक-सांस्कृतिक वारसा आणि औद्योगिक प्रगतीच्या सुंदर समन्वयाने नाशिकला एक नवी ओळख दिली आहे. येणारा कुंभमेळा अशी ओळख जागतिक स्तरावर नेण्याची सुवर्णसंधी आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने विस्तारणाऱ्या पायाभूत सुविधा नाशिकची क्षमता जगासमोर ठेवणाऱ्या असतील, तर इथल्या सांस्कृतिक वारशाचे नवे झळकणारे सांस्कृतिक रूप जगभरातील पर्यटकांना आकर्षित करणारे असणार आहे. नाशिकच्या ब्रँडींगसाठी ही सुयोग्य पर्वणी आहे. त्यामुळे हा आध्यात्मिक सोहळा भाविकांना आनंद देण्यासोबत नाशिकच्या वैभवाला आणि विकासाला नवी उंची देणारा असेल यात शंका नाही.

जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक

पर्यावरण संवर्धनाला हरित उपक्रमांतून नवी चालना

■ नंदकुमार वाघमारे

जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाने 'वसुंधरा रक्षक अभियान २०२६', 'महा आरपेट' (Maha-rPET) आणि 'इमिशन ट्रेडिंग स्कीम' (ETS) यांसारख्या क्रांतिकारी हरित उपक्रमांचा शुभारंभ केला आहे. दीड लाख पर्यावरण रक्षक जोडणे, प्लास्टिक बाटल्यांचे शास्त्रशुद्ध संकलन करून पुनर्वापर करणे आणि औद्योगिक उत्सर्जन कमी करण्यासाठी बाजार-आधारित यंत्रणा राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. लोकसहभाग, आधुनिक तंत्रज्ञान आणि 'राज्य वातावरणीय कृती कक्षा'च्या नवीन संकेतस्थळाच्या माध्यमातून शाश्वत व प्रदूषणमुक्त भविष्यासाठी हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.



वसुंधरा रक्षक अभियान हे २२ एप्रिल २०२६ 'जागतिक वसुंधरा दिन' ते ०५ जून २०२६ 'जागतिक पर्यावरण दिन' या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. यामध्ये राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर या पाच शहरांत हे अभियान राबविण्यात येणार असून या अभियानातून दीड लाख वसुंधरा रक्षक जोडले जाणार आहेत.

या अभियानात ग्रीन रॅली, सायक्लोथॉन, प्रश्नमंजुषा, हॅकेथॉन, पोस्टर मेकिंग, स्ट्रीट प्ले अशा विविध माध्यमांतून कचरा व्यवस्थापन, सिंगल युज प्लास्टिक बंदी, इको फ्रेंडली जीवनशैली अशा माध्यामातून पर्यावरण संवर्धन व प्रदूषण नियंत्रणाबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. या अभियानात सोशल मिडीयाच्या माध्यमातून क्यूआर कोड स्कॅन करून सहभागी करून घेतले जाणार आहे. या अभियानाचा उद्देश महाविद्यालयीन विद्यार्थी, सजग नागरिक, महिला यांचा वसुंधरा रक्षक म्हणून सहभाग नोंदविला जाणार आहे, जेणेकरून हे वसुंधरा रक्षक पर्यावरण संवर्धनात जनजागृतीच्या माध्यमातून मोलाची भर टाकतील.

वाढते प्रदूषण, बदलते हवामान आणि वेगाने होणारे शहरीकरण यांच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकाने 'वसुंधरा रक्षक' म्हणून पुढे यावे, असे आवाहन राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी केले. 'वसुंधरा रक्षक' ही संकल्पना केवळ उपक्रम नसून एक जनआंदोलन बनवण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

वसुंधरा रक्षक व्हॉटसॲप कम्युनिटी

वसुंधरा रक्षक अभियानाअंतर्गत वसुंधरा रक्षक व्हॉट्सॲप कम्युनिटी तयार करण्यात आली आहे. या कम्युनिटीद्वारे या अभियानामध्ये सहभागी होता येणार आहे. या कार्यक्रमात क्यूआर कोडद्वारे मंत्री पकंजा मुंडे, एमपीसीबीचे अध्यक्ष सिद्धेश कदम व सचिव जयश्री भोज यांनी या कम्युनिटीमध्ये सहभाग नोंदवत आम्ही वसुंधरा रक्षक झालो असल्याचे जाहीर केले. तसेच वसुंधरा अभियानाच्या लिंक व क्यूआर कोडद्वारे या अभियानात सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही श्रीमती मुंडे यांनी केले आहे.

महा आरपेट अभियान

वर्तमानात पिण्याचे पाणी अथवा कोल्ड्रींक

याच्या वापरामुळे प्लास्टिक बॉटलचा निर्माण होणारा कचरा आणि त्याची विल्हेवाट ही गंभीर समस्या आहे. महा आरपेट (Maha-rPET) अभियानाच्या माध्यमातून पेट (PET) बाटल्या म्हणजे, आपण दररोज पेय पिण्यासाठी वापरत असलेल्या या प्लास्टिकच्या बाटल्या, क्रूड ऑईल पासून तयार होतात. या बाटल्यांमधून कोणतेही हानिकारक पदार्थ बाहेर पडत नाहीत, म्हणूनच पिण्याचे पाणी, सॉफ्ट ड्रिंक्स आणि अन्नपदार्थांसाठी त्या पूर्णपणे सुरक्षित आहेत; पण याच्या वापरानंतर या बाटल्यांपैकी बहुतांश बाटल्या गोळा केल्या जातात आणि त्याचा पुनर्वापर करून टेक्सटाइल उद्योगासाठी फायबर आणि सूत तयार केले जाते. पण जेव्हा वापरलेल्या पेट बाटल्या इतर कचऱ्यासोबत मिसळून गोळा केल्या जातात, तेव्हा त्या दूषित होतात आणि अशा बाटल्या पुनर्वापरासाठी म्हणजेच अन्न व पेय पॅकेजिंगसाठी योग्य राहत नाहीत. यामुळे व्हर्जिन पेट प्लास्टिक नव्याने तयार करावे लागते आणि त्याचा पर्यावरणावर अतिरिक्त भार वाढतो.

केंद्र शासनाने अन्न व पेय पॅकेजिंगसाठी पुनर्वापरित पेट बाटल्या वापरण्यास परवानगी दिली आहे. पेय उद्योगासाठी ३०% आर पेट वापरणे बंधनकारक केले आहे. मात्र रिसायकल करणाऱ्या उद्योगांना स्वच्छ, दूषित नसलेले फूड-ग्रेड पेट आवश्यक तेवढे उपलब्ध होत नाही म्हणूनच या प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात. या समस्येवर उपाय म्हणून देशात प्रथमच महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने पुढाकार घेऊन स्वच्छ, फूड-ग्रेड वापरलेल्या पेट बाटल्यांचे स्वतंत्र संकलन करण्यासाठी महा आरपेट (Maha-rPET) अभियान अंतर्गत हॉटेल्स, मॉल्स, सिनेमा हॉल्स, बिझनेस सेंटर्स तसेच सरकारी आणि खासगी कार्यालयांमधून स्वच्छ पेट (PET) बाटल्या वेगळ्या गोळा करण्यात येणार असून पहिल्या टप्प्यात मुंबई व ठाणे येथे बाटल्यांचे संकलन केंद्र उभारण्यात येणार आहे. यामुळे स्त्रोतावरच पेट बॉटलचे योग्य वर्गीकरण होईल आणि PET बाटल्या स्वतंत्रपणे संकलित केल्या जातील.

राज्य वातावरणीय कृती कक्ष

राज्य वातावरणीय कृती कक्ष या विभागाकडून पर्यावरण क्षेत्रात एका नावीन्यपूर्ण संकेतस्थळाचे अनावरण करण्यात आले. हे संकेतस्थळ केवळ एक माहिती पुरविणारे माध्यम नसून या माध्यमातून लोकसंवाद, माहितीची देवाण-घेवाण आणि या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाबद्दल काळजी करणाऱ्या नागरिकांसाठी हे एक माहिती देवाण-घेवाणीचे प्रमुख केंद्र ठरणार आहे.

महा एससीएसी प्लॅटफॉर्म हा पुढील पिढीतील ज्ञान व निर्णय-आधार प्रणाली आहे. हा प्लॅटफॉर्म बदलते पर्यावरण व बदलते हवामान याबाबतची संबंधित माहिती, धोरणात्मक चौकट, आर्थिक रणनीती आणि विश्लेषणात्मक साधने यांना एकत्रित करून एक सुसंगत आणि वापरकर्ता-अनुकूल इंटरफेसमध्ये सादर करण्यात येत आहे. या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून परस्पर संवाद हा मुख्य स्त्रोत राहणार असून वापरकर्त्यासाठी अनुकुल सुविधा देत आहे.

या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून वापरकर्त्यांना साध्या सोप्या पद्धतीने कृती योग्य माहिती देण्यात येणार आहे. आपण धोरणकर्ते, संशोधक, कार्यकर्ते किंवा सामान्य नागरिक असाल, ही वेबसाइट केवळ वाचनापुरती मर्यादित नसून आपल्याला शोध घेण्यासाठी, विश्लेषण करण्यासाठी आणि कृती सक्षम नागरिक तयार करण्यात मोलाची भूमिका बजावेल.

इमिशन ट्रेडिंग स्कीम (ETS Scheme) प्रशिक्षण शुभारंभ

महाराष्ट्रातील सल्फर डायऑक्साइडसाठी (SO_2) उत्सर्जन व्यापार योजना (ETS) ही प्रदूषण नियंत्रणासाठीची एक बाजार-आधारित पद्धत आहे. ज्यामध्ये एकूण उत्सर्जनावर मर्यादा (cap) निश्चित केली जाते आणि त्या मर्यादेत उद्योगांना उत्सर्जन परवान्यांचा व्यापार करण्याची परवानगी दिली जाते. उत्सर्जन व्यापार योजना अंतर्गत, नियामक संस्था सहभागी उद्योगांसाठी एकूण उत्सर्जनाची मर्यादा निश्चित करते. प्रत्येक उद्योगाला विशिष्ट प्रमाणात प्रदूषक उत्सर्जित करण्यासाठी परवाने दिले जातात किंवा ते खरेदी करावे लागतात. जे उद्योग त्यांच्या निश्चित मर्यादेपेक्षा कमी उत्सर्जन करतात, ते अतिरिक्त परवाने विकू शकतात, तर मर्यादेपेक्षा जास्त उत्सर्जन करणाऱ्या उद्योगांना अतिरिक्त परवाने खरेदी करावे लागतात.

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन यांनी २० सप्टेंबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्रात सल्फर डायऑक्साइड ($ETS\text{-}SO_2$) साठी पायलट उत्सर्जन व्यापार योजना सुरू करण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) भारतातील पहिली SO_2 उत्सर्जन व्यापार योजना राबवत आहे. या योजनेचा उद्देश औद्योगिक उत्सर्जन कमी करण्यासाठी बाजार आधारित यंत्रणा वापरणे आहे, ज्यामुळे उद्योगांना लवचिक आणि किफायतशीर पद्धतीने प्रदूषण कमी करता येईल आणि एकूण पर्यावरणीय नियमांचे पालन सुनिश्चित करता येईल.

उत्सर्जन व्यापार योजना पायलटमध्ये समाविष्ट उद्योगांची निवड २०२४ मध्ये राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग आणि महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या सहकार्याने करण्यात आली. या नमुन्यात महाराष्ट्रातील उच्च SO_2 उत्सर्जन संभाव्यता असलेले उद्योग समाविष्ट आहेत. या निवडीसाठी खालील निकष वापरण्यात आले :

- 'रेड कॅटेगरी' मधील १७ उच्च प्रदूषण करणारे क्षेत्र, जसे की सिमेंट, पेट्रोकेमिकल, वीज निर्मिती प्रकल्प, रिफायनरी, लोखंड व पोलाद, तांबे, जस्त, डिस्टिलरी, साखर, पल्प व पेपर, खत, कीटकनाशके, औषधनिर्मिती, रंगद्रव्य, टॅनरी, ॲल्युमिनियम आणि क्लोर-अल्कली.
- SO_2 उत्सर्जन करणारे इंधन (घन व द्रव) वापरणारे कार्यरत उद्योग.
- मोठ्या व मध्यम प्रमाणातील उद्योग ज्यांच्याकडून लक्षणीय उत्सर्जन होते.

अंमलबजावणी व पुढील पावले :

ETS-SO_2 टप्प्याटप्प्याने राबविण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात (Phase 1) त्या उद्योगांचा समावेश आहे, ज्यांनी SO_2 सतत उत्सर्जन निरीक्षण प्रणाली (CEMS) स्थापित केली आहे आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून पाठवलेल्या सूचनांना प्रतिसाद दिला आहे. इतर उद्योग CEMS स्थापना पूर्ण केल्यानंतर आणि पात्रता निकष पूर्ण केल्यानंतर पुढील टप्प्यांमध्ये समाविष्ट केले जातील.

सध्या उद्योगांचे उत्सर्जन व्यापार योजना ट्रेडिंग प्लॅटफॉर्मवर ऑनबोर्डिंग सुरू आहे. एमपीसीबी आपले प्रादेशिक कार्यालयांशी समन्वय साधून उद्योगांशी नियमित पाठपुरावा करत आहे, जेणेकरून नोंदणी व ऑनबोर्डिंग प्रक्रिया वेळेत पूर्ण होईल.

उद्योगांना बाजारातील व्यवहारांसाठी तयार करण्यासाठी मॉक ट्रेडिंग प्रशिक्षण सत्रे सुरू करण्यात आले आहेत. या सत्रांद्वारे उद्योगांना ट्रेडिंग प्लॅटफॉर्म, बोली प्रक्रिया आणि अनुपालन आवश्यकतांची ओळख करून दिली जाईल. प्रत्यक्ष ट्रेडिंगची सुरुवात जागतिक पर्यावरण दिन ५ जून २०२६ रोजी Phase १ मधील १०० उद्योगांसह केली जाणार आहे. पुढील टप्प्यांमध्ये, दोन वर्षांच्या कालावधीत १७ उच्च प्रदूषण क्षेत्रांतील एकूण ३५० उद्योगांना समाविष्ट केले जाईल. महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेले SO_2 उत्सर्जन कमी करण्याचे उद्दिष्ट पूर्ण होईपर्यंत हा कार्यक्रम सुरू राहील.

जागतिक वसुंधरा दिन २०२६ निमित्त सुरू करण्यात आलेले हे सर्वसमावेशक उपक्रम पर्यावरण संवर्धनासाठी नवी दिशा देणारे ठरत आहेत. शासन, उद्योग क्षेत्र आणि सर्वसामान्य नागरिक यांच्या संयुक्त सहभागातूनच प्रदूषण मुक्त, शाश्वत आणि हरित भविष्य घडविणे शक्य आहे. 'वसुंधरा रक्षक' ही संकल्पना प्रत्येकाने कृतीत उतरवून आपल्या दैनंदिन जीवनात पर्यावरणपूरक सवयी अंगीकारल्या, तरच या उपक्रमांना खऱ्या अर्थाने यश प्राप्त होईल आणि पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित व निरोगी पृथ्वीची निर्मिती करता येईल.

पुढील पिढीला संपत्ती नव्हे, तर स्वच्छ हवा आणि पाणी देणे ही आपली जबाबदारी

प्रदूषणाचा परिणाम प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय त्याची तीव्रता जाणवत नाही. लोकांच्या आरोग्यावर होणारे परिणाम पाहून बदलाची गरज अधिक प्रकर्षाने जाणवत आहे. आजची पिढी तंत्रज्ञानात पुढे आहे; मात्र पर्यावरणाची जाणीवही तितकीच महत्त्वाची आहे. पुढच्या पिढीला संपत्ती नव्हे, तर स्वच्छ हवा आणि पाणी देणे ही आपली जबाबदारी आहे. प्लास्टिक कचऱ्याच्या पुनर्वापरावर भर देत 'रिड्यूस, रियूज, रिसायकल आणि रिथिंक' या तत्त्वांचा अवलंब करावा. अनावश्यक पॅकेजिंग कमी करणे, वस्तूंचा पुनर्वापर करणे आणि पुनर्निर्मितीला प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. प्लास्टिकच्या बाटल्या गोळा करून त्याच उत्पादकांकडून पुन्हा वापर करण्याची ही संकल्पना पर्यावरणपूरक आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आहे. राज्यात या प्रकारचा उपक्रम राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

– पंकजा मुंडे, मंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

पर्यावरण रक्षणासाठी एआयचा वापर

'वसुंधरा रक्षक' व्हॉट्सॲप कम्युनिटीसारख्या उपक्रमांमुळे विशेषतः तरुण पर्यावरणविषयक संदेश प्रभावीपणे पोहोचवला जाणार आहे. 'महा-आरपीईटी' धोरणांतर्गत उत्पादकांनी स्वतः निर्माण केलेल्या प्लास्टिकचा पुनर्वापर करण्याची जबाबदारी स्वीकारणे ही महत्त्वाची पायरी आहे. हा उपक्रम देशातच नव्हे तर जगातही आगळावेगळा आहे. देशातील पहिली सल्फर डायऑक्साईड इमिशन ट्रेडिंग योजना महाराष्ट्रात सुरू होत असल्याचा अभिमान त्यांनी व्यक्त केला. सध्या राज्यातील सुमारे १०० उद्योग या प्लॅटफॉर्मवर सहभागी झाले असून भविष्यात याचा विस्तार करण्यात येणार आहे. पर्यावरण संरक्षणासाठी डेटा व कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांचा वापरही पुढील काळात करण्यात येणार आहे.

– सिद्धेश कदम, अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ

वसुंधरा दिन हा पुढील पिढीच्या भवितव्याशी जोडलेला

जागतिक वसुंधरा दिन हा केवळ निसर्गाशी संबंधित विषय नसून तो सार्वजनिक आरोग्य, जीवनमान, शाश्वत विकास आणि पुढील पिढीच्या भवितव्याशी थेट जोडलेला आहे. महा आरपीटी अभियान हे प्लास्टिक कचरा व्यवस्थापन मजबूत करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल आहे. 'वसुंधरा रक्षक' उपक्रमाद्वारे विद्यार्थी, तरुण, महिला आणि नागरिकांना शाश्वत जीवनशैलीशी जोडण्याचा प्रयत्न केला जात आहे. 'अवर पॉवर, अवर प्लॅनेट' ही यंदाची संकल्पना असून पर्यावरण संरक्षणाची खरी ताकद केवळ धोरणांत नसून नागरिक, संस्था आणि समाजाच्या दैनंदिन निर्णयांमध्ये दडलेली आहे.

– जयश्री भोज, सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)

सुयोग्य दृष्टीकोन...
तंत्रज्ञानाचा अंगीकार महिला सक्षमीकरणाचा जागर !

■ अर्चना देशमुख

समाजमनाची योग्य जडणघडण करण्याची ताकद माध्यमांकडे आहे, तर विज्ञानाच्या प्रगतीतून भविष्याची नवी दारे उघडण्याची क्षमता तंत्रज्ञानाकडे आहे. जेव्हा या दोन शक्तींचा संगम महिला सक्षमीकरणासाठी होतो, तेव्हा खऱ्या अर्थाने परिवर्तनाची सुरुवात होते. हे सूत्र घेऊन राष्ट्रीय महिला आयोग आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतीच 'महिला, माध्यमे आणि तंत्रज्ञान' यावर आधारित कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेच्या संवाद सोहळ्यातून उमटलेला वैचारिक जागर...



सध्याच्या माहिती तंत्रज्ञान क्रांतीमुळे माध्यमांचा परीघ मोठ्या प्रमाणावर विस्तारला आहे. विशेष: एआयच्या युगात माध्यमांना नवा संदर्भ लाभला आहे. या माध्यमातून समाजातील साऱ्या प्रश्नांची सुयोग्य दखल घेतली जात असतानाच काही विषयांबाबत संवेदनशीलता आणि जबाबदारीने हाताळणी होणे तितकेच आवश्यक आहे. सध्याच्या काळात माध्यमे समाजाच्या विचारमंथनाची दिशा निश्चित करतात. त्यामुळे माध्यमातील घटकांनी तांत्रिकदृष्ट्या स्वत:ला अद्ययावत ठेवण्यासोबतच समतोल संवेदनशील दृष्टिकोन ठेवणे समाजहिताचे आहे. अन्यथा माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीचा नकारात्मक परिणाम महिला सुरक्षेवर होऊ शकतो. हे लक्षात घेऊन राष्ट्रीय महिला आयोग आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांनी संयुक्तरीत्या घेतलेली कार्यशाळा मोलाची ठरली आहे. या कार्यक्रमातील विचारमंथन माध्यम प्रतिनिधींसाठी दिशादर्शक ठरले.

माध्यमे समाजाचे 'नरेटिव्ह' घडवणारे प्रभावी शस्त्र

राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी या कार्यशाळेच्या उद्घाटनाच्या भाषणात आयोगाच्या भूमिकेविषयी अतिशय सुंदर विवेचन केले. त्यांच्या भाषणाने एकूणच कार्यशाळेची वैचारिक दिशा स्पष्ट केली. 'माध्यमे ही केवळ माहिती प्रसारित करणारी यंत्रणा नसून ती समाजाचे 'नरेटिव्ह' घडवणारे प्रभावी शस्त्र आहे,' असे त्यांचे आश्वासक प्रतिपादन सर्वांना आपल्या जबाबदारीची जाणीव करून देणारे होते. महिलांविषयक वृत्तांकन करताना त्याला शब्दांची धार आणि नैतिकतेच्या आधार असणे याबाबी माध्यमांच्या उत्तरदायित्वावर प्रकाश टाकतात. महिलांच्या विषयांचे वार्तांकन करताना संवेदनशीलता आणि अचूकता राखणे ही काळाची गरज आहे. विशेषत: भाषेच्या वापराबाबत त्यांनी अत्यंत मार्मिक भाष्य केले. 'महिलेची अब्रू लुटली' अशा शब्दांऐवजी गुन्हेगाराच्या कृत्यावर आसूड ओढणारी भाषा वापरली जाणे आवश्यक आहे. स्त्रीला पीडित म्हणून नव्हे, तर एक हक्कदार नागरिक म्हणून समाजात

मानाचे स्थान मिळवून देणे, हीच खऱ्या अर्थाने जबाबदार पत्रकारिता ठरेल, या त्यांच्या मार्गदर्शनाने सर्व उपस्थित भारावले.

महिला पत्रकारांनी तंत्रज्ञानाधारित कौशल्याने स्वतःला अद्ययावत ठेवावे

कोणते ही तंत्रज्ञान परिचित झाल्यानंतर त्याचा सर्वात मोठा लाभार्थी समाज व्यवस्थेतील प्रगत घटक असतो. महिला नेहमीच या स्पर्धेत मागे पडतात. हे न्यून दूर करण्यासाठी नव्या तंत्रज्ञानाची कास महिलांनी प्राधान्याने हाती धरावी, हे सूत्र माहिती व जनसंपर्क महासंचालनाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी आपल्या मार्गदर्शनात अगदी अचूकपणे मांडले.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विश्वातील आव्हाने आणि संधींचा पट उलगडताना श्री. ब्रिजेश सिंह यांनी सांगितले की, एआय हे उपलब्ध आकडेवारीवर चालते, त्यामुळे समाजातील जुने स्त्री-पुरुष भेदाचे पूर्वग्रह (Gender Bias) तंत्रज्ञानातून अधिक गडद होऊ नयेत, याची काळजी घेणे गरजेचे आहे. 'एआय तुमची नोकरी घेणार नाही, तर एआयचा वापर करणारा माणूस तुमची जागा घेईल,' असे ब्रिजेश सिंह यांनी आर्वजून सांगितले. त्यामुळे महिला पत्रकारांनी तंत्रज्ञानाचे हे नवीन 'कौशल्य' आत्मसात करून स्वतःला अद्ययावत ठेवणे हीच काळाची गरज आहे. एआय चा परिणाम समाजातील प्रत्येक घटकावर सारखा नसून तो वेगवेगळा असतो. प्रत्येक गोष्टीसाठी तंत्रज्ञानावर अवलंबून राहिल्याने नवी पिढी आपली मूळ बुद्धिमत्ता गमावण्याची भीती त्यांनी व्यक्त केली आहे.

तंत्रज्ञान विकासात महिलांचा सहभाग महत्त्वाचा

तंत्रज्ञान विकसित करण्याच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढल्यास ते अधिक सर्वसमावेशक होईल, असा विश्वास डॉ. रिचा सूद यांनी व्यक्त केला. तसेच माध्यम क्षेत्रातील महिलांनी एआयकडे भीती म्हणून न पाहता, आपली कार्यक्षमता वाढवणारे एक साधन म्हणून पाहिले पाहिजे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर शिकल्यास कामाचा दर्जा आणि वेग कित्येक पटीने वाढवता येईल. तंत्रज्ञानाचा वापर करून क्रांती घडवणाऱ्या महिलांच्या यशोगाथा पत्रकारांनी समाजासमोर आणल्या पाहिजेत. तंत्रज्ञानाचा वापर केवळ सोयीसाठी न करता, तो न्याय आणि समानतेसाठी व्हावा, अशी व्यवस्था निर्माण करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

महिला सक्षमीकरण व न्यायासाठी लेखणीचा प्रभावी वापर गरजेचा: स्वाती गुप्ता

माध्यमांमध्ये महिलांच्या बातम्या कशा प्रकारे मांडल्या जातात, यावर समाजाची प्रतिक्रिया अवलंबून असते. पीडितेचे वर्णन करताना तिला 'बळी' म्हणून न दाखवता, अन्यायाविरुद्ध लढणारी 'लढाऊ' व्यक्ती म्हणून समाजासमोर आणले पाहिजे. महिला सक्षमीकरण आणि न्यायासाठी पत्रकारांनी आपल्या लेखणीचा वापर प्रभावीपणे करावा. डिजिटल साक्षरतेवर भर देत, महिलांनी तंत्रज्ञानाच्या शर्यतीत मागे पडू नये, असे आवाहन केले. 'सायबर क्राईम' सारख्या नव्या आव्हानांचा सामना करताना महिलांनी तांत्रिकदृष्ट्या अधिक सक्षम होणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.



व्यवस्थेतील बदल आणि सुरक्षिततेचे कवच

माध्यमांनी केवळ 'टीआरपी'चा विचार न करता, पीडित महिलेच्या खासगीपणाचा आणि प्रतिष्ठेचा आदर करावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे यांनी केले. महिलांच्या हक्क आणि संरक्षणासाठी असलेल्या कायद्यांच्या जनजागृतीवर भर दिला. राज्य महिला आयोग आणि माध्यम क्षेत्र एकत्रितपणे काम करून महिलांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

आजची महिला केवळ ओळखीपुरती मर्यादित नसून ती विज्ञान, संरक्षण आणि शासनामध्ये नेतृत्व करत आहे. या 'परिवर्तनाच्या टप्प्या'मध्ये माध्यमांनी तिचे सकारात्मक प्रतिबिंब उमटवणे आवश्यक आहे. राष्ट्रीय महिला आयोगाने सुरू केलेला हा उपक्रम केवळ एका कार्यशाळेपुरता मर्यादित नसून, तो संवेदनशील आणि प्रगत भारताच्या निर्मितीसाठीचा एक महायज्ञ ठरावा, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

तंत्रज्ञानाचा गैरवापर करणाऱ्या काही अपप्रवृत्तींचा मोठा फटका समाजाला बसला आहे. त्यासोबतच तंत्रज्ञानापासून अनभिज्ञ राहिल्याने माध्यमांचा आवाका मर्यादित राहिला आहे. या पार्श्वभूमीवर स्वतःला अद्ययावत करण्यासोबतच आपल्या सुरक्षेबाबत सजगता निर्माण करण्यासाठी ही परिषद निश्चितच उपयुक्त ठरली.

सहायक संचालक (प्रकाशने)

दिव्यांगांच्या कल्याणाला सक्षमीकरणाची जोड

■ शैलजा पाटील

राज्यातील दिव्यांग बांधवांच्या आयुष्यात स्वावलंबन आणि सन्मानाची नवी पहाट उजाडली असून, केवळ 'कल्याण' नव्हे तर 'सक्षमीकरण' हेच आता शासनाचे ध्येय बनले आहे. डिजिटल तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड लाभलेल्या 'दिव्यांग साहाय्यक पोर्टल'मुळे प्रशासकीय अडथळे दूर होऊन हक्काच्या सेवा आता थेट उंबरठ्यापर्यंत पोहोचणार आहेत. २१ प्रवर्गांचा सर्वसमावेशक विचार, हक्काधारित दृष्टिकोन आणि स्वतंत्र 'राज्य दिव्यांग निधी'च्या माध्यमातून दिव्यांगांच्या कर्तृत्वाला नवे आकाश देण्याचा हा आश्वासक प्रयत्न आहे. करुणेची जागा आता कर्तबगारीने घेतली असून, मुख्य प्रवाहातील या सहभागामुळे समानतेच्या दिशेने राज्याची वाटचाल अधिक गतिमान होणार आहे.

राज्यातील दिव्यांग व्यक्तींच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यानुसार 'दिव्यांग कल्याण विभाग' या नावात बदल करून तो आता 'दिव्यांग सक्षमीकरण विभाग' या नावाने ओळखला जाणार आहे. तसेच विभागाच्या कामकाजात अधिक परिणामकारकता आणण्यासाठी विभागाची पुनर्रचना करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.



दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या अनुषंगाने दिव्यांग व्यक्तींकडे पाहण्याचा दृष्टिकोन 'कल्याणकेंद्री' न राहता 'हक्क आधारित सक्षमीकरण' असा झाला आहे. या पार्श्वभूमीवर दिव्यांग व्यक्तींना शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार, आर्थिक साहाय्य, सामाजिक सुरक्षा आणि पुनर्वसनाच्या संधी उपलब्ध करून देत त्यांच्या सक्षमीकरणावर शासनाचा भर राहणार आहे.

दिव्यांग क्षेत्रातील बदलती आव्हाने, नव्या तंत्रज्ञानाचा वाढता वापर तसेच माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांचा प्रभाव लक्षात घेऊन विभागाची पुनर्रचना करण्यात आली आहे. या प्रक्रियेत दिव्यांग क्षेत्रात कार्यरत संस्था, तज्ज्ञ आणि विविध घटकांचा सहभाग विचारात घेऊन रचना अधिक सर्वसमावेशक करण्यात आली आहे.

परिणामकेंद्रित व पारदर्शक प्रशासनावर भर

विभागाच्या पुनर्रचनेत प्रशासनातील अनावश्यक मानवी हस्तक्षेप कमी करून परिणामकेंद्रित, पारदर्शक व उत्तरदायी शासन व्यवस्था निर्माण करणे हे प्रमुख तत्त्व ठेवण्यात आले आहे. ऑनलाईन व कालबद्ध सेवा देऊन सेवांचे सुलभीकरण आणि जलद निर्णय प्रक्रिया यावरही भर देण्यात येणार आहे. मंत्रालय, आयुक्तालय आणि जिल्हास्तरावर कामकाजात सुसूत्रता यावी यासाठी भूमिका आधारित कामकाजाची विभागणी करण्यात आली आहे.

सुधारित आकृतीबंधास मान्यता

दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या पुनर्रचनेअंती मंत्रालयीन व क्षेत्रीय स्तरावरील एकूण २१०५ पदांच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये मंत्रालयीन प्रशासकीय विभागासाठी ६७ पदे (नियमित ५६ व बाह्ययंत्रणेद्वारे ११) तसेच आयुक्तालय, जिल्हास्तरीय कार्यालये आणि महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळासाठी नियमित १४०२ पदे व बाह्ययंत्रणेद्वारे ६३६ पदे समाविष्ट आहेत.

या आकृतीबंधानुसार १४५८ नियमित पदे, ६४७ बाह्यस्त्रोताद्वारे भरावयाची पदे आणि २०१ नव्याने निर्माण होणारी पदे मंजूर करण्यात आली आहेत.

२१ प्रवर्गांतील दिव्यांगांना योजनांचा लाभ

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत निर्धारित करण्यात आलेल्या सर्व २१ प्रवर्गांतील दिव्यांग व्यक्तींना राज्य शासन तसेच संबंधित यंत्रणांच्या विविध योजना, सवलती, लाभ, अनुदान आणि इतर सुविधांसाठी पात्र ठरविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय दिव्यांग व्यक्तींच्या सर्वसमावेशक सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे. यामुळे राज्यातील अधिकाधिक दिव्यांग नागरिकांना शासनाच्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळण्यास मोठी चालना मिळणार आहे.

या निर्णयानुसार अस्थिव्यंग, कुष्ठरोगमुक्त, मेंदूचा पक्षाघात, शारीरिक वाढ खुंटणे, स्नायूंची विकृती, आम्ल हल्ला पीडित, पूर्णतः अंधत्व, अंशतः अंध, कर्णबधिरता, वाचा/भाषा दोष, बौद्धिक अक्षम, विशिष्ट अध्ययन अक्षम, स्वमग्नता (Autism),

पोर्टलची माहिती

कार्यालयातील कामकाजाच्या सर्वसाधारण पद्धतीचे विभागाने 'बिझनेस प्रोसेस री-इंजिनिअरिंग' (BPR) द्वारे सुलभीकरण केले आहे. याअंतर्गत कामकाजाचे तीन स्तर निश्चित केले आहेत. दिव्यांग व्यक्तीने सर्वप्रथम या संकेतस्थळावर जाऊन आपले प्रोफाइल तयार करावे, त्याच्या प्रोफाइलच्या अनुषंगाने दिव्यांग व्यक्तीस पात्र योजनेसाठी अर्ज करता येईल.

दिव्यांग साहाय्यक पोर्टलची वैशिष्ट्ये

१. थेट लाभ हस्तांतरण (DBT): आधार आणि UDID मुळे दिव्यांग व्यक्तींची ओळख निश्चित केल्यामुळे दिव्यांग व्यक्तींनाच योजनांचा लाभ मिळणे शक्य.

२. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि 'व्हॉइस नोट्स'द्वारे तक्रार निवारण: दिव्यांग बांधवांची गरज ओळखून, एआय आधारित व्हॉट्सॲप चॅटबॉट सेवा उपलब्ध करण्यात आली आहे. ज्यांना टाईप करणे कठीण आहे, ते 'व्हॉइस नोट्स' द्वारे आपली तक्रार नोंदवू शकतील. यामुळे प्रशासन आणि दिव्यांग व्यक्तींमधील संवाद अधिक सुलभ आणि संवेदनशील झाला आहे.

३. पोर्टलवर उपलब्ध करून दिलेल्या माहितीमुळे दिव्यांग व्यक्ती आणि त्यांचे पालक तसेच संस्थांना शिक्षण, कौशल्य विकास आणि पुनर्वसनाचे (Rehabilitation) पूर्व-नियोजन करणे शक्य होणार आहे.

४. प्रशासकीय पारदर्शकता आणि अचूकता: (बनावट लाभार्थ्यांना आळा:) युडीआयडी आणि आधारच्या एपीआय वापरामुळे दुबार आणि बनावट लाभार्थी शोधणे सोपे झाले आहे.
प्रो-ॲक्टिव्ह गव्हर्नन्स: शिक्षण विभागाच्या (UDISE) डेटाचा वापर करून गरजू विद्यार्थ्यांपर्यंत विभाग स्वतः पोहोचून त्यांना योजनेचा लाभ देईल.

५. मॉड्यूल्सचा मास्टरप्लॅन: या पोर्टलमध्ये एकूण ११ मॉड्यूल्स प्रस्तावित असून, पहिल्या टप्प्यात ४ मॉड्यूल्स (योजना वितरण, संस्था व्यवस्थापन, तक्रार निवारण आणि डॅशबोर्ड) कार्यान्वित होत आहेत. पुढील टप्प्यात ॲक्सेसिबिलिटी ऑडिट आणि अर्ली इंटरव्हेन्शन सेंटर यांसारख्या सेवा जोडल्या जातील.



मानसिक आजार, मल्टिपल स्क्लेरोसिस, पार्किन्सन, हिमोफिलिया, थॅलेसेमिया, सिकल सेल, मज्जासंस्थेचे तीव्र आजार आणि बहुविकलांग अशा सर्व २१ प्रवर्गांचा समावेश करण्यात आला आहे.

'दिव्यांग साहाय्यक पोर्टल'मुळे सेवा वितरणाला गती

दिव्यांग व्यक्तींना शासकीय योजनांचा लाभ सुलभ, पारदर्शक आणि वेळेत मिळावा यासाठी दिव्यांग कल्याण विभागाने 'दिव्यांग साहाय्यक पोर्टल' (https://divyangsahayakportal.maharashtra.gov.in) विकसित केले आहे. या पोर्टलमुळे सेवा वितरण अधिक सुलभ व पारदर्शक होणार आहे.

एकात्मिक डिजिटल व्यासपीठाद्वारे दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या पात्रतेनुसार योजना शोधणे, ऑनलाइन अर्ज करणे आणि अर्जाची स्थिती रिअल-टाइममध्ये पाहणे शक्य होणार आहे. विविध योजनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होत असल्याने लाभार्थ्यांना घरबसल्या सोयीस्करपणे सेवा मिळतील. दिव्यांग व्यक्तींच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना मुख्य प्रवाहात सामावून घेणे आणि स्वावलंबी बनविणे हा शासनाचा उद्देश असून, या पोर्टलमुळे 'ईज ऑफ लिव्हिंग' मध्ये लक्षणीय वाढ होणार आहे.

'महाराष्ट्र राज्य दिव्यांग निधी' स्थापन

राज्यातील दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घेत 'महाराष्ट्र राज्य दिव्यांग निधी' स्थापन करण्यास मंजुरी दिली आहे. या निधीसाठी प्रारंभी २० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, दिव्यांगांच्या हक्काधारित, सर्वसमावेशक आणि परिणामकारक सक्षमीकरणाला यामुळे भक्कम आर्थिक पाठबळ मिळणार आहे.

या निधीत राज्य शासनाच्या प्रारंभिक तरतुदीसोबतच व्यावसायिक सामाजिक दायित्व (CSR), देणग्या, अनुदान आणि इतर विविध स्रोतांमधून मिळणारा निधीही समाविष्ट केला जाणार आहे. निधीच्या विनियोगासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समित्यांकडून प्रस्ताव प्राप्त केले जातील. हे प्रस्ताव आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण यांच्याकडे सादर होऊन त्यांची सखोल छाननी करण्यात येईल. त्यानंतर अभिप्राय व शिफारशींसह प्रस्ताव दिव्यांग सक्षमीकरण विभागामार्फत नियामक मंडळासमोर सादर केले जातील. नियामक मंडळाच्या मान्यतेनंतरच निधीचा अंतिम विनियोग करण्यात येणार असून, यामुळे निधीचा पारदर्शक, गरजाधारित आणि परिणामकारक वापर सुनिश्चित होणार आहे.

राज्य निधीच्या माध्यमातून नियमित योजनांच्या चौकटीत न बसणारे किंवा निधीअभावी अपूर्ण राहिलेले उपक्रम राबविण्यास प्राधान्य दिले जाणार आहे. पुनर्वसन, रोजगार व उपजीविका, कौशल्य विकास, शिक्षण, आरोग्य सेवा, साहाय्यक साधनांची उपलब्धता तसेच समुदायाधारित समावेशक विकास या क्षेत्रांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.

दिव्यांग सक्षमीकरण विभागाची स्थापना, डिजिटल उपक्रमांची अंमलबजावणी आणि स्वतंत्र निधीची निर्मिती या उपक्रमांमुळे दिव्यांग व्यक्तींना केवळ शासकीय मदतच नव्हे, तर सन्मानाने आणि आत्मविश्वासाने जीवन जगण्याची संधी मिळेल. शासनाचा हा प्रयत्न दिव्यांगांना मुख्य प्रवाहात आणत त्यांच्या क्षमतांना वाव देणारा ठरेल आणि समाजात समानता व न्याय्यतेची भावना अधिक दृढ करेल.

विभागीय संपर्क अधिकारी

‘ज्ञानभारतम्’: भारताच्या प्राचीन ज्ञानपरंपरेचे डिजिटल पुनरुज्जीवन

■ संजय डी.ओरके

भारताच्या प्राचीन आणि अथांग ज्ञानपरंपरेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन ती जागतिक स्तरावर नेण्यासाठी भारत सरकारने ‘ज्ञानभारतम्’ हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू केला आहे. शतकानुशतके हस्तलिखितांच्या स्वरूपात जतन केलेला हा अमूल्य ठेवा काळानुरूप नष्ट होऊ नये, यासाठी त्याचे शास्त्रशुद्ध डिजिटायझेशन करून ‘राष्ट्रीय डिजिटल संग्रह’ उभारणे हे या मोहिमेचे मुख्य ध्येय आहे. केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये घोषित झालेली ही मोहीम १६ मार्च २०२६ पासून एका जनआंदोलनाचे स्वरूप घेत असून, विशेष ॲपच्या माध्यमातून यात नागरिकांचाही सहभाग सुनिश्चित करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील अग्रगण्य संस्थांच्या सोबतीने राबवला जाणारा हा उपक्रम भारताला पुन्हा एकदा जगाचा ‘ज्ञानगुरू’ म्हणून प्रस्थापित करण्याच्या दिशेने उचललेले एक ऐतिहासिक पाऊल ठरणार आहे.



भारतीय संस्कृतीची ओळख केवळ तिच्या भौगोलिक सीमांवरून ठरत नाही, तर ती ठरते इथल्या हजारो वर्षांच्या अखंड आणि प्रगल्भ ज्ञानपरंपरेवरून. वेद, उपनिषद, आयुर्वेद, खगोलशास्त्र, गणित, वास्तुकला, योग आणि तत्त्वज्ञान यांसारख्या विविध विषयांमधील भारतीयांचे अथांग ज्ञान शतकानुशतके एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत आले आहे. सुरुवातीला श्रुती-स्मृतीच्या (पाठांतराच्या) माध्यमातून आणि नंतर ताडपत्रे, भूर्जपत्रे, ताम्रपट आणि कागदांवर लिहून काढलेल्या ‘हस्तलिखितांच्या’ माध्यमातून हा अमूल्य ठेवा जतन करण्यात आला.

परंतु आज काळ बदलला आहे. धूळ खात पडलेले पेटारे, जुन्या वाड्यांचे कोनाडे आणि देवघरांमधील बासनात बांधून ठेवलेली ही मौल्यवान हस्तलिखिते आज काळाच्या ओघात, वाळवीच्या प्रादुर्भावाने आणि दुर्लक्षामुळे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. याच विखुरलेल्या, अज्ञात आणि दुर्लक्षित ज्ञानसंपदेला नवसंजीवनी देण्यासाठी आणि तिला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाने ‘ज्ञानभारतम्’ (Gyan Bharatam) या प्रकल्पाने एक ऐतिहासिक आणि महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले आहे.

सांस्कृतिक प्रबोधन :

‘ज्ञानभारतम्’ हा केवळ एक शासकीय प्रकल्प नाही, तर भारताने जगाचे नेतृत्व करण्यासाठी दिलेली नवीन संधी आहे. केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये या क्रांतिकारी ‘ज्ञानभारतम्’ उपक्रमाची घोषणा करण्यात आली आणि १६ मार्च २०२६ रोजी या मोहिमेचा अधिकृत व दिमाखदार प्रारंभ झाला.

या प्रकल्पाचा मूळ गाभा म्हणजे भारताच्या कानाकोपऱ्यात विखुरलेल्या हस्तलिखितांचा शोध घेणे, त्यांचे शास्त्रशुद्ध दस्तऐवजीकरण करणे आणि त्यांना कायमस्वरूपी डिजिटल स्वरूप देऊन जागतिक स्तरावर उपलब्ध करून देणे. प्राचीन काळातील ऋषीमुनी, विचारवंत आणि शास्त्रज्ञांनी जे ज्ञान मोठ्या कष्टाने लिहून ठेवले, ते ज्ञान आजच्या इंटरनेट आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) युगात नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा हा एक भव्य पूल आहे.

राष्ट्रीय डिजिटल संग्रह :

या प्रकल्पाचे ध्येय अत्यंत स्पष्ट आणि व्यापक आहे. यात सर्वप्रथम देशातील प्रत्येक गाव, शहर, मंदिरे, मठ, जुने वाडे आणि खासगी संग्राहक यांच्याकडे असलेल्या हस्तलिखितांचा अचूक शोध घेऊन त्याचे अचूक सर्वेक्षण करणे. या मोहिमेअंतर्गत देशभरातील किमान १ कोटीहून अधिक हस्तलिखितांची नोंदणी करण्याचे महाकाय लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. यात जुन्या आणि जीर्ण झालेल्या कागदपत्रांचे व पानांचे अतिशय काळजीपूर्वक स्कॅनिंग करून त्यांचे डिजिटल स्वरूप जतन करण्यात येणार आहे. तसेच या सर्व माहितीचे एकत्रीकरण करून एक 'राष्ट्रीय डिजिटल संग्रह' (National Digital Repository) उभारण्यात येणार, जेणेकरून जपान, अमेरिका किंवा युरोपमध्ये बसलेला एखादा संशोधकही भारताच्या प्राचीन न्यायशास्त्र किंवा आयुर्वेदावर एका क्लिकवर संशोधन करू शकेल.

शासन आणि नागरिकांची सांगड :

देशव्यापी ही मोहीम १६ मार्च २०२६ पासून सुरू झालेली केवळ सरकारी अधिकाऱ्यांपुरती मर्यादित नाही, याला खऱ्या अर्थाने 'जनआंदोलना'चे स्वरूप प्राप्त झाले आहे. यात संस्थात्मक सहभाग जसे देशातील विद्यापीठे, महाविद्यालये, संग्रहालये, मोठी ग्रंथालये आणि धार्मिक संस्था या मोहिमेत हिरिरीने सहभागी होत आहेत. त्याचबरोबर आजची तरुण पिढी आपल्या मुळांशी जोडली जावी म्हणून एनसीसी (NCC), एनएसएस (NSS), स्काऊट गाईड, स्वयंसेवक आणि विद्यार्थी यांना या सर्वेक्षणात सामावून घेण्यात आले आहे. हे तरुण तंत्रज्ञानात पारंगत असल्याने या मोहिमेला अभूतपूर्व गती मिळत आहे.

'Gyan Bharatam' मोबाईल ॲप

प्राचीन ज्ञानाला आधुनिक तंत्रज्ञानाच्या साच्यात बसवण्यासाठी विकसित करण्यात आलेले 'Gyan Bharatam' मोबाईल ॲप या संपूर्ण प्रकल्पाचा कणा आहे. हे ॲप इतके सोपे आणि युजर-फ्रेंडली बनवले आहे



की, खेड्यातील एखादा सामान्य नागरिकही आपल्या घरातील हस्तलिखिताची नोंद घरबसल्या करू शकतो.

या ॲपची वैशिष्ट्ये:

- **बहुभाषिक प्लॅटफॉर्म:** भारताच्या भाषिक विविधतेचा सन्मान करत हे ॲप इंग्रजीसोबतच संविधानाच्या ८ व्या अनुसूचीतील २२ अनुसूचित भाषा अशा एकूण २३ भाषांमध्ये उपलब्ध आहे.
- **अत्यंत सोपे लॉगिन:** कोणत्याही किचकट प्रक्रियेशिवाय केवळ मोबाईल क्रमांक (OTP) किंवा ई-मेल आयडी वापरून यात प्रवेश करता येतो.
- **वैविध्यपूर्ण प्रोफाइल:** तुम्ही एक सामान्य नागरिक आहात, एखादी मोठी संस्था आहात, किंवा शासनाने नेमलेले सर्वेक्षक आहात प्रत्येकासाठी यात स्वतंत्र प्रोफाइल तयार करण्याची सोय आहे.
- **अचूक जिओ-टॅगिंग (GPS Location):** हस्तलिखित नेमके कुठे आहे, हे जगाच्या नकाशावर अचूकपणे नोंदवण्यासाठी यात GPS लोकेशनचा वापर केला जातो, ज्यामुळे 'ज्ञानाचा भूगोल' तयार होण्यास मदत होईल.
- **थेट छायाचित्रण** (Photo Upload): माहितीची सत्यता पडताळण्यासाठी हस्तलिखिताचा फोटो थेट ॲपवरून काढून अपलोड करणे अनिवार्य आहे.
- **सविस्तर माहितीची नोंद:** हस्तलिखिताची भाषा, लिपी (उदा. मोडी, ब्राह्मी, शारदा, देवनागरी), पानांची संख्या, त्याची सद्यस्थिती (चांगली की जीर्ण) या सर्व गोष्टींची नोंद घेता येते.
- **युनिक ट्रॅकिंग आयडी:** नोंदणी पूर्ण होताच वापरकर्त्याला एक 'युनिक रिक्वेस्ट आयडी' मिळतो, ज्याद्वारे तो आपल्या हस्तलिखिताच्या डिजिटायझेशन प्रक्रियेचा मागोवा (Track) घेऊ शकतो.

महाराष्ट्राचे योगदान:

छत्रपती शिवाजी महाराज, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या आणि प्रदीर्घ ऐतिहासिक वारसा लाभलेल्या महाराष्ट्र राज्याने या प्रकल्पात आघाडी घेतली आहे. राज्य शासनाच्या 'पुराभिलेख संचालनालयाला' (Directorate of Archives) महाराष्ट्रासाठी 'राज्य नोडल संस्था' म्हणून अत्यंत महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे.

राज्यातील हस्तलिखितांचा अनमोल खजिना शोधण्यासाठी आणि त्याचे जतन करण्यासाठी महाराष्ट्रातील खालील जागतिक कीर्तीच्या संस्थांची नियुक्ती करण्यात आली आहे:

१. कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक (नागपूर): संस्कृत आणि प्राच्यविद्या संशोधनातील अग्रगण्य विद्यापीठ.
२. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे: जिथे महाभारताची चिकित्सक

आवृत्ती तयार झाली, अशी आंतरराष्ट्रीय ख्यातीची संस्था.

३. आनंद आश्रम संस्थान, पुणे: प्राचीन पोथ्या आणि ग्रंथांचे जतन करणारी ऐतिहासिक वास्तू.

४. भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे: महाराष्ट्राच्या आणि शिवकालीन इतिहासाचे सर्वात मोठे आणि अस्सल दस्तऐवज असणारी संस्था.

या संस्थांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील घराघरांत, वाड्यांमध्ये आणि मंदिरांमध्ये दडलेला अमूल्य ठेवा आता जगासमोर येणार आहे.

विश्वासाची हमी:

अनेकदा नागरिकांच्या मनात अशी भीती असते की, आपण शासकीय ॲपवर माहिती दिली, तर शासन आपले हस्तलिखित किंवा पोथी जप्त करेल. 'ज्ञानभारतम्' प्रकल्पाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे याने ही भीती दूर केली आहे.

- **मालकी हक्क अबाधित:** हस्तलिखिताची मूळ मालकी ज्या व्यक्तीकडे किंवा संस्थेकडे आहे, ती त्यांच्याकडेच सुरक्षित राहील. शासन केवळ त्याचे 'डिजिटल स्वरूप' (Photos/Scans) जतन करेल.
- **स्वेच्छा समर्पण:** जर एखाद्या व्यक्तीला असे वाटले की, त्यांच्याकडे हे हस्तलिखित जतन करण्याची योग्य व्यवस्था नाही, तर ते स्वेच्छेने शासनाकडे किंवा नियुक्त संस्थांकडे ते कायमस्वरूपी जतनासाठी सुपुर्द करू शकतात.
- **सुरक्षितता:** या माध्यमातून तुमच्या घरातील ऐतिहासिक वारशाची एक सुरक्षित 'डिजिटल प्रत' तयार राहील, ज्यामुळे भविष्यात मूळ प्रत खराब झाली तरी ज्ञान नष्ट होणार नाही.

सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्रांती :

'ज्ञानभारतम्' हा केवळ जुन्या कागदपत्रांचे फोटो काढण्याचा प्रकल्प नाही. ही भारताच्या 'डिजिटल इंडिया' मोहिमेची पुढील आणि प्रगल्भ पायरी आहे. आजवर



अनेक आजारांवरील उपाय, शेतीचे प्राचीन तंत्रज्ञान, हवामानाचा अंदाज बांधण्याच्या पद्धती, जलव्यवस्थापन आणि धातूशास्त्राचे ज्ञान या हस्तलिखितांमध्ये कुलूपबंद होते. हे हस्तलिखित डिजिटल झाल्यावर त्यावर कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि 'मशीन लर्निंग'च्या माध्यमातून संशोधन होईल. अज्ञात असलेल्या प्राचीन लिपी वाचल्या जातील. भारताच्या बौद्धिक संपदेचे (Intellectual Property) खऱ्या अर्थाने पुनरुज्जीवन होईल.

जनतेला आवाहन :

भारताचा हा तेजस्वी वारसा वाचवणे हे केवळ शासनाचे काम नाही. हे प्रत्येक भारतीयाचे आद्य कर्तव्य आहे. तुमच्या घरातील जुन्या पेट्या, देवघरातील बासने, आजोबा-पणजोबांचे जुने कपाट उघडा. त्यात एखादी जुनी पोथी, ताडपत्र, मोडी लिपीतील पत्र किंवा जुने पंचांग सापडल्यास ते फेकून देऊ नका किंवा रद्दीत विकू नका. स्मार्टफोन काढा, 'Gyan Bharatam' ॲप डाऊनलोड करा आणि त्या हस्तलिखिताची नोंद करा. तुमचे हे एक छोटेसे पाऊल भारताचा हजारो वर्षांचा इतिहास पुढील हजारो वर्षांसाठी जिवंत ठेवणार आहे.

आपल्या पूर्वजांनी जगाला शून्याची देणगी दिली, विश्वाचे रहस्य उलगडून सांगितले आणि मानवी जीवनाला तत्त्वज्ञानाचा आधार दिला. हाच अनमोल 'हस्तलिखित वारसा' एकत्र करून त्याचे जतन, संवर्धन आणि जागतिक स्तरावर प्रसार करणारे हे ऐतिहासिक पाऊल भविष्यातील पिढ्यांसाठी दिशादर्शक ठरेल. भारताला पुन्हा एकदा जगाचा 'ज्ञानगुरू' म्हणून सिंहासनावर विराजमान करण्याच्या दिशेने 'ज्ञानभारतम्'हा एक सुवर्ण अध्याय आहे. या ज्ञानयज्ञात आपणही सहभाग नोंदवू या!

विभागीय संपर्क अधिकारी

‘मासूम’ मनाला ‘मानस’ आधार: भविष्य घडविणारी नवी पाऊलवाट

श्रद्धा मेश्राम

‘राज्यातील बालकांच्या केवळ भौतिक गरजा भागवून चालणार नाही, तर त्यांचे मानसिक आरोग्य आणि भावनिक स्थैर्य जपणे ही काळाची गरज आहे. हीच गरज ओळखून महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाने ’मासूम’ आणि ’मानस’ या दोन महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची सांगड घातली आहे. संकटग्रस्त बालकांच्या मानसिक जखमांवर फुंकर घालणारा ’मासूम’ आणि शालेय स्तरावर विद्यार्थ्यांचे मानसिक सक्षमीकरण करणारा ’मानस’ हे प्रकल्प भविष्यातील सुदृढ, संवेदनशील आणि सक्षम महाराष्ट्र घडवण्यासाठी उचललेली क्रांतीकारी पावले ठरत आहेत.’

राज्यातील महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी महिला व बालविकास विभाग तर बालकांच्या सुरक्षा, हक्क आणि अधिकारांसाठी राज्य बाल हक्क आयोग कार्यरत आहे. मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या बालकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हे विभाग प्रयत्नशील आहेत. बालके हेच देशाचे भविष्य असल्याने ती अधिक सक्षम आणि मानसिकदृष्ट्या सशक्त बनण्यासाठी राज्य शासन विविध प्रकल्प राबवित आहे.

महाराष्ट्रात बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ शैक्षणिक प्रगती पुरेशी नसून मानसिक आरोग्य आणि भावनिक स्थैर्यही तितकेच महत्त्वाचे आहे, ही जाणीव आता धोरणात्मक पातळीवर अधिक ठळकपणे दिसून येत आहे. महिला व बालविकास विभागाने याच व्यापक दृष्टिकोनातून ‘मासूम’ आणि ‘मानस’ हे दोन स्वतंत्र; परंतु परस्परपूरक प्रकल्प राबवून बालकांच्या मानसिक सक्षमीकरणाला नवी दिशा दिली आहे. हे दोन्ही उपक्रम वेगवेगळ्या स्तरांवर कार्य करत असले, तरी त्यांची सांगड घातली असता राज्यातील बालकल्याणाचा एक सुसंगत, संवेदनशील आणि दूरदृष्टीपूर्ण आराखडा स्पष्टपणे समोर येतो.

बालकल्याण व मानसिक आरोग्य क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी महिला व बालविकास विभागाने आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या एमपॉवर उपक्रमासोबत भागीदारी केली आहे. या प्रकल्पासाठी फेब्रुवारी २०२३ मध्ये सामंजस्य करार (MoU) करण्यात आला. ‘मासूम’ प्रकल्प सुरुवातीला महाराष्ट्रातील पाच विभागांमध्ये पायलट स्वरूपात राबविण्यात आला होता. नवीन सामंजस्य करार (MoU) अंतर्गत आता हा प्रकल्प राज्य शासनाने निश्चित केलेल्या १२१ बालसंगोपन संस्थांमध्ये विस्तारित करण्यात आला आहे.

‘मासूम’ प्रकल्प हा बालसंगोपन संस्थांमध्ये राहणाऱ्या मुलांच्या मानसिक आरोग्याच्या गरजांवर लक्ष केंद्रित करणारा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. अनाथ, तस्करीतून वाचवलेली, कुटुंबाकडून दुर्लक्षित किंवा कायद्याच्या संघर्षात असलेली मुले अनेकदा आयुष्यातील कठोर अनुभवांमुळे मानसिक आघात सहन करत असतात. त्यांच्या मनातील भीती, असुरक्षितता आणि वेदना अनेक वेळा व्यक्तही होत नाहीत. अशा परिस्थितीत ‘मासूम’ प्रकल्प त्यांच्यासाठी एक संवेदनशील आधार ठरतो.

एमपॉवर (Mpower) या उपक्रमाच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पाद्वारे मुलांचे मानसशास्त्रीय स्क्रिनिंग करून त्यांच्या गरजेनुसार समुपदेशन व थेरपी दिली जाते. पारंपरिक समुपदेशनाच्या चौकटीपलीकडे जाऊन कला-आधारित थेरपीचा वापर केल्यामुळे मुले त्यांच्या भावनांना अधिक सहजतेने व्यक्त करू शकतात. त्यांच्या वर्तनात सकारात्मक बदल दिसून येतो आणि त्यांना नव्या आशेने आयुष्याकडे पाहण्याची प्रेरणा मिळते. पुढील टप्प्यात ऑक्युपेशनल थेरपीसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्याची योजना या प्रकल्पात आहे, जी मुलांच्या पुनर्वसन प्रक्रियेला अधिक बळकटी देईल.

'मासूम' प्रकल्पाची एक महत्त्वाची बाजू म्हणजे केवळ मुलांपुरते मर्यादित न राहता त्यांच्या आजूबाजूच्या व्यवस्थेलाही सक्षम करणे. बालकल्याण समितीचे सदस्य, जिल्हा बाल संरक्षण यंत्रणा आणि संस्थांतील कर्मचारी यांना मानसिक आरोग्याविषयी प्रशिक्षण दिल्यामुळे मुलांसाठी अधिक समजूतदार आणि समर्थ वातावरण तयार होत आहे. त्यामुळे मुलांच्या पुनर्वसनाचा प्रवास अधिक सुलभ आणि परिणामकारक ठरत आहे.

आजपर्यंत या प्रकल्पांतर्गत २० संस्थांमधील १,८६१ मुलांना सेवा देण्यात आली असून ५,००० पेक्षा अधिक समुपदेशन सत्रे घेण्यात आली आहेत. तीन महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी थेरपी घेतलेल्या मुलांमध्ये भावनिक स्थैर्य व सामाजिक वर्तनात लक्षणीय सुधारणा आढळून आली आहे. तसेच पालक व पालकत्व स्वीकारलेल्या व्यक्तींनाही समुपदेशन देऊन कुटुंब पुनर्संलग्नतेला (reintegration) मदत केली जाते.

राज्यव्यापी विस्तारानंतर, 'मासूम' प्रकल्प अधिक व्यापक स्वरूपात कार्य करणार असून संस्थांचे अधीक्षक, बालकल्याण समित्या व किशोर न्याय मंडळ यांच्याशी समन्वय साधून प्रत्येक मुलासाठी हितकारक उपाययोजना सुनिश्चित केल्या जातील. प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी मासिक व त्रैमासिक अहवाल सादर केले जातील. याचवेळी, राज्य बाल हक्क संरक्षण आयोग व मनमुक्त फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'मानस प्रकल्प - सुरक्षित बालपण, समृद्ध महाराष्ट्र' अंतर्गत बालकांच्या मानसिक आरोग्यासाठी विशेष अभियान राबविण्यात येणार असून याची सुरुवात पायलट स्वरूपात राज्यातील १० जिल्ह्यांमध्ये करण्यात येणार आहे.

'मानस' प्रकल्प शालेयस्तरावर बालकांच्या मानसिक आरोग्याच्या जतनासाठी कार्यरत आहे. आजच्या स्पर्धात्मक आणि ताणतणावपूर्ण वातावरणात विद्यार्थी अनेक मानसिक आव्हानांना सामोरे जात आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य बाल हक्क



संरक्षण आयोग आणि मनमुक्त फाउंडेशन यांच्या सहकार्याने राबविण्यात येणारा 'मानस' प्रकल्प विद्यार्थ्यांच्या भावनिक सक्षमीकरणावर भर देतो.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये स्व-जाणीव, भावनिक बुद्धिमत्ता, तणाव व्यवस्थापन, निर्णयक्षमता आणि नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी विशेष अभ्यासक्रम तयार केला जात आहे. Activity-based आणि experiential learning पद्धतींमुळे शिक्षण अधिक अनुभवाधारित आणि परिणामकारक बनते. यामुळे विद्यार्थी केवळ अभ्यासातच नव्हे, तर जीवनाच्या विविध पैलूंमध्येही सक्षम बनतात.

'मानस' प्रकल्पाची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे त्याचा समग्र दृष्टिकोन. विद्यार्थ्यांबरोबरच पालक आणि शिक्षक यांचाही सक्रिय सहभाग या प्रक्रियेत महत्त्वाचा मानला गेला आहे. पालकांसाठी 'conscious parenting' चे प्रशिक्षण आणि शिक्षकांसाठी भावनिक साहाय्य व वर्ग व्यवस्थापनाचे मार्गदर्शन यामुळे विद्यार्थ्यांसाठी अधिक सकारात्मक आणि तणावमुक्त वातावरण निर्माण होत आहे.

'मासूम' आणि 'मानस' हे दोन्ही प्रकल्प वेगवेगळ्या पातळ्यांवर कार्य करत असले, तरी त्यांचा अंतिम उद्देश एकच – मुलांना भावनिकदृष्ट्या सक्षम, आत्मविश्वासी आणि सशक्त बनवणे. एकीकडे 'मासूम' प्रकल्प संकटग्रस्त मुलांच्या मानसिक जखमा भरून काढण्याचे कार्य करतो, तर दुसरीकडे 'मानस' प्रकल्प सर्वसामान्य विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्याबाबत जागरूकता आणि सक्षमता निर्माण करतो. या दोन्ही उपक्रमांची सांगड घातल्यास बालकांच्या विकासाचा एक व्यापक आणि संतुलित आराखडा तयार होतो.

महिला व बालविकास विभागाच्या या उपक्रमांमुळे महाराष्ट्रात बालकांच्या मानसिक आरोग्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक संवेदनशील आणि सकारात्मक झाला आहे. हे प्रकल्प केवळ समस्या सोडविण्यापुरते मर्यादित न राहता मुलांना त्यांच्या क्षमतेची जाणीव करून देतात आणि त्यांना उज्ज्वल भविष्याच्या दिशेने मार्गदर्शन करतात.

अशा प्रकारे, 'मासूम' आणि 'मानस' या उपक्रमांद्वारे महाराष्ट्र एक सशक्त, संवेदनशील आणि बालमैत्रीपूर्ण समाज घडविण्याच्या दिशेने ठामपणे पुढे जात आहे. हे प्रयत्न केवळ आजच्या पिढीसाठीच नव्हे, तर भविष्यातील सुदृढ आणि सक्षम समाजाची पायाभरणी करण्यासाठीही अत्यंत महत्त्वाचे ठरत आहेत.

विभागीय संपर्क अधिकारी

मुख्यमंत्री साहाय्यता निधीची नवी ऑनलाईन प्रणाली :

उपचारासाठी आर्थिक मदतीला वेग

■ रामेश्वर नाईक

'राज्यातील कोणताही गरजू रुग्ण उपचाराअभावी वंचित राहू नये,' हा संवेदनशील दृष्टिकोन समोर ठेवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री साहाय्यता निधी कक्षाचे सक्षमीकरण केले आहे. नव्या ऑनलाईन प्रणालीमुळे तांत्रिक अडथळे दूर होऊन रुग्ण, रुग्णालय आणि शासन यांच्यात एक मजबूत दुवा निर्माण झाला आहे. विशेषतः कर्करोगासारख्या महागड्या उपचारांसाठी ही प्रणाली एक मोठा आधार ठरत असून, 'विकसित महाराष्ट्र'च्या दिशेने उचललेले हे एक आश्वासक पाऊल आहे.



राज्यातील आर्थिकदृष्ट्या गरीब, गरजू असणाऱ्या रुग्णांना गंभीर व जीवघेण्या आजारांसाठी मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून उपचाराकरिता आर्थिक मदत दिली जाते. मुख्यमंत्री साहाय्यता निधीची नवी ऑनलाईन प्रणाली कार्यान्वित झाल्यामुळे या मदतीला वेग येऊन रुग्णांना दिलासा मिळतो. त्यामुळे गरजू रुग्णांना वेळेत उपचार घेणे शक्य होत असून अनेक कुटुंबांना मोठा आधार मिळतो. उपचारासाठी आर्थिक मदतीला वेग, रुग्णांना मोठा दिलासा ही या योजनेची ठळक ओळख ठरत आहे. या मदतीमागे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे संवेदनशील नेतृत्व आणि प्रशासनातील कार्यक्षमतेवर दिलेला भर महत्त्वाचा ठरत आहे.

राज्यातील कोणताही गरजू रुग्ण उपचाराअभावी वंचित राहू नये, आरोग्य ही मूलभूत गरज प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचली पाहिजे, हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा स्पष्ट दृष्टिकोन आहे. यासाठी मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाची कार्य प्रणाली अधिक सक्षम आणि प्रभावी करण्याचा ठोस निर्णय घेण्यात आला.

या पारंपरिक प्रक्रियेत आमूलाग्र बदल करत डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात आला. अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन करण्यात आली असून जिल्हास्तरावर मुख्यमंत्री साहाय्यता निधी कक्ष स्थापन करून सेवा रुग्णांच्या जवळ पोहोचवण्यात आली आहे. आता रुग्णालयांमार्फत थेट ऑनलाइन अर्ज सादर केला जातो, कागदपत्रांची डिजिटल पडताळणी होते आणि सर्व काही योग्य असल्यास तात्काळ मंजुरी दिली जाते. मंजूर रक्कम थेट रुग्णालयाच्या खात्यात जमा होत असल्याने पारदर्शकता आणि विश्वासार्हता अधिक बळकट झाली आहे. या सुधारणांमुळे मदत मिळण्याबाबतची अनिश्चितता दूर होऊन, आता 'मदत किती जलद मिळते' यावरच भर देण्यात येत आहे.

रुग्णालयातून थेट अर्ज

नवीन प्रणालीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे रुग्णांना स्वतः अर्ज करण्याची गरज राहणार नाही. उपचारासाठी आवश्यक कागदपत्रे रुग्णालयात जमा केल्यानंतर संबंधित रुग्णालयच थेट मुख्यमंत्री साहाय्यता कक्षाकडे ऑनलाईन अर्ज सादर करणार आहे. यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची धावपळ कमी होऊन उपचार प्रक्रिया अधिक वेगवान होणार आहे.

कार्यालयीन ८ तासांत अर्ज मंजुरी

या प्रणालीमुळे अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन ८ तासांत पूर्ण होणार आहे. कागदपत्रे पूर्ण व योग्य असल्यास मंजुरी तत्काळ मिळणार असल्याने गंभीर आजारांवरील उपचारांना विलंब होणार नाही.

मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधी कक्ष हा केवळ आर्थिक मदतीचा स्रोत नसून रुग्ण, रुग्णालये आणि शासन यांना एकत्र आणणारे प्रभावी व्यासपीठ ठरत आहे. विशेषतः कर्करोगावरील जटील व खर्चिक उपचारांसाठी या प्रणालीमुळे मोठा आधार मिळणार आहे.

– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



गेल्या वर्षात ३३३ कोटींची मदत

राज्यातील ४०,७७६ रुग्णांना १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत एकूण ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. नव्या प्रणालीमुळे ही मदत अधिक पारदर्शक आणि जलद पद्धतीने वितरित होणार आहे.

नवीन प्रणालीची ठळक वैशिष्ट्ये

१. रिअल-टाईम अर्ज ट्रॅकिंग : यापुढे रुग्णांना अर्जाची माहिती त्यांच्या मोबाईलवर एसएमएस, लिंकद्वारे रिअल टाईम उपलब्ध होणार

२. टप्प्याटप्प्याने निधी वितरण : अर्जाच्या मंजुरीनंतर ३० टक्के रक्कम तत्काळ, उर्वरित ७० टक्के रक्कम अंतिम मंजुरीनंतर वर्ग केली जाणार.

३. वॉर रूम मॉनिटरिंग : मंत्रालय स्तरावर वॉर रूमद्वारे सतत देखरेख, निर्णय प्रक्रियेला गती

४. पेपरलेस प्रक्रिया : सर्व प्रक्रिया डिजिटल पद्धतीने कागदपत्रांची देवाणघेवाण टळली

५. कागदपत्रांची ऑनलाईन पडताळणी : आधार, उत्पन्न प्रमाणपत्र, शिधापत्रिका इ.तत्काळ डिजिटल पडताळणी

६. डीबीटीद्वारे थेट निधी : मंजूर रक्कम थेट रुग्णालयाच्या खात्यात जमा

७. ३,000+ रुग्णालयांचे जाळे : सरकारी व संलग्न असणाऱ्या खासगी रुग्णालयांचा समावेश

८. मोबाईल ॲप सुविधा : जवळील रुग्णालय, रक्तपेढी, रुग्णवाहिका शोधणे सोपे

९. हेल्पलाईन व 'रुग्ण मित्र' सेवा : २४x७ टोल फ्री क्रमांक: १८00 १२३ २२११, व्हॉट्सॲपद्वारे मार्गदर्शन

१0. CSR व NGO भागीदारी : स्वयंसेवी संस्था व कॉर्पोरेट निधीद्वारे अतिरिक्त मदत

११. त्रिपक्षीय करार प्रणाली : रुग्णालय + CSR संस्था + CMRF महागड्या उपचारांचा खर्च सामायिक

१२. बेड मॅनेजमेंट पारदर्शकता : धर्मादाय रुग्णालयांतील बेड उपलब्धता रिअल-टाईम

वॉर रूम व योजनांचे एकत्रिकरण

राज्यात प्रथमच आरोग्य योजनांचे एकत्रिकरण करण्यासाठी वॉर रूम स्थापन करण्यात येणार. यामुळे विविध योजनांचा लाभ योग्य रुग्णांपर्यंत पोहोचवणे, दुहेरी लाभ टाळणे आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर करणे शक्य होणार आहे.

महागड्या उपचारांसाठी मोठा आधार

कर्करोगावरील इम्युनोथेरपीसारख्या उपचारांचा खर्च लाखोंमध्ये जातो. अशा परिस्थितीत मुख्यमंत्री साहाय्यता निधी, CSR भागीदारी आणि त्रिपक्षीय करार प्रणालीमुळे गरजू रुग्णांना आर्थिक मदत मिळवणे अधिक सुलभ होणार आहे.

मुख्यमंत्री साहाय्यता निधीची नवी ऑनलाईन प्रणाली ही आरोग्य क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण डिजिटल पाऊल ठरणार आहे. पारदर्शकता, वेग आणि सुलभता यामुळे रुग्णांना वेळेत उपचार मिळतील आणि शासनाच्या आरोग्य योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे गरजूंपर्यंत पोहोचेल. ही प्रणाली रुग्ण, रुग्णालये आणि शासन यांच्यातील दुवा अधिक मजबूत करत राज्यातील आरोग्य व्यवस्थेला नवी दिशा देणारी ठरणार आहे.

रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी ही ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आली आहे. यामुळे आता अर्ज मंजुरीची प्रक्रिया जलद होऊन रुग्णांना मोठा दिलासा मिळत आहे. राज्यभरात ऑनलाईन प्रणाली प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी गरजू रूग्णांनी १८00 १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर तसेच https://cmrf.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर संपर्क साधावा.



कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री साहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष

राष्ट्रीय जनसंपर्क परिषद – संवाद, संवेदना आणि स्थित्यंतराचा संगम!

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्रातर्फे ९ आणि १० एप्रिल रोजी राष्ट्रीय जनसंपर्क परिषदेचे करण्यात आलेले यशस्वी आयोजन निश्चितच या क्षेत्रातील एका सकारात्मक विचारमंथनाची नांदी आहे !



राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात महाराष्ट्र राज्य संपूर्ण देशासाठी पथदर्शी आहे. प्रशासकीय उपक्रमातही महाराष्ट्राने हे आपले अग्रदूत असणे टिकवले आहे. देशाच्या राजधानीत असलेले महाराष्ट्र परिचय केंद्र हे देशातील अशा स्वरूपाचे पहिले केंद्र. या केंद्राच्या स्थापनेनंतर देशातील अनेक राज्यांनी नवी दिल्लीत आपली केंद्रे स्थापन केली.

महाराष्ट्र परिचय केंद्राने आपल्या राज्याचे देशातील हे अग्रक्रमत्व समर्थपणे जपताना राष्ट्रीय जनसंपर्क परिषद आयोजित केली. माहिती तंत्रज्ञानात झालेल्या अभूतपूर्व क्रांतीमुळे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या नव्या तंत्रज्ञानामुळे माहिती प्रसारण आणि जनसंपर्काच्या क्षेत्रात खूप मोठ्या प्रमाणावर बदल घडत आहेत. या पार्श्वभूमीवर देशभरातील राज्यांच्या माहिती व जनसंपर्क विभाग सांभाळणाऱ्या यंत्रणा अद्ययावत असाव्यात, या उद्देशाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले. देशभरातील वीसहून अधिक राज्यांच्या पन्नासहून अधिक प्रतिनिधींनी या परिषदेत सहभागी होऊन आयोजनामागचा महाराष्ट्र परिचय केंद्राचा उद्देश पुरेपूर सफल ठरवला.

नवी दिल्लीतील महाराष्ट्र शासनाच्या निवासी आयुक्त तथा सचिव आर विमला यांच्या हस्ते या परिषदेचे उद्घाटन झाले. महाराष्ट्र सदनाच्या विशेष आयुक्त श्वेता सिंघल आणि कर्नाटकच्या माहिती व जनसंपर्क विभागाचे आयुक्त हेमंत निंबाळकर आणि महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

आजच्या वेगाने बदलणाऱ्या काळात माहितीचे व्यवस्थापन आणि एआयसारख्या डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करून एक सक्षम संवादजाळे निर्माण करणे ही काळाची गरज असल्याची भूमिका तीनही मान्यवरांनी आपल्या भाषणात मांडली. राज्य शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध योजना जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अधिक प्रभावी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. माहिती क्षेत्रातील एक अधिकारी प्रशासनाचा महत्त्वाचा कणा असतो, तो समाजातील बदलाचा अग्रदूत आहे. यादृष्टीने आपली तंत्रज्ञान युगातील भूमिका निश्चित करण्यासाठी या परिषदेत साधक बाधक चर्चा व्हावी, अशी अपेक्षा या मान्यवरांनी व्यक्त केली.

परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी मान्यवरांनी व्यक्त केलेली अपेक्षा सार्थ ठरवताना परिषदेत तंत्रज्ञान आणि मानवी संवादाचा अनोखा संगम पाहायला मिळाला. बीबीसीचे आउटपुट एडिटर (भारतीय भाषा) शशांक चौहान यांनी पत्रकारितेत एआयमुळे वेग आला असला, तरी मानवी निर्णयक्षमता आणि नैतिकता राखणे महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन केले. पत्रकारिता आणि जनसंपर्क क्षेत्राचा वेग कित्येक पटीने वाढला असून आपले काम प्रभावी आणि

परिणामकारक होण्यासाठी एआयचा चांगला उपयोग होऊ शकतो. आपला संदेश लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी अधिकाधिक क्रिएटिव्ह्जचा वापर करून त्यांची एंगेजमेंट वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. समाज आणि डिजिटल माध्यमांच्या वाढत्या वापराच्या काळात माहितीची सत्यता तपासण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर जनसंपर्क अधिकाऱ्यांची जबाबदारी वाढली असून त्यासाठी फॅक्ट चेक सारख्या बाबींवर भर देणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

गुगल टीमने सरकारी योजना अचूक लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी 'प्रिसिजन टार्गेटिंग'वर मार्गदर्शन केले, गुगल इंडियाचे प्रतिनिधी करणपाल सिंग झुल्का, धर्मेश महामवाल आणि विकास यादव यांनी दुसऱ्या सत्रात 'डिजिटल ट्रान्स्फॉर्मेशन ऑफ गव्हर्नन्स कम्युनिकेशन' या विषयावर सविस्तर चर्चा केली. इलेक्ट्रॉनिक माध्यमांबरोबरच वाढत्या डिजिटल माध्यमांबाबत त्यांनी यावेळी माहिती दिली. पूर्वीच्या तुलनेत इंटरनेटचे दर मोठ्या प्रमाणात स्वस्त झाल्याने इंटरनेटचा वापर लक्षणीयरीत्या वाढला आहे. गुगल इंडियाच्या विविध प्लॅटफॉर्म्सचा वापर करून शासकीय माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवली जाऊ शकते, असे त्यांनी यावेळी सांगितले.

मेटा टीमने 'स्टोरी टेलिंग'ची त्रिसूत्री मांडली. मेटाचे आशिष पांडे, नेहा माथूर यांनी 'डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन विथ मेटा' या विषयावर माहिती दिली. चांगल्या क्रिएटिव्ह्जच्या माध्यमातून शासकीय संदेश अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी मेटाच्या प्लॅटफॉर्मचा वापर करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.







गुजरात, राजस्थान, पंजाब आणि आंध्र प्रदेश या राज्यांच्या प्रतिनिधींनी 'बेस्ट प्रॅक्टिसेस इन इंडिया' या विषयांतर्गत जनसंपर्कासाठी वापरलेल्या प्रभावी पद्धतींचे यावेळी सादरीकरण केले. आंध्र प्रदेशचे सकाळी ४ वाजेपासून चालणारे बातमी विश्लेषण असो किंवा राजस्थानचे '३६०-डिग्री' संवाद मॉडेलङ्कप्रत्येक गोष्ट नवी दिशा देणारी होती. या सत्राचे अध्यक्षस्थान कर्नाटक जनसंपर्क संचालनालयाचे आयुक्त हेमंत निंबाळकर यांनी भूषविले. विविध राज्यांनी राबविलेल्या जनसंपर्काच्या प्रभावी पद्धतींचा प्रत्येक राज्याने आपल्या राज्यासाठी उपयोग करावा, असे आवाहन श्री. निंबाळकर यांनी यावेळी केले.

दुसऱ्या दिवशी प्रारंभीच्या सत्रात राजस्थान, मध्य प्रदेश आणि हरियाणा या राज्यांनी आपल्या राज्यात सशुल्क प्रसिद्धीसाठी स्थापन झालेल्या संस्थांच्या कार्यपद्धतीची माहिती दिली. नव्या संदर्भात उपलब्ध असलेल्या विविध माध्यमांचा वापर करून करावयाच्या चौफेर प्रसिद्धीसाठी या संस्थांच्या माध्यमातून अत्यंत सुलभपणे कार्यवाही करणे शक्य असल्याची प्रचिती या माहितीतून सगळ्यांना आली.

जेएनयूच्या माध्यम तज्ज्ञ प्रा. डॉ. शुची यादव यांनी आधुनिक जनसंपर्क क्षेत्रातील भाषेच्या बदलावर सोदाहरण भाष्य केले. समारोपाच्या सत्रात माहिती व जनसंपर्क महासंचालनाचे महासंचालक तथा प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि एकूणच अनुषंगिक विषयांबाबत अत्यंत सखोल मार्गदर्शन केले. माध्यम व पत्रकारिता क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे मोठ्या प्रमाणात बदल घडत असून, बातम्यांच्या सादरीकरणाची पद्धत, गती आणि स्वरूप यामध्ये आमूलाग्र परिवर्तन झाले आहे. या पार्श्वभूमीवर जनसंपर्क अधिकाऱ्यांनी दैनंदिन कामकाजात एआयचा प्रभावी वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले. 'डीप फेक' आणि 'फेक न्यूज'च्या धोक्यांपासून सावध राहून तंत्रज्ञान आत्मसात करण्याचा मंत्र दिला.

नवनवीन तंत्रज्ञानाचा ध्यास आणि व्यासंग असलेल्या श्री. ब्रिजेश सिंह यांच्या खंबीर पाठबळामुळे या परिषदेचे आयोजन सुलभ झाले. नव्या युगातील आव्हाने, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि 'फेक न्यूज'च्या धोक्यांना भिडण्यासाठी जनसंपर्क अधिकाऱ्यांना सज्ज करण्याचा त्यांचा संकल्पच या परिषदेची प्रेरणा होती.

ही परिषद म्हणजे केवळ एक औपचारिक प्रशासकीय आयोजन न ठरता ते माहिती आणि जनसंपर्काच्या क्षेत्रातील एका परिवर्तनाचे बीजारोपण ठरले. देशभरातील प्रमुख राज्यांच्या माहिती व जनसंपर्क विभागातील ज्येष्ठ अधिकारी जेव्हा एकाच व्यासपीठावर एकत्र आले तेव्हा केवळ ज्ञानाचीच देवाणघेवाण झाली नाही, तर अनेकपदरी अनुभवांची आणि भावनांची एक अतूट नाळ जुळली.

बदलत्या माहिती तंत्रज्ञाना संदर्भात आणि जनसंपर्कातील नव्या प्रवाहासंदर्भात स्वतःला अद्ययावत करण्यासाठी ही परिषद अत्यंत उपयुक्त तर ठरलीच; पण तिच्या निमित्ताने देशभरातील प्रमुख जनसंपर्क अधिकाऱ्यांच्या संवादी स्नेहातून राष्ट्रीय स्तरावरील एक अनौपचारिक नेटवर्क (National Information Grid) तयार झाले ही आमच्यासाठी सर्वात मोठी उपलब्धी आहे!

(महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय, निर्मित

शासन आणि जनता यांच्यात संवाद दृढ करणारे...



सर्वत्र : सर्वोत्तम
लोकराज्य

महासंवाद
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

जय महाराष्ट्र


ऐकायलाच हवा
दिलखुलास
संवाद...

आपलं मंत्रालय
एक पुस्तकाच

माध्यमे संवादाची : जनतेच्या विश्वासाची

www.mahasamvad.in MaharashtraDGIPR MahaDGIPR

R.N.I.NO. 14140



Visit : www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

If undelivered, please return to:

प्रेषक / From

गोविंद अहंकारी
उपसंचालक (प्रकाशने),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.

प्रति/TO

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक गोविंद अहंकारी, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. प्रिंटरेड इश्युज (इंडिया) प्रा. लि., १७, प्रगती इंडस्ट्रियल इस्टेट, एन. एम. जोशी मार्ग, मुंबई ४०० ०११ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ४०००३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक : ब्रिजेश सिंह